
साप्ताहिक
# माणूस
१७ मे ८६/दोन रुपये

## “अमेरिकेचा मित्र तो आमचा शत्रू
## अमेरिकेचा शत्रू तो आमचा मित्र”

आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा कर्णधार

# कर्नल गडाफी



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे

अंक : एकावन्नावा

१७ मे १९८६

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ–सुरेश नावडकर

# मुस्लिम महिला विधेयक विरोधकांनी तरी कच खाऊ नये

श्री. ग. माजगावकर

सेक्युलॅरिझम म्हणजे अल्पसंख्याकांचे, विशेषत: मुस्लिमांचे तुष्टीकरण ही गांधी-नेहरूप्रणीत कॉंग्रेसची परंपरा नेटाने पुढे चालूच ठेवण्याचे राजीव गांधी यांनी ठरवलेले दिसते. देशातील सर्व सुजाण आणि सुशिक्षित समाजाचा विरोध पत्करूनही मुस्लिम महिला ( घटस्फोट हक्क संरक्षण ) विधेयक त्यांनी सक्तीच्या जोरावर एरवी लोकसभेत मंजूर करवून घेण्याची एवढी घाई केली नसती. संशयाचा फायदा राजीव गांधींना द्यायचा तर एवढेच म्हणता येईल की, विधेयक जरी लोकसभेत मंजूर झालेले असले तरी अद्याप ते अंमलबजावणी स्थिती-पर्यंत पोचायला काही टप्पे बाकी आहेत. आणि हे टप्पे पूर्ण झाले तरी सुप्रीम कोर्टातही त्याविरुद्ध अखेर-पर्यंत झुंज देणे शक्य आहे, असे या क्षेत्रातील काही जाणते कायदेतज्ज्ञ म्हणतही आहेत. राजीव गांधींनाही ही शक्यता वाटत असावी व विरोधकां-कडूनच अशी या विधेयकाची परस्पर वासलात लावली गेली तर त्यांचे त्यात नुकसान काहीच नाही; झाला तर फायदाच आहे. गेल्या वर्षभरात ज्या पोटनिवडणुका झाल्या त्यात सर्वत्र मुस्लिमांनी राजीव गांधी यांच्या पक्षाच्या उमेदवारांना पाडले. शहाबानो प्रकरणानंतर हे घडले व मुस्लिम समाजाने आता कॉंग्रेस (आय) पक्षा-कडे पाठ फिरवली असा त्याचा अर्थ लावला गेला. झाले ते गेले पण निदान यापुढे तरी अशी स्थिती राहू नये, असे घडत गेले तर पुढच्या निवडणुकीत कॉंग्रेस ( आय ) पक्ष धुतलाच जाईल अशी राजीव गांधींची समजूत झाली किंवा त्यांची अशी समजूत त्यांच्या सल्लागारांनी करून दिली आणि म्हणून स्वत:ची इच्छा असो नसो, त्यांना मुस्लिम मुल्ला-मौलवींपुढे शरणागती पत्करावी लागली व हे विधेयक बळाचा वापर करून लोक-सभेकडून संमत करवून घ्यावेच लागले. एवीतेवी कोर्टाकडून किंवा अन्यरीत्या विधेयकाची वासलात लागणारच आहे तर फुकटात अल्पसंख्याकांचा संरक्षण-कर्ता हे बिरुद पदरात पाडून घ्यायला काय हरकत आहे ?

न्यायालयातूनही या विधेयकाला आव्हाने दिली जाण्याची शक्यता खूपच आहे. ' टाईम्स ' सारख्या वजनदार वृत्तपत्राने लिहिले आहे–" The bill is liable to be challenged in the courts as viaolative of Articles 13 ( B ), 14 and 15 of the Constitution which guarantee, among other things, every citizen's fundamental right to equality before the law and prohi-bitdiscimination on the basis of sex and religion. "– ( दि. ७ मे ) असे जर खरोखरच घडले, देशातील सर्व न्यायालयातून, सर्वोच्च न्याया-

लयातही या विधेयकाला थपडा बसल्या तर अल्पसंख्याकही खूष आणि विरोधकही बदनाम ! राजीव गांधी व त्याचा काँग्रेस पक्ष म्हणू शकतो की आमच्या पक्षाने तुम्हाला हवे तसे केले, तुमच्या मागण्या मान्य केल्या, विधेयक संमत करवून घेतले; पण विरोधकांच्या कारवायामुळे शेवटी त्याची अशी वासलात लागली ! जे आपल्याला हवे आहे ते करवून घेऊन, विरोधकांवर त्याचे खापर फोडून नामानिराळे होण्याची काँग्रेसची ही चाल जुनीच आहे. पजाब प्रश्न हे त्याचे अगदी ताजे उदाहरण. सगळा घोळ प्रथम काँग्रेसच्या सत्ताबाजीमुळे उद्‌भवला; पण त्याचे सगळे खापर विरोधकावर इंदिरा गांधी फोडत होत्या आणि राजीव गांधींनी तर निवडणुकीतील आपल्या भाषणात विरोधकाना या संदर्भात देशद्रोही म्हणण्यापर्यंत मजल मारली.

अर्थात हे जरी सगळे खरे असले, संशयाचा फायदा राजीव गांधींना देणे यापलिकडे जरी याला अर्थ नसला, तरी यापुढच्या काळात मुस्लिम मत पूर्वीसारखे एकगठ्ठा काँग्रेसकडे वळेलच अशी तरी खात्री आहे का ? मुस्लिम मतातही फाटाफूट डोकावू लागली आहे. मुस्लिम समाजातूनही तुरळक का होईना, या विधेयकविरोधी सूर प्रकटपणे उमटलेला आहे. या सुराशी राजीव गांधींनी आपला सूर जुळवून घेतला असता तर भारतीय राजकारणच एका वरच्या पातळीवर उचलले गेले असते. नेहमीच मतदानाचे हिशोब करून निवडणुका जिंकता येत नाहीत. धोका पत्करून काही वेळा अंधारातही उडी मारावी लागते. जुगार फेकावा लागतो. सुवर्ण मदिरात सैन्य पाठवणे हा इंदिरा गांधींनी असाच एक जुगार फेकला होता. शीख समाज संपूर्ण विरोधी जाणार हे त्यांना कळत नव्हते ? पण उर्वरीत सर्व समाजाची सहानुभूती त्याना लाभली व त्याच्या हत्येनंतर तर या सुप्त सहानुभूतीला लाटेचे स्वरूप आले, त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले.

शहाबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामागे ठामपणे उभे राहण्याचे धैर्य राजीव गाधींनी दाखवले असते तर त्याना, निदान हिंदू मताची तरी सहानुभूती लाभलीच असती. आणि मुस्लिम मनही अगदीच विरोधी बनले नसते. कारण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाला सगळेच पक्ष ठामपणे पाठिंबा देत आहेत असे पाहिल्यावर सर्वसाधारण मुस्लिम समाजही जाऊन जाऊन कोठे जाणार होता ? राजीव गाधी सुप्रीम कोर्ट निर्णयाच्या बाजूने ठामपणे उभे राहिले असते तर जेवढे मुस्लिम मत त्याच्यापासून दुरावले असते त्याच्या दसपट हिंदूमत त्याच्या जवळही आले असते. इथे फक्त तंत्र–व्यवस्थापकीय नेतृत्व आणि राजकीय धुरीणत्व यातला फरक स्पष्टपणे दिसतो धुरीण धोका पत्करतो, त्याच्या डोळ्यासमोर दूरदृष्टीचा पल्ला, एक कालखड असतो. तंत्र आणि व्यवस्थापनवाला तात्पुरती सोय–फायदा पाहतो, वरवरची फेरमाडणी करतो. आर्थिक क्षेत्रातली राजीव गांधींची धरसोड लवकरच उघड झाली, त्यांची सुरुवातीची प्रतिमा लगेच घसरूही लागली. आता ही धार्मिक क्षेत्रातली धरसोडही त्यांना चागलीच महागात पडणार आहे. आपल्याकडे यापैकी कोणती धरसोड निर्णायक ठरते हे सागवत नाही. फाळणी आर्थिक कारणास्तव झाली नाही. अगदी अलिकडच्या पंजाब–आसाम आंदोलनाच्या मुळाशीही धार्मिक कारणेच प्रमुख आहेत. मग मार्क्सवादी किंवा जनता पक्षातले चंद्रशेखरादी काहीही म्हणोत. एकविसावे शतक जवळ आले तरी धार्मिक प्रश्नाचे महत्त्व निदान आपल्याकडे तरी मुळीच कमी झालेले नाही. या सदर्भात राजीव गाधींनी ठाम पुरोगामी भूमिका घेतली असती तर त्याचे नेतृत्व अधिक उठावदार झाले असते, स्थिरावलेही असते,अशीच सध्याचे जनमानस पाहता शक्यता होती. कारण विरोधीबाजूकडेही सगळा आनंदी आनंदच आहे. ही एक ऐतिहासिक संधी होती राजीव गाधींनी ती निश्चितच गमावली आहे. एवीतेवी सक्ती करून, व्हिपचा बडगा दाखवूनच लोकसभेत हे विधेयक संमत करून घेतले गेले आहे. मग सक्ती पुरोगामी धोरणाच्या बाजूनेही करता आली असती. प्रतिगामी आणि पुरोगामी असा वैचारिक व राजकीय लढा आणखी काही काळ देशात चालू राहिला असता तर काय मोठे बिघडले असते ? व्हिप काढूनही ४०–५० सभासद लोकसभेतील मतदानाच्या वेळी गैरहजर राहिले होते ही वस्तुस्थिती चागलीच आशादायक होती, बाहेरून किंवा पक्षातूनही पुरोगामी धोरणाना पाठिंबा भरपूर होता,असाच या वस्तुस्थितीचा अर्थ आहे. पण वैमानिक असूनही झेप घेण्याचे धाडस राजीव गांधीना दाखवता आले नाही. ऐनवेळचा हा कचखाऊपणा आपल्या राष्ट्रीय स्वभावाचा विशेष आहे की, काँग्रेस नेतृत्वाचा हा वारसा आहे हा एक शोध घेण्यासारखा विषय मात्र ठरत आहे !

□

काँग्रेस परंपरेचा आणखी एक आविष्कारही या संदर्भात पाहाण्या-

सारखा आहे. हेमवतीनंदन बहुगुणा हे एकेकाळचे नेहरूवादी. ते जनता पक्षीय राजवटीत मंत्री होते. नंतर इंदिरा काँग्रेसमध्ये गेले. तिथेही जमले नाही तेव्हा त्यांनी सोशॉलिस्ट डेमॉक्रॅटिक पार्टी नावाचा पक्ष काढला पुढे हा पक्ष लोकदलात विलीनही करून टाकला. गेल्या महिन्यात त्यांची एक मुलाखत 'संडे ऑब्झर्व्हर' या पत्रात प्रसिद्ध झाली आहे. (दि. १३ एप्रिल ८६) या मुलाखतीत ते म्हणतात– But I must tell the Mushawart people that by conceding the right of Parliament to enact a law coditying personal law, it is a step in the direction of Parliament intervening in it. And that is a positive feature of this bill. So, Syed Shahabuddin and the Mushawart people have given Parliament the right to codify Muslim personal law.' सारांश असा की, या विधेयकाला मुस्लिमांनी पाठिंबा दिला की त्यांनी मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात हस्तक्षेप करण्याचा हक्क पार्लमेंटला दिला असा याचा अर्थ होतो आणि या विधेयकाची ही एक जमेची बाजूच आहे. अशाच स्वरूपाचे मत शहाबुद्दिन यानीही व्यक्त केलेच आहे म्हणजे या दोन महाभागांना भारत स्वतंत्र झाला, एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य येथे स्थापन झाले, या राज्याच्या घटनेप्रमाणे संसद अस्तित्वात आली व या संसदेला देशहिताच्या दृष्टीने कोणत्याही क्षेत्रात कायदे करण्याचा अधिकार जन्मत:च प्राप्त झाला आहे याचा अद्याप पत्ताच नसावा असे दिसते! या विधेयकामुळे हस्तक्षेप करण्याला मान्यता लाभली असे म्हणणे म्हणजे पूर्वी, म्हणजे घटना ज्यावेळी अस्तित्वात आली तेव्हापासून ती नव्हती असेच म्हणण्यासारखे आहे भारताच्या सार्वभौमत्वाचाच हा अवमान म्हटला पाहिजे. शहाबुद्दिन यांनी तो करणे समजू शकते त्यांची मजल यापुढेही गेली आहे. ते 'मुस्लिम इंडिया' असाही शब्दप्रयोग करू लागले आहेत. या विधेयकाकडे म्हणूनच केवळ मानवतावादी किंवा मुस्लिम समाजसुधारणावादी दृष्टिकोनातून पाहणे यामुळेच पर्याप्त नाही, हेही सर्वांनीच विशेषत: विधेयक–विरोधकांनी वेळीच ध्यानात घेतलेले बरे.

हा विषय आता राजकारणाच्या मध्यवर्ती प्रवाहात दाखल झालेला आहे व देशाच्या अखंडत्वाच्या आणि एकात्मतेच्याच नाही तर सार्वभौमत्वाच्याही मुळापर्यंत जाऊन पोचतो आहे. आपल्या सार्वभौमत्वावरच आघात करणाऱ्या शक्ती यातून डोके वर काढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. दुधाने तोंड पोळले तर माणूस साधे ताकही फुंकून पितो. पूर्वी सिंध प्रांत मुबई प्रांतातून वेगळा काढला तेव्हाही ही साधी राज्यकारभाराची सोय आहे असे सांगितले गेले. पुढे ही कृती पाकिस्तानच्या निर्मितीचे पहिले पाऊल ठरले. तसेच आताही कशावरून घडणार नाही? लोकसभेच्या ४०-५० मतदारसंघात मुस्लिमांची बहुसंख्या आहे. हे मतदारसंघ राजकीय–धार्मिक शक्ती केंद्रे म्हणून व्यवस्थित व योजनापूर्वक संघटित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ही गोष्ट आता काही गुपित राहिलेली नाही. केरळात आजच एक पाकिस्तान अस्तित्वात आहे. कम्युनिस्टांनाही या मल्लापुरमसारख्या मुस्लिम बालेकिल्ल्यात प्रवेश नाही. मग इतरांची तर बातच सोडा. उत्तरेत मोरादाबाद भागात असाच एक बालेकिल्ला उभारला जात आहे, त्याचे नकाशेही तिकडच्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेले आहेत. मुस्लिम इंडियाची शहाबुद्दिन यांची भाषा पोकळ समजून चालणे, देशासमोर गरिबी–विषमता हे प्रश्न आहेत म्हणून या फोफावत चाललेल्या विभाजनवादाकडे दुर्लक्ष करणे, म्हणजे पुन्हा जुन्याच चुका करणे ठरेल. चुका घडतात पण त्या नवीन तरी असाव्यात? मुसलमानाना नोकऱ्या मिळाल्या की पाकिस्तानची मागणी आपोआप गळून पडेल असे नेहरू म्हणाले होते. पाकिस्तान अस्तित्वात आल्यावरही या 'नव्या' राज्याला आर्थिक पाया नसल्याने ते सहा महिन्यात कोसळेल अशी भाकितेही डाव्या व समाजवादी विचाराच्या मंडळींनी त्यावेळी केलेली होती. यापैकी काहीही घडलेले नाही. उलट अमेरिकेची व लागून असलेल्या मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांची मदत मिळवून पाकिस्तान अधिकाधिक शिरजोर बनले व आपल्याविरुद्ध आक्रमणे करण्याची धिटाईही त्याने दाखवली. आर्थिक-शैक्षणिक वगैरे सर्व सुधारणांचा लाभ मुस्लिमाना, इतर भारतीय बांधवाप्रमाणेच जरूर मिळाला पाहिजे यात काही शंका नाही. पण हे लाभ घेत असता भारताचे अखंडत्व आणि सार्वभौमत्व यांचे रक्षणही त्यांच्याकडून अपेक्षित आहे, हेही स्पष्टपणे त्यांना बजावले गेले पाहिजे. लोकशाही आणि विकास या प्रक्रियांचे सर्व फायदे फक्त उपटायचे आणि विभाजनाचे मनसुबेही रचायचे, हा खेळ मात्र यापुढे तरी चालू देता कामा नये.

राजीव गांधींनी हा सगळा पूर्वेतिहास थोडा तरी लक्षात घ्यायला हवा होता. दुष्काळी व दुर्गम आदिवासी भागात दौरे करून ते भारताचा भूगोल समजावून घेत आहेत, लोकस्थितीची

जवळून पाहणी करीत आहेत, हे चांगलेच आहे. पण या भूगोलाप्रमाणेच थोडा इतिहासही पाहणे आवश्यक आहे. दुभंगलेला आपला राष्ट्रवाद अद्यापही तसाच आहे. ज्यांना भारताच्या अखंडत्वाची, राष्ट्रीयत्वाची प्रखर जाणीव आहे त्यांना आर्थिक-सामाजिक शैक्षणिक प्रश्न कमी महत्त्वाचे वाटतात किंवा त्यावर त्यांचा पुरेसा भर तरी नसतो. जे आर्थिक-सामाजिक चळवळी करतात त्यांना फाळणीचे, फुटीरपणाचे धोके ओळखूच येत नाहीत. हे दोन्ही पंख विस्तारून जर झेप घेतली तरच राजीव गांधींच्या एकविसाव्या शतकाच्या घोषणेला काही अर्थ प्राप्त होईल. आपण काही न करताही एकविसावे शतक उगवणारच आहे. पण ते जेव्हा उगवेल तेव्हा आपण कशा स्थितीत असू ?हेही पाहिले पाहिजे. एक कर्जबाजारी आणि छिन्नविछिन्न झालेला देश म्हणून, की स्वावलंबी व समर्थ भारत म्हणून आपण एकविसाव्या शतकात जायचे ? हेही आत्ताच ठरवले पाहिजे, त्या दृष्टीने प्रत्येक पाऊल उचलले गेले पाहिजे. सामर्थ्य हवे, संरक्षण हवे आणि विकासही हवा. यांची फारकत म्हणजे मागील इतिहासाची पुनरावृत्ती. आपण विकसित आणि समृद्ध होतो, आपल्या देशात खूप संपत्ती होती म्हणूनच ना ती लुटून नेण्यासाठी या देशावर गेली हजार वर्षे आक्रमणे झाली ? आणि या आक्रमकांना बोलावणारे, त्यांना मदत करणारे या देशातच निघाले ना ? जुन्या काळात त्यांची नावे जयचंद राठोड, नजीबखान रोहिला किंवा बाळाजीपंत नातू अशी असतील. नव्या काळातही नवी नावे पुढे येऊ शकतील, जर आपला राष्ट्रवाद असाच पूर्वीप्रमाणे दुभंगलेला राहिला तर! मुस्लिम महिला विधेयकाला विरोध करताना अशी सम्यक राष्ट्रवादी भूमिका घेतली नाही तर विरोधकांनीही एक ऐतिहासिक संधी गमावली असा याचा अर्थ होईल. विरोध यापुढेही संघटित करीत राहायला हवे. परकीय राज्य असताना, कर्झनसारखा उद्दाम राज्यकर्ता छाताडावर पाय रोवून उभा होता तरी बंगालची एकदा वज्रलेप झालेली फाळणी रद्द होऊ शकली. मग स्वतंत्र भारतात, मुस्लिम महिला घटस्फोट हक्क संरक्षण विषयक विधेयक जरी लोकसभेने मंजूर केलेले असले, तरी ते का मागे घेतले जाऊ शकणार नाही ? लाल-बाल-पालप्रमाणे धुरीण मात्र हवेत. रौलेट बिलाविरुद्ध गांधीजींनी केवढे रान उठवले होते ? त्यांच्या अखिल भारतीय मान्यतेचे ते पहिले चरणच ठरले. राजीव गांधींनी झेप घेतली नसेल. विरोधकांनीही· तसेच केले पाहिजे असे थोडेच आहे ?

□



# मुंबापुरी

### □ जसजसे वय वाढते !

साखर भवनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम इतका कडवट होईल ह्याची आम्हाला आधी कल्पना आली नाही. वसंतदादा पाटील आणि शंकरराव चव्हाण एकाच व्यासपीठावर एकत्र आले की उभ्या महाराष्ट्रात सुबत्ता पसरेल असे म्हटले जाते. त्यामुळे यशवंतराव प्रतिष्ठानाच्या उद्घाटन प्रसंगी तरी हे दोघे एकत्र येतील अशी आमची अपेक्षा होती. परंतु दादा त्या कार्यक्रमाला हजर राहिले नाहीत आणि आता साखर भवनाच्या उदघाटनाला शंकररावांनी मोडता घातला. घरात काय किंवा राजकारणात काय, जसजसे वय वाढत जाते तसतशी माणसे अधिक तापदायक बनत जातात, असा आमचा अनुभव आहे.

राजस्थानचे राज्यपाल झाल्यापासून ह्या राज्याच्या कामात लक्ष घालण्याऐवजी दादांनी उंटावरून शेळ्या हाकण्याचा उद्योग सुरू केला. आता तर ते मुंबापुरीतच ठाण देऊन बसले आहेत. आपण मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यापासून पत्रकारांनी जाणूनबुजून आपल्याविरुद्ध आघाडी उघडली आहे अशी दादांची तक्रार आहे. लोकांनी सहकारमहर्षी म्हटलेले त्यांना चालते परंतु साखर सम्राट म्हटले तर मात्र त्यांना राग येतो. मात्र ह्या सहकार महर्षींची शालिनीताई पाटील ते शंकरराव चव्हाण ते राजीव गांधी ह्यापैकी कुणाशीही सहकार्य करायची तयारी नाही.

दादांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत बराच काळ सत्ता उपभोगली आणि त्यांच्या सर्व नातेवाईकांनी ह्या राजकीय बळाचा पुरेपूर वापर करून घेतला. त्यामुळे आता आयुष्यभर इतका प्रचंड त्याग केल्यावर लोकच आपल्यावर उलटले आहेत असे म्हणण्याचे दादांना कारण नाही.

साखर भवनाच्या इमारतीची नरीमन पॉइंटवरील जागा सुरवातीस साखर कारखाना संघाच्या मालकीची होती. तेथे पाच वर्षे कोणतेही बांधकाम न करता संघाने ती जागा डॉ. मेकर ह्या बिल्डरला दिली. हे डॉक्टर मेकर दादांच्या खास संबंधातले आहेत. एकूण बारा मजली इमारत बांधून त्यातले दोन मजले त्यांनी संघाच्या कामा-

पृष्ठ ३२ वर

अमेरिका . . .

## वक्ता दशसहस्रेषु

वक्ता हा प्राणी तसा दुर्मिळच! म्हणूनच तर संस्कृतमध्ये वचन आहे : वक्ता दशसहस्रेषु...आणि चांगला, प्रभावी वक्ता तर अतिशयच दुर्मिळ! त्यामुळेच की काय एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या डॅनिअल वेब्स्टरचे अमेरिकन लोकांना भारीच कौतुक आहे. हा गृहस्थ अक्षरशः वक्तृत्व जगला आणि मेला तो देखील एक ओजस्वी भाषण दिल्यानंतर! लहानपणापासून याला पुस्तकाचे भारी वेड. तसा घरचा गरीब पण याची तल्लख बुद्धी पाहून बापाने पोटाला चिमटा घेऊन कॉलेजात पाठवला. कॉलेजच्या अभ्यासात तसा विशेष चमकला नाही पण वक्तृत्वाने मात्र कॉलेजजीवनावर आपली छाप पाडून गेला. अनेक कविता, इतिहासातील दाखले, इतिहासकारांचे उतारे याच्या अगदी जिभेच्या टोकावर असायचे! आणि स्मरणशक्ती तरी काय जबरदस्त. नेमक्या वेळी नेमक्या ओळी आठवायच्या. महाविद्यालयीन जीवनात एक फर्डा वादविवाद पटू व ओजस्वी वक्ता म्हणून चमकून गेला. अशा माणसाने वकिली व्यवसाय निवडला असल्यास आश्चर्य वाटावयास नको. मग राजकारणात शिरला व एक चांगला संसदपटू म्हणून प्रसिद्धीस आला. भारदस्त व्यक्तिमत्त्व, वजनदार आवाज, भेदक–बोलके डोळे यामुळे याच्या शब्दांना आगळी धार असायची. श्रोते अगदी भारावून जायचे याच्या वक्तृत्वाने!

याने अमेरिकेत इंटरनॅशनल प्लॅटफार्म असोसिएशन नावाची संस्था स्थापन केली. ती आजही कार्यरत आहे. ही संस्था स्थापन करताना अर्थात त्याने फार उच्च ध्येय उराशी बाळगले होते. ते म्हणजे या संस्थेद्वारे अमेरिकन संस्कृतीचा प्रसार व्हावा, राष्ट्रीय एकता निर्माण व्हावी वगैरे. पण सध्यातरी हे असोसिएशन वक्त्यांना आपले कौशल्य दाखविण्याचे एक 'मंच' सिद्ध होत आहे. नुकतेच वॉशिंग्टन येथील मेफ्लॉवर या आलिशान हॉटेलात याचे १५४ वे समेलन पार पडले. या समेलनात ८०० प्रतिनिधींनी हजेरी लावली. यात व्यवसायी वक्ते, हौशी वक्ते, वक्त्यांचे कार्यक्रम ठरविणारे दलाल, कॉलेजचे प्रोग्रॅम डायरेक्टर्स व काही हौशी श्रोते होते. अशा या 'मिक्सड् ऑडिअन्स' समोर बोलण्याच्या संधीचा चाळीस पट्टीच्या वक्त्यांनी फायदा घेतला. आपली भाषण देण्याची 'रंग' जिरवून घेतली म्हणा ना! अर्थात सुप्त इच्छा अशी की एखाद–दुसरे भाषणाचे निमंत्रण मिळावे. हो म्हणजे काही हजार डॉलर्स सहज खिशात पडतील. पण त्याच्यापेक्षाही विशेष उत्सुक होते ते नव्यानेच या क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणारे हौशी कलाकार. कारण भाषण जर जमले–दलालांना आवडले तर त्यांना भाषणाची निमंत्रणे मिळणार होती. आणि निमंत्रणे मिळाली तर त्यांचे नशिब उघडणार होते. कारण वक्तृत्वाद्वारे लक्षावधी डॉलर्स मिळविणे इथे सहज शक्य आहे. किंबहुना इतके लोक दरवर्षी इथे हजेरी लावतात त्याच्यापैकी बऱ्याच जणांचा तोच सुप्त उद्देश असतो. या असोसिएशनचा सध्याचा डायरेक्टर, जनरल डॉन टायलर तर चक्क म्हणतो, 'ही वक्तृत्वाच्या व्यवसायाची बाजारपेठ आहे आपले कसब दाखवा–भाषणाची निमंत्रणे मिळवा आणि श्रीमंत व्हा.'

खरं म्हणजे अमेरिकेत चांगल्या वक्त्याला मिळणारे मानधन भरपूर आहे. हेच बघा ना– बॉब होपला एका भाषणाचे ४०,००० डॉलर्स मिळतात तर पॉल हार्वे या रेडियोस्टारला २५००० ! जीन कर्कपॅट्रीकला २०,००० व जीन डिक्सनला ७००० ! हेन्री किसिंजर एका भाषणाचे १८००० डॉ. मोजून घेतो म्हणतात व रिचर्ड निक्सन २५००० ! पण आजकाल निक्सन फुकटात बोलतो म्हणे!

वॉशिंग्टन येथे झालेले हे समेलन चांगले पाच दिवस चालले होते. या पाच दिवसात बोललेल्या विविध वक्त्यांतून दोन उत्कृष्ट वक्ते निवडण्यात आले. त्यापैकी एक होता व्यवसायी व दुसरा हौशी. व्यवसायी वक्त्यांमधून यावर्षी हॅरी ब्लॅकस्टोन या जादुगाराची निवड झाली. आपल्या वक्तृत्वाद्वारे त्याने श्रोत्यावर व परिक्षकावर जादू टाकलेली दिसते. हौशी वक्त्यांमधून त्रेसष्ट वर्षाच्या एडिथ ब्रेगनार्डची निवड झाली. त्यांच्या भाषणाचा विषय होता 'म्हातारपण' या दुसऱ्या स्पर्धेत एकूण त्रेचाळीस लोकांनी भाग घेतला. त्यापैकी शेवटच्या फेरीत नऊजण पोहचले होते. मागील वर्षी या समेलनात भाग घेतलेला जो स्क्वार्टझ सध्या १००० डॉ. मानधन घेऊन 'सेवानिवृत्तीला कसे हरवावे' या विषयावर भाषण देऊन भरपूर कमाई करीत आहे असे म्हणतात! दुसरा एक बहाद्दर म्हणजे ट्युनिशियाचा पदच्युत राजा अल मेहदी. 'अ रॉयल सॅगा' या विषयावर भाषण देऊन हा दर भाषणागणिक १५०० डॉ. कमावतो म्हणे!

तर अशा ह्या इंटरनॅशनल प्लॅटफार्म असोसिएशनचा संस्थापक डॅनिअल वेब्स्टर मेला तो देखील भाषण दिल्यानंतर असे वर सांगितले. खरच त्याच्या मृत्यूची कथा वक्तृत्वाच्या इतिहासात चिरस्मरणीय राहील अशी आहे. त्याचे असे झाले की मृत्यू येण्यापूर्वी काही वेळ अगोदर याने धार्मिक विषयावर एक ओजस्वी भाषण दिले. हे भाषण ऐकणारे श्रोते होते त्याची पत्नी, मुलगा, डॉक्टर व इतर आप्तमित्र. भाषणानंतर तो अगदी थकून गेला. क्षणभर निपचित पडून राहिला. मग परत एकदा आपली सर्व शक्ती एकवटून तो उपस्थितांना उद्देशून म्हणाला, 'प्रिय जनांनो, माझ्या भाषणातून तुम्ही डॅनियल वेब्स्टरला न शोभणारे असे काही ऐकले का?' सर्वांनी एकमुखाने उत्तर दिले, 'नाही! मुळीच नाही!' त्यावर त्याने समाधानाचा एक सुस्कारा सोडला व शांतपणे प्राण सोडले!

–अ. ल. देशपांडे

**महाराष्ट्र साहित्य परिषदेने**
**पारितोषिक देऊन गौरविलेले**
**राजहंस प्रकाशन**

# भ्रम आणि निरास

**लेखक : डॉ. नरेंद्र दाभोळकर**

पृष्ठे : १४० / किंमत : ३० रुपये

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतल्या एका कार्यकर्त्याने बुवाबाजी, झपाटणे, भानामती, वशीकरण, पुनर्जन्म, ग्रहांचे खेळ यासारख्या आपल्या समाजात ठाण मांडून बसलेल्या गोष्टींचे केलेले शास्त्रशुद्ध विवेचन आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतले प्रत्यक्ष अनुभव.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. । फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई ४०० ०२८ । फोन : ४२२ ५४५५

# पुणे वार्ता

## □ मराठी कथेविषयी तेंडुलकर

तेंडुलकर मराठीचे 'मोठ्ठे' साहित्यिक आहेत. (आता त्याना नुसते मराठीचे कसे म्हणावे? हिंदीतले त्याचे कर्तृत्व तर त्याहूनही 'मोठे' आहे) तेंडुलकर मॅजेस्टिक गप्पामध्ये मराठी कथेविषयी बोलले. शरच्चंद्र चिरमुल्यांच्या कथेला केशवराव कोठावळे पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार तेंडुलकराच्या हस्ते मगळवारी ६ मे रोजी बहाल करण्यात आला.

शरच्चद्र चिरमुले हे मराठी कथेतील एक मानाचे नाव. साध्या पण समर्थ अनुभूतीच्या कथा त्यानी मराठी साहित्याला दिल्या. हा मोठा कथाकार आपल्या मितभाषी आणि प्रसिद्धिपराङ्मुख भूमिकेमुळे तथाकथित साहित्यिक वर्तुळात गाजला नाही पण त्याच्या कथाचे चाहते सर्व थरात आहेत. कसदार आणि अभिजात अशा कथा लिहिणाऱ्या या लेखकाला असेच अनेक पुरस्कार मिळायला हवेत.

आजची मराठी कथा मागे पडलेली आहे. या माध्यमाला मरगळ आली आहे अशी खंत विजय तेंडुलकर बोलतात. नवे विषय अनुभव, रसरशीत ताजेपणा वगैरे बाबतीत मराठी कथा अडखळतेय असे त्याना वाटते. नवे कथाकार शोधण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न व्हायला हवेत असे तेंडुलकर सागतात पण हे प्रयत्न करायचे कोणी? हा प्रश्न अनुत्तरितच रहातो. तथाकथित समीक्षक आणि प्रचलित वाङ्मयीन नियतकालिके याच्याकडे त्याचा रोख असेल तर ही दोन्ही माध्यमे सध्यातरी मोडीत निघालेली आहेत. मराठीत दुर्दैवाने आज वाङ्मयीन नियतकालिक नाही. जी आहेत त्याचे वाङ्मयीनपण तपासून घ्यायला हवे. समीक्षकाबद्दल वेगळे कथन कशाला?

श्री. दा. पानवलकराचे उदाहरण देऊन तेंडुलकर सागतात की. 'अर्धसत्य'चे लेखक म्हणून त्याना ओळखण्यापेक्षा 'सूर्य'चे लेखक म्हणून त्याना ओळखायला हवे होते कारण सूर्य ही कथा 'अर्धसत्य'पेक्षा श्रेष्ठ आहे. त्यांचा रोख दूरदर्शन, चित्रपट या माध्यमाद्वारे पुढे येणाऱ्या कथाकडे होता. काय माध्यमांतून सादर होऊ शकणाऱ्या कथांना मर्यादा आहेत. कथेचे वेगवेगळे 'फॉर्म्स' *या माध्यमातून व्यक्त होऊ शकणार नाहीत* वाचकही ही भूमिका मनात ठेवूनच कथेचा शाब्दिक आणि दृश्य अनुभव घेत असतो. तेव्हा या माध्यमाचे भय बाळगण्याचे कारण नाही.

मराठी कथेला पुनश्च बहराचे दिवस यायला हवेत ही अपेक्षा विजय तेंडुलकर व्यक्त करतात त्याचबरोबर व्यापार उद्योग, कामगार चळवळ वगैरे विविध विषयही समर्थपणे हाताळले जावेत अशी इच्छा व्यक्त करतात. तेंडुलकराच्या अपेक्षा योग्यच आहेत कारण मराठी वाङमयाचे मोठे सामर्थ्य मराठी कथेमध्येच आहे. जी. ए कुलकर्णी, चि. त्र्य. खानोलकर, पु. भा. भावे गंगाधर गाडगीळासारख्या लेखकानी हे सामर्थ्य वाढवले आहे तेव्हा मराठी कथेची सध्याची मरगळ तात्पुरतीच रहावी आणि नजिकच्या भविष्यात तिचे उत्तुंगपण तिला पुन्हा मिळावे ही अपेक्षा रास्तच! नव्या दमाच्या लेखकानी हे आव्हान पेलायलाच हवे.

— मनोहर सोनवणे

## 'सांस्कृतिक डोंबिवली'

## ग्राहक पंचायतीचा उपक्रम

तसे पाहिले तर डोंबिवलीसारख्या शहराला अपना बाजारसारख्या सकलवस्तुभाडाराची, सहकारी पद्धतीने चालणाऱ्या उपक्रमाची नितात आवश्यकता आहे. डोंबिवली पीपल्स को-ऑप. सोसायटी नावाची जुनी आणि मोक्याच्या जागी असणारी संस्था आहे. पण त्या जुन्या सहकारी सोसायटीनेही फारसे मनावर घेतल्याचे दिसत नाही. तीन वर्षापूर्वी क्रांती डिपार्टमेंटल स्टोअर्स नावाचे एक अत्यत भपकेबाज, आलीशान वास्तूत उभारलेले भाडार सुरू झाले. ते स्टोअर्स पश्चिमेच्या बाजूला असल्यामुळे पूर्वेकडील डोंबिवलीकराना ते गैरसोयीचे आहे. त्यामुळेच की काय खूप जाहिरात करूनसुद्धा सगळ्या गावाचे ते आकर्षण केंद्र बनू शकले नाही डोंबिवली नगरीची झपाट्याने वाढणारी वस्ती, एकाच ठिकाणी सर्व वस्तू सहजगत्या मिळाव्यात हा आग्रह पाहिल्यानंतर अशा तऱ्हेच्या सहकारी पद्धतीवर चाललेल्या भाडाराची नितात गरज आहे, पण काय झाले आहे ते कळत नाही. अशा तऱ्हेची सहकारी सघटना मोठ्या प्रमाणात आकाराला येत नाही एकाच ठिकाणी गिऱ्हाईकाला लागणाऱ्या सर्व दैनदिन गरजेच्या वस्तू-भाजी, फळे इ. सकट- मिळू लागल्या तरच ह्या गावातील व्यापाऱ्याकडून गिऱ्हाईकाची जी लूट होत आहे ती कमी तरी होईल. ह्या गावातील भाजी विकणाऱ्यांची वजनमापे ही कधीच बरोबर नसतात. भावही चढे असतात ग्राहक सघटित नाहीत आणि भाजी विक्रेते, व्यापारी सघटित तर आहेतच आणि तक्रार करणाऱ्या गिऱ्हाईकांना शिव्यागाळी करण्यास, कधी कधी हात उगारण्यासही मागे पुढे पहात नाहीत ह्या शहरातील वाली नसणाऱ्या ग्राहकाने ही परिस्थिती स्वतःच्या उदासिनतेने निर्माण केली आहे एका बाजूने सहकारी चळवळीचा पाठपुरावा करणे आणि दुसऱ्या बाजूने बहिष्कार घालणे अशा दोन प्रभावी हत्याराचा त्याला उपयोग करता येईल. अर्थात त्यासाठी त्याला सघटित व्हावे लागेल. अशा तऱ्हेचे ग्राहकांच्या हिताचे कार्य गेली अनेक वर्षे करणाऱ्या ग्राहक पचायतीच्या कार्यकर्त्यांना भेटलो. त्याच्याकडून हा प्रश्न समजावून घेतला. त्या आधारे हे लेखन केले आहे

'अखिल भारतीय ग्राहक पचायतीची डोंबिवली शाखा, 'सन्मित्र ग्राहक सघटना, डोंबिवली'ची मुहूर्त सव्वीस जानेवारी १९७५ रोजी झाली असे श्री. प्रभाकर *लाळे व श्री. सुधाकर नागले ह्या दोन जुन्या* कार्यकर्त्यांनी ह्या सघटनेची माहिती देताना सांगितले. त्याना मी डोंबिवलीच्या पश्चिम बाजूला असणाऱ्या त्याच्या ग्राहक मदिरात जेव्हा भेटलो तेव्हा नुकतीच वीज गेली होती. त्या काळोखात ते आपल्या कार्यावर प्रकाश टाकीत होते. 'ठाणे जिल्ह्याचे त्या वेळचे जिल्हाधिकारी श्री. अनिल गोकाक ह्यानी आमचे काम पाहून हे ग्राहक मदिर उभारण्याची परवानगी दिली असे श्री नागले म्हणाले. 'आमच्या ग्राहक सघटनेचे पहिल्या वर्षातच अडीचशे सभासद झाले. त्यातील सघ विचारसरणीचा सत्तर ऐंशी सभासदाचा गट बाजूला झाला. त्यांनी डोंबिवली ग्राहक संघ सुरू केला.' सघटनेचे सुरुवाती-

ासून काम पाहणारे श्री. लाळे सांगू लागले, 'आम्ही कटाक्षाने राजकारण बाजूला ठेवले आहे ही संघटना कोणत्याच विचाराच्या बंधनात नाही. ग्राहकाचे हित हेच उद्दिष्ट आहे. तसे पाहिले तर सर्वच राजकीय विचाराची माणसे ह्या संघटनेत आहेत. तशीच सर्व जातीतील, धर्मातील आणि विविध भाषिक प्रदेशातील नागरिक आमचे सभासद आहेत. डोंबिवलीत जसे अखिल भारताचे प्रतिनिधी आहेत तसेच आमच्या इथेही आहेत. आज ह्या संघटनेत आठशे सभासद आहेत, म्हणजेच आठशे कुटुंबे एका विचाराने एकत्र आली आहेत'

'ह्या ग्राहकांना, तुमच्या सभासदांना बाजारभावापेक्षा किती कमी दरात तुम्ही वस्तू देता?' ह्या माझ्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, आमच्या सभासदांना किमान बारा टक्के नफा मिळतो. पण एक लक्षात ठेवा. ग्राहक संघटना हे स्वस्त वस्तू पुरविणारे दुकान नाही. वाटप हे एक साधन आहे, साध्य नाही. सर्वांनी एकत्र येणे, काम करणे, एकमेकांच्या अडीअडचणीत मदत करणे अशा सारख्यासाठी संघटना आहे. एक व्यक्ती म्हणून केवळ स्वतःच्या नफ्यातोटयाचा विचार न करता सामुदायिक जीवन जगण्याचा आनंद मिळविण्यासाठी ही संघटना आहे.' 'तुम्ही त्यासाठी इतर कोणती कामे करता?' मी विचारले. ते सांगू लागले, 'दरवर्षी जानेवारी महिन्यात वर्धापन दिन साजरा करतो. त्या वेळेस नामवंत व्यक्तींना बोलावतो. एखादा मनोरंजनाचा कार्यक्रम ठेवतो. २५ डिसेंबरला सभासदांची एक दिवसाची सहल काढतो. त्याशिवाय सभासद कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व्हावे ह्यासाठी कॅम्प्स आयोजित करतो. आत्तापर्यंत कार्यकर्त्यांचे सात, विद्यार्थ्यांचे तीन आणि महिलांचे दोन कॅम्प्स झाले आहेत. आमच्या संघटनेत महिलांचा सहभाग फार मोठा आहे, तसाच तरुणांचाही आहे. केवळ प्रौढ पुरुष सभासदच काम करतात असे नाही. त्याचप्रमाणे आम्ही एकूण ग्राहक हितरक्षणासाठीही कामे करतो गॅस वितरण, टेलिफोन, वीज, रेशन, नगरपालिका इ. च्या संदर्भातील तक्रारी, अडीअडचणी दूर करण्यासाठी पत्रव्यवहार, भेटीसाठी, मेळावे ह्यांचा उपयोग करतो.'

## ग्राहकांचे खरे हित

'तुमच्याकडे वाटप करण्यासाठी सर्व वस्तू आहेत का? त्यांचे वाटप कसे करता?' ह्या माझ्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले 'प्रत्येक कुटुंबाला लागणाऱ्या सर्वच वस्तू आम्ही आणीत नाही. अगदी आवश्यक, सर्वात जास्त लागणाऱ्या वस्तू आणतो. त्यांची संख्या पंचवीस आहे. त्यात विविधता नाही. म्हणजे असे की एकाच प्रकारचा साबण, पेस्ट, डाळ, तांदूळ इ. आणतो. काही वस्तू-रवा, पोहे, मारी, ग्लुकोज बिस्किटे इ. सारख्या वस्तू एक महिन्याआड आणतो. जिरे, मोहरी, इतर कडधान्ये उन्हाळयात आणतो. दिवाळीसाठी लागणारे जिन्नस आणावयास विसरत नाही. दर महिन्याच्या चौदा तारखेच्या आत पुढील महिन्याची यादी, पैसे गोळा करतो. गेल्या दोन वर्षांपासून आम्ही संगणकाची मदत त्यासाठी घेतो. त्यामुळे सर्वच गोष्टी झटपट व व्यवस्थित होतात. वाटप करण्यासाठी आमच्या सुमारे ऐंशी कार्यकर्त्यांची मदत होते. ज्याला जे काम आवडते, जमते ते तो करतो. त्यासाठी आम्ही कोणालाही मानधन वगैरे देत नाही. सारा स्वयंसेवी संसार, व्यवहार आहे. वितरण ठिकाणी (आता पूर्वेलाही एक केंद्र सुरू केले आहे.) येऊन स्वतः सामान नेले पाहिजे असे असले तरी एकाच वेळी सारे सामान महिलांना नेता येत नाही. तेव्हा त्यांच्या मदतीला आमचे हमाल देतो. त्यांची निश्चित केलेली हमाली द्यावी लागते. जून महिन्यात वही वाटप करतो. ह्या वह्या सभासदांना बाजारभावापेक्षा खूपच सवलतीने मिळतात. आम्ही वितरणखर्च म्हणून प्रत्येकाकडून अडीच रुपये घेतो. संगणकाचा अर्धा खर्च सभासद देतात (प्रत्येकी पन्नास पैशापेक्षा कमी) आणि अर्धा खर्च त्या बिलावर छापलेल्या जाहिरातीतून वसूल होतो.'

'त्याशिवाय काय करता' असे विचारल्यानंतर ते म्हणाले, 'आमच्या सभासदांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा रक्तगट आम्ही आमच्याकडे नोंदवून (नोंदवही दाखवतात) ठेवला आहे. आमच्या सभासदांपैकी ज्याला गरज लागेल त्याला वेळीच रक्त मिळेल अशी व्यवस्था आम्ही करतो. आमचे सभासद त्यासाठी तत्परतेने पुढे येतात. आमचा अनुभव चांगला आहे एकूण माणसे प्रामाणिकपणे, चोखपणे, शिस्तीत वागतात. एकत्र राहण्याचा, सहजीवनाचा आनंद लुटतात.' गप्पांचा समारोप करताना श्री. लाळे मोठया आनंदाने आणि अभिमानाने म्हणाले.

ह्या प्रश्नाच्या संदर्भात मी काही मित्रांशी बोललो. त्यांचे म्हणणे असे आहे की अशा तऱ्हेच्या संघटनांचे कार्य स्तुत्य, योग्य आणि उपयुक्तही आहे, पण त्यामुळे व्यापाऱ्यांना जरब बसत नाही, कारण हे काम 'दर्यामे खसखस,' मूठभर साखर टाकून सागराचे पाणी गोड करण्यासारखे, असे आहे. त्यासाठी ग्राहकाला जागा करून, क्रियाशील बनविले पाहिजे. ग्राहकाचा अंकुश व्यापाऱ्यावर असला पाहिजे सरकार नावाच्या यंत्रणेवर, फार मोठया भांडवलदारावर ग्राहकाचा सतत दबाव आला पाहिजे. त्यासाठी आवश्यक ती एकजूट घडवून आणली पाहिजे. डोंबिवलीत अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत, नव्याने आकाराला येत आहेत. त्या संस्थांनी घरबांधणी करतानाच अशा ग्राहक संघटनेच्या भांडार, वितरणासाठी जागा राखून ठेवली पाहिजे. प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्वतःची ग्राहक संघटना निर्माण झाली पाहिजे. छोटया मोठया उद्योजकांनी, ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्यांनी आपणहून अशा ग्राहक संघटनांशी संपर्क साधला पाहिजे. उत्पादक आणि ग्राहक असा संपर्क साधला पाहिजे. मध्यस्थी, दलाल, वितरक खरा लोण्याचा गोळा मटकावतात, त्यांना दूर सारले पाहिजे. तरच ग्राहकाचे खरे हितसंरक्षण होईल. नाहीतर 'ग्राहक राजा' हे शब्द फक्त कागदावरच राहतील आणि त्यांचा भडकत्या महागाईविरुद्धचा बेंडबाजा तसाच वाजत राहील. डोंबिवली हे गाव उपऱ्यांनीच वाढीस लावले आहे. त्यांनी वेगवेगळया कारणासाठी, हेतूसाठी एकत्र आलेच पाहिजे. सेल्फ कंटेंड नामक बंद दरवाज्यात बंदिस्त राहून कोणताच प्रश्न सुटणार नाही. उघडयावर येणार नाही. ह्या मित्रांच्या ह्या म्हणण्यात खूप तथ्य आहे यात शंकाच नाही. शनिवार रविवारच्या सुट्टीचा उपयोग अशा कामासाठी करता येईल. सेवानिवृत्त झालेले पण ज्यांची शारीरिक आणि मानसिक स्थिती चांगली आहे, आर्थिक विवंचना ज्यांना भेडसावत नाही अशा सेवानिवृत्तांनी खरे तर पुढाकार घेतला पाहिजे. आपले प्रश्न आपल्यालाच सोडवावे लागतील. राजकीय पक्ष नामक बदनाम संघटना आणि सरकार नामक लोकांची थोर वंचना, दिशाभूल करणारी संस्था हे करणार नाही. बहिष्काराचे प्रभावी हत्यार आपल्याजवळ आहे ह्याचा विसर सामान्य माणसांनी पडू देऊ नये एवढेच म्हणावेसे वाटते.

—चंद्रशेखर राजे

# हरिश्चंद्राचे रांजण रिकामेच !

हरिश्चद्रगड महाराष्ट्रात सुविख्यात आहे. अवघा डोगर पाण्यानं भरलेला आहे. गडावर हरिश्चद्रश्वराचं प्राचीन मदिर. बारापंधरा लहानमोठ्या गुहा. रचना पुरातन विद्यापीठासारखी. सर्वसोयीनी युक्त स्नान-सध्या, जपतप, ध्यानसमाधी या सगळ्या-साठी ज्ञानेश्वरानी वर्णिलेल्या 'निगूढ मठ' सारखे रम्य स्थल. स्नानासाठी वेगळी कुडे. पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी कोकण कड्याजवळ विस्तीर्ण तलाव. पाणी आड-वायची भित कोसळल्याने आता कोरडा. विस्तीर्ण पठारावर मन प्रसन्न होत, मुग्ध होत. गडाची तीन शिखरं 'तारामती', 'रोहिदास' आणि 'हरिश्चद्र' अशी, हरि-श्चद्राची कथा चित्ररूप करणारी. हरिश्चद्राचे पाण्याचे राजण प्रसिद्ध. ह्या हरिश्चद्राने महाराष्ट्राला 'मुळा' नदी दिली. 'मुळा डॅम' प्रकल्प उभा राहिला. अक्षय दुष्काळी नगरला 'उदड जाहले पाणी 'एम. आय. डी सी.' करावया' नगरशहरातले लोक मुळेच गोड पाणी पिऊन सुखी आहेत. पाणी मुळेच हलक. फेस चागला होतो! कपडे स्वच्छ! साराच रूबाब! मुळेनं दिल जिल्ह्यानं घेतल. शेत हिरवीगार झाली. जोरदार पेमेट मिळायला लागल!

हरिश्चंद्राच्या डोंगरपायथ्याला गाव मोठी नामी. तळ, विहीर, कोथळ, आवित, पाचनयी अशी बारापधरा. हरिश्चद्रावर नितात श्रद्धा ठेवून अनतकाल जगत आलेली. आदिवासीची गावं, डोगर उतारावरची. महादेव कोळी, ठाकर रानचे राजे. दिलदार, उदार हरिश्चद्राचे वशज जणू. आपल्या गुराढोराच्या कुटुबासह जगताहेत जीवन निष्ठेन–

आमुच्या गावा मदिर, पाहुणा यायाचा
पायी र
पर उपाशी जायाचा नाही रं — अस

जीवन सांभाळीत.

हरिश्चद्रगडाच्या भोवताली राहणारे हे हरिश्चद्र तहानेनं व्याकूळ झालेले! उन्हा-ळ्यात निसर्गाचा कोप जीवन जाळतो. खळाळून झेपावत लोट घेऊन जाणारी मुळा दूर थेंबानं ठिबकत जाते. मुळेच पात्र तर 'पुरा गत्र स्त्रोत:' असे कोरडेठाक होते. मुळा डॅम मात्र भरलेला असतो आणि गडा-वर पाण्याची टाकीही भरलेली असतात. पण डॅम दूर पाणी पुरवीत असतो आणि चार-सहा मैलाचा उरावरचा चढ चढून गडावर पाणी प्यायला आणि पाणी आणायला जाणे शक्य नसते. दिसतं पण मिळत नाही. निसर्ग जणू खिजवत असतो विश्वामित्रासारखा!

कोळी, ठाकर बाया बाप्ये पाण्यासाठी रानोमाळ जीवाच रान करीत हिंडत अस-तात. घरातल अन्न सपत आलेलं. रानातलं पाणी सपत आलेलं पान-काळ्याच्या स्वागतासाठी वावरातल काम घाईवर आलेलं. मग आमचा ठाकर खेकडीच पेंद धाव (वीळ) शोधत हिंडतो. धाव दिसल की खोदायला लागतो. कारून अगदी. रण-रणत्या उन्हात डोगर पोखरायला सुरुवात होते कमरेएवढ, छाताडाएवढं खोल खोदत गेल की पाणी लागत हंडा दोन हडे, त्याच्याच आश्रयानं खेकडी असतात पाचसात त्याच्याच जीवनावर जीवन जगविण्याचा प्रयत्न करतो.

'अवदा' दुष्काळ भयाण! झरा, झुतरी, विहिरी सारच आटल. आभाळ कोसळलच नाही. दूर पळाल दुष्काळी कामं सुरू झाली ती गावापासून तीन तीन चारचार मैलावर. टॅकरनं पाणी पोचविण्याची हमी घेतली शासनान, पण या वनवासीपर्यंत टॅकर पोचायला नीट रस्ता तर हवा असतो हे आम्हाला कुठ माहीत आहे!

बोडक्या डोगराच्या खडकावर डोकं आप-टीत जगणाऱ्या आदिवासीनी काय काय करायचे? असलेल्या धान्याच्या भाकऱ्याची पेंडकी बाधून पोराबाळासह चार मैलावरच्या दुष्काळी कामावर जायचं की पाणी शोधीत फिरायच आणि जीवापाड जपलेल्या, त्याचं जीवन जगविण्यासाठी आधार असलेल्या जित्रापाना कस साभाळायचं? बिचारी जित्राप वाळ्ळचिळ्ळ खातात अन् पाण्या-साठी चारचार सहासहा मैल रान तुडवीत जातात उन्हाच्या कहारात! गायख्या बिचारा जातो त्याच्या माग.

'दुष्काळ पाहणी टूम' सध्या सुरू आहे. आम्ही का माग असावं म्हणून फटका मारून आलो 'हैड्रो इलेक्ट्रिक प्रोजेक्टवर' एक इजिनियर मित्र आहे त्याला भेटलो. चर्चा झाली, हळहळ व्यक्त केली. सहज उपायाची पृच्छा केली. आदिवासीच्या तोडचे आणि डोळ्याचे पाणी केव्हाच पळालय. आमच्या डोळ्यात त्याच्यासाठीची भरल्या-पोटीची टीपे त्याच्यापर्यंत कशी पोचावीत. असो. सुदैवान इजिनिअर मित्रान नेमणूक झाल्यापासून उत्सुकतेनं म्हणून का होईना परिसर पायाखाली घातला होता त्याला पाचनईतला अनुभव सागितला. पाचनईजवळ मैल दीड मैलावर खोल अडचणीत अशी एक कपार आहे. तिथं झुळझुळत दाभण धारेच पाणी. (पाण्याची सोय!) एकावेळी तिघातिघानी पाणी भरायच. (नळावरची भाडण आठवा.) कसं? — एकानं खाली उतरायच. वाटीनं खड्डयात साठलेलं पाणी हुड्यात भरायच. त्याच्या डोक्यावर कपा-रीला बारीकशा आधारानं दुसऱ्यान उभं रहायच, तिसऱ्यानं त्याच्या डोक्यावर सपा-टीला उभ रहायच हंडा भरला की पहि-ल्यान वर हात करून हडा पेलून वर द्यायचा. डोक्यावरच्यानं अडचणीत अवघडलेपणे कष्टाने मिळवलेल्या पाणीभरल्या हड्याचा आणि स्वत चा तोल सावरीत पाणी पेलायचं आणि डोक्यावर सपाटीवर उभ्या असल्या-जवळ द्यायचं. अस एक दोन तीन हडे पाणी भरायच आणि ते हडे डोक्यावर घेऊन पुन्हा पायपीट करीत गावात यायचं. पाचनईत पाणीभरल्या हरिश्चद्राच्या पायथ्याशी ही तऱ्हा! टॅकर पोचायला जागाच नाही नीट!

## दादफिर्याद कोणाला?

तेथून पुढे आबीत आणि शिरपुजे डोंगरा-पासून सहा मैल दूर, तिथ आठवड्यात कधी तरी टॅकर येतो. पावसाळ्यात धुवाधार पावसाच्या पाण्यात जलचरा-सारखी जगणारी आदिवासी माणस टॅकर-भोवती जमून पाण्यासाठी भाडतात. पोटात कालवत.

इजिनिअर मित्रान विचार केलेला दिसला. त्यान सागितल, 'अरे, या भोवतालच्या गावाना पाणी पोचवण फार सोपय. त्याला अगदी मोटार नको, इंजन नको, काही

नको, फक्त हरिश्चद्राच्या टाक्यामधून सायफन करायच गावापर्यंत. प्यायला पाणी, माणसाना आणि जनावरानाही मिळेल फक्त गडावर कट्रोलिग स्टेशन करून माणूस ठेवावा लागेल '

त्याच म्हणण ऐकल. मनात विचार आला. एव्हढं सोपय मग मायबाप इग्रजाचं राज्य जाऊन अडोतीस वर्षं उलटली. आदिवासीचा प्रतिनिधी या राखीव मतदारसघातून निवडून जातो. मागच्या नऊ महिन्यात (निलगेकर मत्रिमडळात) तर मा. आ. पिचडसाहेब मत्री होते, या मतदारसघान बहुधा रुलिग पार्टीच्या बाजूनंच कौल दिलाय. मग अस, इतक सोपही का घडू नये. म्हणून मी आणि माझा मित्र वार्ताहर श्री. मगन येलमामे मा. आ. पिचडसाहेबाकडे गेलो. चर्चा झाली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यानीही इजिनिअर मित्राने सुचवलेला उपाय सुचविला. मग म्हटल, 'अहो, मग अडचणी काय आहेत ?' उत्तर मिळाल, 'भाडल पाहिजे !'

मनात प्रश्न आला खरच आदिवासीची दादफिर्याद कुणाला आहे का ? हा भाग राजकीय दृष्टया जागृत समजला जातो. रतनगडाचा किल्लेदार गोविंद खाडे याने पेशवाईनतर १८२० ते १८३५ मध्ये इग्रजांविरुद्ध कोळयाचा उठाव घडविला. भूमिगत चळवळीच्या वेळी नासिक, नगर जिल्ह्यातले कार्यकर्ते, अगदी माजी केंद्रीय मत्री अण्णासाहेब शिदे याच्यासकट या भागान साभाळले. कम्युनिस्टाच्या चळवळी झाल्या. एकदा तर भाडण्यासाठी आणि प्रश्न माडण्यासाठी प्रसिद्ध असलेले कॉ. बी. के देशमुख निवडून गेले त्यानी विधानसभा गाजवली. सर्वोदय योजना १९५१ पासून भागात सुरू झाली आणि मा. बापूसाहेब शेंडे आणि श्री. रा. वि. पाटणकरासारखे कार्यकर्ते लाभले. माझ्यासारख्या मास्तराने 'चाळीसगाव डागण—सास्कृतिक वाङमयीय आणि भाषिक अभ्यास' या प्रबंधातून आणि पुढे यावर आधारित 'डागाणी' आणि 'अहिनकुल' या कादबऱ्यामधून या प्रश्नाना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. हे सार असूनदेखील अनेक वेळा ओल्या आणि अनेक वेळा कोरडया दुष्काळाला तोड देत येथील आदिवासी जगतोय गावागावात जगणाऱ्या सामान्य आदिवासीनी तर 'देवाची करणी' म्हणून सार सोसायचं ठरवलय. दुष्काळी काम, अर्ज, मोर्चे, भाषणं, आश्वासनं या साऱ्या गोष्टीना ते कटाळले आहेत त्याना आशेचं गाजरही नको आहे त्याना हवय जीवन ! ते फक्त परमेश्वरच देऊ शकतो एवढच त्याना ठाऊक आहे म्हणून दैवावर हवाला ठेऊन हाल सोसत कळसाईला, हरिश्चद्रेश्वराला नवस करीत आदिवासी आनंदान जगताहेत ! त्याची कोणतीच तक्रार नाहीये !

राजकारणी, समाजसेवक आणि माझ्यासारखे शब्दाचे बुडबुडे फोडणारे लेखक, वार्ताहर फक्त आदिवासी आणि त्याचे प्रश्न, त्याची वंचना, त्याची पिळवणूक या सगळया गोष्टीविषयी अकाडताडव करीत आहेत आणि शासन टँकरने पाणी पाजण्याचा प्रयत्न करीत आहे केविलवाणा! कागदोपत्री समाधान !

स्वातत्र्य मिळवून देणाऱ्या सह्यगिरीच्या उच शिखराच्या आश्रयाने राहणारे वनवासी खरोखरीच 'वनवासी !' आहेत

तसे नसते तर गेल्या अडोतीस वर्षात टँकरने पाणी देण्यात झालेल्या खर्चातून सहज प्रत्येक गावात पिण्याच्या पाण्याची कायमची सोय झाली असती. वादग्रस्त नसूनही रेंगाळलेले (म्हाळादेवी की निळवडेसारखे) 'आबीत धरण' केव्हाच पूर्ण झाले असते. भडारदरा तलावातले पाणी काठावर राहाणाऱ्या परिसरातील आदिवासीच्या बत्तीस गावाना लिफ्ट करून सहज देता आले असते. पण आम्हाला फक्त विकासाची हाकाटी पिटायची आहे सत्तेसाठी ! सत्तेसाठी आदिवासीचा प्रश्न तोडी लावायला हवा आहे.

सत्तेचेच तूप। सत्तेचीच पोळी।
मानव्याची होळी अहर्निष ॥
हे आमचे ब्रीद आहे.

म्हणूनच हरिश्चद्राचे राजण केवळ त्याच्या दुर्दैवाने त्याच्यासाठीच रिकामे आहेत !

—डॉ. अनिल सहस्रबुद्धे

अहो येता जाता

# क्षणभर थांबून

फिरोझ रानडे

डाव आणि उजव आयुष्यात सगळीकडेच दिसतं. साधारणपणे डाव म्हणजे कमी प्रतीच आणि उजव म्हणजे चागल्या प्रतीचं असं मानण्याची पद्धत आहे ह्याला अपवाद म्हणजे राजकारणाच क्षेत्र येथे डाव्याला व डावे असण्याला फार महत्त्व आहे. डाव्याना आपण डावे आहोत ह्याचा फार अभिमान असतो

सर्वसाधारण अर्थाने डाव—उजव प्रखरतेने जाणवतं ते मुबईच्या हायकोर्टाच्या समोरच्या रस्त्यावरून जाताना. त्या रस्त्याला कोणा शिक्षणप्रेमी पाटील नावाच्या सज्जन माणसाच नाव दिल आहे डॉ. आबेडकराच्या पुतळयापासून तुम्ही चर्चगेटकडे जाऊ लागलात तर उजव्या हाताला प्रथम सायन्स इन्स्टिटयूट लागते, नतर जुने सेक्रेटरियेट, सेशन्स कोर्ट, मुबई विश्वविद्यालयाची इमारत व राजाबाई टॉवर व शेवटी हायकोर्टाची भव्य इमारत ही झाली रस्त्याची 'उजवी' बाजू

मध्ये फूटपाथ, रस्ता, परत फटपाथ व नतर ओव्हल मैदान हे डाव्या बाजूला ओव्हल मैदानाच्या डाव्या बाजूला असलेल्या फूटपाथच्या कुपणावरच्या झाडीच्या छायेत कित्येक, झोपडपट्टीसुद्धा न बाधता, बायका—मुलासह राहाणारे कित्येक झोपडपट्टीवाले !

म्हणजे बघा. उजव्या बाजूला विज्ञानशाळा आहे, विद्वान शाळा आहे, शासनालय व कनिष्ठ आणि वरिष्ठ न्यायालय आहेत व डाव्या बाजूला झोपडीसुद्धा नसलेले भारताचे नागरिक आहेत. शरद जोशी म्हणतात त्याप्रमाणे ह्या रस्त्याच्या एका बाजूला इंडिया व दुसऱ्या बाजूला भारत

खरं म्हणजे ह्याला भारत म्हणणंसुद्धा जास्तीचंच आहे. उजव्या बाजूला इतक्या सगळ्या भारदस्त संस्था असून त्याचा डाव्या बाजूच्या लोकांना काही म्हणजे काही उपयोग नाही !

ह्याच रस्त्यावर बसेसचे अगणित थांबे आहेत. आमच्या घराच्या बाजूला जाणाऱ्या बस–थांबा पण ह्याच रस्त्यावर आहे.

अशीच दुपारची वेळ होती. मे महिन्यातली दुपारची वेळ म्हणजे ऊन रणरणत होतं हे सांगायला नकोच. तशा तापदायक उन्हाचा बोजा डोक्यावर घेऊन मी माझ्या बस–थांब्याकडे चाललो होतो. तेवढ्यात आमच्या घराकडे जाणारी बस येताना दिसली. मी झपाझपा पावले टाकू लागलो. ही बस काही झालं तरी पकडायचीच हे मी मनाशी पक्कं केलं व चालण्याचा वेग आणखी वाढवला.

चार–पाच पावलं टाकली आणि क्षणभर थांबलो व विचार केला की अरे ही बस गाठण्याकरता मी जीवाचा इतका आटापिटा का करतो आहे ? समजा नंतरच्या येणाऱ्या बसने गेलो तर दहा – पंधरा मिनिटांपेक्षा जास्त काय फरक पडणार आहे ?

झालं. हा विचार मनात आला आणि माझ्या चालण्यातली गती तर मंदावलीच पण मन मंदावलं आणि शरीर हलकं झालं आणि आश्चर्य वाटेल पण मला जाणवणारा उन्हाचा तापही एकदम कमी झालासा वाटला.

मी आता शांत चित्ताने, थंड डोक्याने व हलक्या शरीराने थांब्याकडे जाऊ लागलो. पण आजूबाजूचे लोक मुंबईच्या पद्धतीप्रमाणे धावपळीनं चालले होते. चर्चगेट स्थानकाकडे किंवा बस थांब्याकडे. म्हणजे सगळे आपआपल्या घरांकडे चालले होते. ऑफिसला येताना घाईनं येणं–धावपळीनं येणं आवश्यक असतं पण परत जाताना ? त्याकरता जीवाचा इतका आटापिटा कशा करता ? पण क्षणभर थांबून विचार करतो कोण ? मनात आलं माणसाला कोणीही यंत्र बनवत नाहीं तो आपण होऊनच यंत्र बनतो.

काहीतरी दहा–पंधरा मिनिटानं बस आली. बस येथूनच सुटणारी त्यामुळे हव्या त्या खिडकीशी बसता आले.

बोरीबंदरला लाल दिव्यामुळे बस थांबली. तेथे तर गर्दीचा नुसता पूर होता. सगळे नुसते धावत होते. कुठे, तर घरी जायला ! लालचा हिरवा झाला. बस सुरू झाली आणि थांबली ती टाईम्स ऑफ इंडियाच्या भव्य इमारतीसमोर.

बसच्या खिडकीतून त्या इमारतीच्या तळमजल्यावरची छपाईची यंत्रे दिसत होती. त्यातले कागद पण प्रचंड वेगाने धावत होते. ह्याच वेगाने वरच्या मजल्यावरची संपादक व त्यांची साथीदार मंडळी आपली कामं करत होती. दररोजचा अग्रलेख ठराविक वेळी देण्याची जबाबदारी संपादकांची होती, ठराविक वेळी तो छापला गेला पाहिजे, ठराविक वेळी तो स्टेशनवर पोहोचला पाहिजे वा ट्रकमध्ये पडला पाहिजे.

ह्या सगळ्या गोष्टी प्रचंड वेगाने व्हायला पाहिजेत. मग तो अग्रलेख राजीव गांधींना पंजाब प्रश्न सोडवण्याबद्दल सल्ला देणारा असो नाहीतर नाशिकच्या रथयात्रेबद्दल भावनेला आवाहन करणारा असो. लेख ठराविक वेळी तयार झालाच पाहिजे व असे वर्षोन वर्षे चालले पाहिजे.

कधी कोणी संपादक क्षणभर थांबून विचार करतो का की, अगदी दररोज अग्रलेख लिहियलाच पाहिजे का ? समजा एखाद दिवस योग्य विषय मिळाला नाही म्हणून अग्रलेख नाही लिहिला तर चालणार नाही का ? खरं म्हणजे चालेल पण त्या संपादकांचं मनच चालू देणार नाही.

म्हणजे तळमजल्यावर छापण्याची यंत्रे व वरच्या मजल्यावर लिहिण्याची यंत्रे दोघंही प्रचंड वेगानं पळणारी.

पुढे क्रॉफर्ड मार्केट, महंमद अली रोड, पायधुनी सगळीकडे अगदी जीव टाकून येणारी–जाणारी माणसं सगळ्यांना कसली तरी घाई. अगदी जीवाच्या करारावर बस पकडण्याची घाई व त्याकरता वेळ पडला तर जीव गमवण्याचीही तयारी.

माणूस क्षणभर थांबून स्वतःशी विचार करायचंच विसरून गेला आहे. नुसते संपादकच नाहीत तर कचेरीत काम करणारे, खाजगी उद्योगधंदे करणारे, राजकारणी, समाजकारणी, गिरणी मालक आणि अगदी गिरणी कामगारसुद्धा.

गार वारा व बसच्या एका तालाच्या धावण्याने माझा डोळा लागला. तो अगदी अंधेरी येईपर्यंत. अंधेरी आलं तरी मी झोपलेलाच आहे बघून कंडक्टर म्हणाला, ‘साहाब, अंधेरी आ गया, अभी तो उतरीये हमको जल्दीसे वापस जाना है ।’

मी घाई घाईने उतरलो व जुहूच्या बस थांब्याकडे जाऊ लागलो.

□

## वेशीबाहेरचे एक पान

**चां**भाराच्या देखण्या सकूचं लगीन ठरलं.

त्याचं कोडं देशमुखाच्या पोराला पडलं. सकूच्या आयी–बाला मात्र हलकं हलकं वाटलं. ते निसकाळजी झालं. चांभाराच्या गल्लीत वाढलेली ही पोरगी गावाला खूळ लावल्याली. देशमुखाच्या पोराला डसल्याली. तिच्या रूपानं गावातल्या सगळ्या पोराची टक्कूरी फिरल्याली.

लगीन ठरल्यावर देशमुखाच्या पोरानं मरपतर ठेवून घेतो म्हणून सकूच्या आई–बाला सांगावा धाडला हुता. ‘ आमच्या घरातला इस्तू गावात ठेवायचं नाही ’ असा परतीचा सांगावा देशमुखाच्या पोराला आला मग नदीबुडाच लोण्यासारखं पाच एकर रान पोरीच्या नावावर करतो म्हणून मध्यस्थी धाडला. पर सकूच्या घरचं कोण तयार झालं नाही. त्यांनी सारा–सार इचार केला. देशमुखाच्या पोराचं लगीन होऊन त्याला एक पोर बी झालय आणि त्यानं ठेवून घेतली तर ‘ रांड ’ म्हणूनच घेणार. त्यात आपूण चांभार. आमची दाद कोण घेणार. गाव देशमुखाच्या ताब्यात.

पोरीला न्हान येऊन दोन वरसं झाली होती. कैक घरं आली पर त्या साऱ्यांना देशमुखाच्या पोरानं दम दिला.

आकस्मात सकूची मामी दोन पोरं मागं ठेवून गेली. सकूच्या आईनं हे माहेर जोडलं आणि मामालाच सकूला द्यायचं ठरलं. कुणाकडनं तरी सकूला देशमुखाच्या पोरानं

सांगावा धाडला. 'लगीन विगीन करून घेतलीस तर याद राख म्हणावं.'

सकूच्या मनात बी बिजवर मामाला करून घ्यायचं म्हणजे जीवावरच आलतं. पर आई–बा धास्ती खाऊन मरून जातील म्हणून ती लगनाला तयार झाली होती. तसं आई–बानं तिच्याकडनं भंडाऱ्यावर हात मारून शपथ घ्यायला लावली होती– 'मामाबरोबर लगीन करून घेईन.'

म्हाताऱ्या देशमुखाच्या सूनला सकूच्या लगनाची तारीक समजली तसं तिनं सकूला केळवणाला निमत्रण दिलं. सकूच लगीन ठरलंय आता ते झालं आगि ती एकदा नांदाय गेली म्हणजे माझी रांक लागल. सकूचं रुप तिनं ऐकल होतं. बघितलं नव्हतं. ते बी बघायला मिळल. असली कसली रूपवान ? याचं कोडं तिला पडलं होतं.

दुपारच्या वक्ताला परड्याच्या दाराला सकू आली. देशमुखाच्या सुननं तिला बसाय सांगितलं. आपल्याला हे रूप लई उजवं हाय हे देशमुखाच्या सुनेनं ताडलं आपली स्वारी सकूसाठी पिसाटल्यासारखी का होते याचं कोडं उलगडलं.

तिला जेवायला वाढलं. रूप न्याहाळत इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्या. खणा–नारळानं वटी भरली. आयर म्हणून चांदीच्या पट्टया दिल्या.

देशमुखाच्या पोराला दुसऱ्या दिसी हे सारं समजलं, 'तुम्हाला घरंदाजपणा नाही, कुणाची परवानगी घेतली होती ?' वगैरेचे वादळ उठलं. देशमुखाचा म्हातारा मध्ये पडला. वाद संपला पण तवापामनं देशमुखाचं पोर बायकूला बायकू म्हणना. कवा तरी बायकूला शिवायचं ते बी बंद झालं.

सकूच्या लगीनचिठ्ठ्या चांभारवाड्यातनं बाहेर पडल्या. देशमुखाच्या वाड्यातबी आली. आणि देशमुखाच्या पोरानं आपल्या साऱ्या पिढीचं गुण–अवगुण त्यानं पणाला लावलं. तो तडक उठला. सकूच्या घरात गेला. सकूला बाहेर बोलवलं. सकूचं आई-बा घाबरलं सकूला दारात उभं राहूनच काय तरी सांगून तो गेला.

सकूच्या आई–बानं इचारलं, 'काय म्हणत हुता देशमुख.' तसं सकूनं सांगून टाकलं, 'म्हणत होता, पैका–बियका कमी पडला तर कळव. लगनाचा खोळंबा होऊ नये म्हणून इचाराय आलोय. हे ऐकून सकूच्या आई–बाला समाधान वाटलं.

आज लगीन. वेशीच्या तोंडाला चांभारवाडा. मांडवात भाणभांची दाटण झाल्याली. अक्षताची येळ झाल्याली. नवरा–नवरी सजल्याली. साऱ्या मांडवाचं लक्ष सकूच्या रूपाकडं लागल्यालं दोघांच्या मधी पांढरं घोतर धरलं. पुजाऱ्यानं 'शुभमंगल सावधान' पहिलं कडवं संपवलं– तांदूळ दाणे मांडवभर पडाय लागले आणि सकू घुमाय लागली... अंगात देवी आली. पुजाऱ्याला काय समजंना, सकूचा मामा वरडून म्हणाला, 'अंगात येत्याली बायकू नगं मला ? तो बाव्हल्यावरनं बाजूला झाला. देशमुखाचं पोर वेशीजवळ हासत उभं होतं.

—बापू जाधव

किर्लोस्करवाडी


## यंदाचे विज्ञान ग्रंथालीचे पारितोषिक विजेते राजहंस प्रकाशन

टारझनच्या हातात एक पुस्तक पडलं....
पांढऱ्यावर काळे विचित्र आकार पाहून तो
बुचकळ्यात पडला.
येत्या काही वर्षात आपण सगळेच टारझन ठरू
की काय ?
अनोळखी वस्तू, अनोळखी भाषा आणि गूढ
वाटणाऱ्या शक्ती असलेलं एक जग आपल्या
जगात घुसत चाललेलं आहे.
हे आहे कॉम्प्युटरचे जग.
एक लक्षात घ्या. या कॉम्प्युटरमध्ये काहीही
जादू नाही.
ते केवळ एक यंत्र आहे.
कर्ताकरविता माणूसच आहे.
या यंत्रात माहिती कशी घातली जाते इथपासून
ते हवी असलेली माहिती बाहेर पडेपर्यंत
प्रत्येक घटनेची माहिती सांगणारे आणि या
सगळ्याचा नेहमीच्या अनुभवांच्या आधारे
खुलासा करणारे पुस्तक

## या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय ?

**लेखक : राजीव साने**

किंमत : रुपये तीस

राजहंस प्रकाशन
पुणे

| | |
|---|---|
| १०२५ सदाशिव पेठ<br>नागनाथ पाराजवळ<br>पुणे ४११०३०<br><br>दूरध्वनी : ४४३४५९ | C/o श्री. वा. र. गोडे<br>४१ भवानीशंकर रोड<br>जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर<br>दादर (प.) मुंबई ४०० ०२८<br>दूरध्वनी : ४२२५४५५ |

# आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा कर्णधार कर्नल गडाफी

डॉ. श्रीकांत मुंदरगी

'आम्हाला विरोध करणाऱ्या प्रत्येक देशात आम्ही क्रांती घडवून आणू. जे आम्हाला मैत्रीचा हात देतात त्या देशात आम्ही तेलाची निर्यात करू. जे आम्हाला शत्रू मानतात त्या देशात आम्ही क्रांतीची निर्यात करू' हे शब्द आहेत लीबियाच्या नेत्याचे, मुअम्मर एल गडाफी याचे. साऱ्या जगाबरोबर भांडायला निघालेल्या या माणसाचा देश आहे मुठीएवढा. लीबियाची लोकसंख्या आहे केवळ अठ्ठावीस लाख, भारतातील एखाद्या मध्यम वस्तीच्या शहराएवढी; पण या माणसाच्या वल्गना मात्र, आपण साऱ्या जगाचे सम्राट आहोत, अशा थाटाच्या असतात.'

इजिप्तचे अध्यक्ष अन्वर सादात यानी आपलं आयुष्य मध्यपूर्वेत वेचलं. या शांततेच्या शिल्पकाराच्या शोकांतिकेमुळं सारं जग शोकसागरात बुडून गेलं, त्यावेळी फक्त लीबियाच्या राजधानीत आनंदोत्सवाचे फटाके उडाले. आनंदानं बेहोश झालेले गडाफी म्हणाले, 'अरब जगताचा कट्टर शत्रू आज आपल्या मरणानं मेला.' त्याची ही जगावेगळी प्रतिक्रिया पाहून साऱ्या जगाला शंका आल्यावाचून राहिली नाही की, 'सादाताच्या हत्येमागं गडाफीचा तर हात नसेल ?' अशी शंका जगाला येणं हे अगदी गैरवाजवी आहे, असं म्हणता येणार नाही. कारण साऱ्या अरब जगताचं नेतृत्व आपल्याकडे असावं, हे गडाफीचं फार वर्षांपासूनचं स्वप्न आहे, हे साऱ्या जगताला ज्ञात आहे. नासरनंतर हे नेतृत्व आपल्याकडं आपोआप चालत येईल असं त्याना वाटत होतं; पण सादाताच्या कुशल अन् कठोर राजनीतीमुळं हे पद सादात याच्या पदरात पडलं. त्यामुळं गडाफी सादाताना पाण्यात पाहू लागले. कॅम्प डेव्हिडच्या करारानुसार मध्यपूर्वेत शांतता तह होताच सारी अरब राष्ट्रे सादातविरोधी बनली. या गोष्टीचा फायदा घेऊन अरबांचं नेतृत्व आपल्याला मिळावं म्हणून गडाफीनी पुन्हा नव्या जोमाने प्रयत्न सुरू केले.

## तिसऱ्या महायुद्धाची नांदी ?

अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राशी टक्कर द्यायला आपण मागंपुढं पाहणार नाही, असं गडाफी आपल्या वाणी अन् करणीनं दाखवण्याचा प्रयत्न करू लागले. लीबियाजवळच्या समुद्रातील आंतरराष्ट्रीय पाण्यावर अमेरिकन वायुदलाशी लीबियाच्या विमानांनी मध्यंतरी केलेल्या चकमकी या दृष्टीनं अतिशय बोलक्या आहेत. म्हणूनच जगातील अनेक श्रेष्ठ अन् ज्येष्ठ राजनीतितज्ज्ञ म्हणू लागले आहेत, 'तिसऱ्या महायुद्धाला कदाचित गडाफीच कारणीभूत ठरू शकतील'

मधूनमधून अमेरिकेविरुद्ध उठणाऱ्या गडाफीच्या आरोळ्या ऐकल्या की, सर्वसामान्य माणसाला असं वाटेल, 'जंबुक करी गर्जना, जोवरी नाही देखिले पंचानना' पण अमेरिकेसारख्या सर्वसामर्थ्यवान राष्ट्रालादेखील लीबियाच्या या कोल्ह्यानं आपल्या दहशतवादी कृत्यानं हैराण करून सोडलं आहे. अमेरिकेच्या मनात आलं तर चिलट चिरडल्यासारखं लीबियाचा संपूर्ण नाश करायला त्याना काही क्षण देखील पुरेसे आहेत, पण अमेरिकेची अवस्था, नाकाशी डास गुणगुणणाऱ्या सिंहासारखी झाली आहे लीबियासारख्या चिमुकल्या देशाचा नाश करायला जावं अन् साऱ्या जगाची हेटाळणी पदरात घ्यावी, असं होईल. शिवाय रशिया तिसऱ्या महायुद्धाची तयारी करणारच नाही, याचीही खात्री नाही. तसंच स्वस्थ बसावं तर गडाफीची दहशतवादी कृत्यं वाढतच जाणार आहेत. म्हणजे अमेरिकेच्या दृष्टीनं लीबिया म्हणजे 'असून अडचण अन् नसून भडका' अशी अवस्था झाली आहे

वास्तविक तसं पाहिलं तर गडाफीचं शत्रुत्व प्रत्यक्ष अमेरिकेशी वा सादात आणि आता हुस्ने मुबारकसारख्या समजुतदार अरब नेत्यांशीही नाही. त्याचं खरं शत्रुत्व आहे इस्त्रायलशी दिवसरात्र गडाफीच्या ध्यानीमनी एकच विचार जागता असतो. एकच स्वप्न तरळत असते त्याचा ते वारंवार पुनरुच्चारही करत असतात 'नाश... संपूर्ण नाश...इस्त्रायलचा संपूर्ण नाश ! म्हणूनच जे जे इस्त्रायलचे मित्र आहेत त्याना ते आपले शत्रू समजतात.

काही वर्षांपूर्वी युगांडाच्या मदांध आणि सत्तांध सत्ताधीशानं आपल्या अविचारी अन् अविवेकी कृत्यामुळं जागतिक प्रसिद्धीचा (?) प्रखर प्रकाशझोत आपल्यावर पाडवून घेतला होता. इदी अमीनच्या वेडगळ अन् बेदरकार वागणुकीमुळं सारं जग काही काळ थक्क होऊन गेलं होतं भारतीयांची ससेहोलपट व एन्टेबीचं नाट्य, ही दोन उदाहरणं जग कधीही विसरू शकणार नाही अगदी अशाच तऱ्हेचे प्रकार आता गडाफी घडवून आणू पहात आहेत. साऱ्या जगानं सतत आपल्याविषयी विचार करावा, जगातील साऱ्या वृत्तपत्रांनी आपल्या वार्ता प्रसृत कराव्यात, टी व्ही. नी आपली छबी नेहमी प्रदर्शित करावी अन् आकाशवाणीनं आपली वाणी नेहमी जगाला ऐकवावी, अशी गडाफीची सदैव इच्छा असते.

पण असला तऱ्हेवाईकपणा अन् चमत्कारिकपणा असूनसुद्धा या माणसाजवळ वाखाणण्याजोगे काही गुणही आहेत, हे विसरून चालणार नाही.

लीबियासारख्या अत्यंत छोट्या, अत्यल्प लोकवस्तीच्या वैराण व वाळवटी देशाला जगाच्या नकाशात मानाचं स्थान मिळवून देण्यात गडाफीचा फार मोठा हातभार लागला आहे, हे कोणाही राजकीय विचारवंताला नाकारता येणार नाही. अर्थात हेही

तितकच खरं की, गडाफीच्या कणखर नेतृत्वा-इतकच लिबियाच्या वाळवटी जमिनीखालील तेलाचे प्रचड साठे हेही लिबियाला जागतिक महत्त्व मिळवून देण्यास कारणीभूत ठरले आहेत. १९८० मध्ये लिबियान या तेलाच्या जोरावर सोळा हजार कोटी रुपये इतक परकीय चलन प्राप्त करून घेतल या चलनाचा उपयोग गडाफीनी लिबियाला एक समृद्ध राष्ट्र बनवण्यासाठी केला गडाफी सत्तेवर येण्यापूर्वी इद्रिस सुलतानाच्या कार-किर्दीत लिबिया हा दैन्य अन् दारिद्र्यान गाजलेला देश समजला जात होता. वैयक्तिक वार्षिक उत्पन्न लक्षात घेता लिबियाची, समृद्धीच्या दृष्टीन इतर सर्वसाधारण देशात सुद्धा गणना केली जात नसे. तेच राष्ट्र आज जागतिक समृद्धीच्या दृष्टीनं पधराव्या क्रमाकावर येऊन बसले आहे. याचाच अर्थ हे वैभव व भरभराट गडाफीच्याच कर्तृत्वाचे फळ आहे.

## बडं स्वप्न

इद्रिसच्या काळात लिबियातील सर्व-सामान्य मनुष्य अत्यत हलाखीचं जीवन जगत होता. सुलतान व त्याचे मूठभर सहकारी याच्या हातात लिबियाची सारी सत्ता अन् सपत्ती एकवटली होती सामान्य माणसाला शिक्षण व वैद्यकीय सुविधा तर सोडाच, पण अन्न, वस्त्र, निवाऱ्यासारख्या दैनदिन गर-जेच्या गोष्टीदेखील मिळत नव्हत्या पण गडाफीच्या कारकीर्दीत आज लिबियाचा कायापालट झाला आहे. उत्तम शाळा आणि अत्याधुनिक रुग्णालयाच्या इमारती लिबियात ठिकठिकाणी दिसून येतात. शिक्षण व वैद्य-कीय मदत शासनातर्फे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे वीस वर्षांपूर्वी पन्नास टक्क्याहून अधिक लोक बेकार होते. या घडीला लिबियातील बेकारी समूळ नष्ट करण्यात आली आहे. प्रत्येक कुटुबाला स्वत च्या मालकीच घर आहे जे पूर्वी भाड्याच्या घरात रहात त्याना त्या घराची मालकी देऊन टाकण्यात आली आहे प्रत्येक कुटुबाला मोटार-गाडी घेण्यासाठी शासन बिनव्याजी पैसे देते. ( आपल्याकड पैसे अन् व्याज देऊनही गाड्या मिळू शकत नाहीत. शासनाची मदत तर सोडाच. ) 'छप्पर फाडके' मिळालेल्या या समृद्धीमुळच असेल कदाचित, लिबियाच्या जनतेन आपल्या चक्रम नेत्याचे सर्व विक्रम (?) मोठ्या उदारपणे पोटात घातले आहेत. केवळ आपल्या देशाची सुखसमृद्धी वाढवून शात राहते तर ते गडाफी कसले ? घरच खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याची सवय असलेल्या या 'फुकट फौजदारान' जगातील इतर देशाच्या राजकारणात नाक खुपसण्यास सुरुवात केली. 'जे देश आमच तेल विकत घेत नसतील त्यानी आमची क्राती विकत घ्यावी. ज्या देशाना आमची मैत्री नको असेल त्यानी आमचं शत्रुत्व पत्करावं. ज्या देशाना आमच्याशी जमवून घेता येत, नसेल, त्याना आम्ही नमवून टाकू ' गडाफीच्या या असल्या इरसाल तत्त्वज्ञानामुळ लिबियाला मित्रापेक्षा शत्रूच जास्त आहेत.

सात वर्षांपूर्वी लिबियाच्या दक्षिण सर-हद्दीलगत असलेल्या छाड या दरिद्री अरब देशात गडाफीनी आपल सैन्य घुसवल आणि तो देश आपल्या वर्चस्वाखाली आणला. कारण काय ?... तर 'छाडमध्ये पधरा वर्षे चाललेल्या यादवी युद्धात तेथील मुसलमान जनतेला फार त्रास सोसावा लागला ' जगा-तील साऱ्या मुसलमान जमातीच्या रक्षणाची जबाबदारी जणू काही आपल्या एकट्यावरच आहे, असा आव गडाफीनी आणला त्याच्या या युद्धखोरीमुळ शेजारपाजारची नायजेरिया वा तत्सम छोटी राष्ट्रच नव्हेत, तर जगातील सर्वच शातताप्रेमी राष्ट्र हवालदिल होऊन गेली

या आक्रमणाच्या वेळी इस्लामधर्मीच्या सरक्षणाचा बुरखा त्यानी पाघरला असला तरी त्याचा अतस्थ हेतू जगाच्या ध्यानात आल्यावाचून राहिला नाही. छाडमध्ये असलेले युरेनियमचे प्रचड साठे गडाफीना छाडच्या प्रेमात पाडण्यास कारणीभूत ठरले आहेत. कारण...

काहीही करून अण्वस्त्रे पैदा करायचीच हे गडाफीच एक बड स्वप्न होतं त्यासाठी ते कसलीही किंमत मोजायला तयार आहेत चीनचे लागुलचालन करूनही पदरात काहीच पडल नाही, म्हणून त्यानी पाकि-स्तानशी सूत जमविल पण या दोन देशाच गुळपीठदेखील फार काळ टिकू शकल नाही. अध्यक्ष कार्टर यांच्या कारकिर्दीत अमेरिके-कडून चोरट्या मार्गानं अण्वस्त्राची गुपित मिळविण्यासाठी गडाफीनी जंगजंग पछाडलं. पण जागरुक इस्त्रायलनं त्याचा डाव हाणून पाडला. फ्रान्सन तर अण्वस्त्राच्या बाबतीत कानावर हात ठेवले यासाठी रशियाला देखील चुचकारण्यास गडाफीनी कमी केल नाही. परतु रशियन लोकानी घातलेल्या अटी इतक्या भयकर होत्या की, त्या मान्य करण गडाफीना कदापिही शक्य नव्हत. अस म्हणतात की भारताकडूनसुद्धा याबाबतीत काही मिळू शकते काय हे चाचपण्याचा त्यानी प्रयत्न करून पाहिला आहे, पण तिथही ते अपयशीच ठरले. कोणता शहाणा देश या 'माकडाच्या हाती कोलीत' द्यायला धजावेल ? म्हणून याबाबतीत आजपर्यंत तरी ते अपयशीच ठरले आहेत.

युरोप व अमेरिकेत शिकून आलेल्या सत्तर ते ऐंशी अरब अणुतज्ज्ञाना गडाफीनी प्रचड पगाराच्या अमिषान आपल्या अण्वस्त्र विकास योजनेत दाखल करून घेतल आहे. 'इस्लामिक बॉम्ब' बनविण्याच त्याचं स्वप्न सत्यात उतरल तर त्यापासून सर्वात जास्त धोका इस्त्रायलला पोहोचणार आहे. 'प्रिव्हे-न्शन इज बेटर दॅन क्युअर' या तत्त्वाचा डोळसपणे अगिकार करणार इस्त्रायल या गोष्टीची वेळीच दखल घेण्याचा प्रयत्न करील हे सागावयास सूज्ञाची गरज न लागे ! इस्लामिक बॉम्बपासून भारताला कसलही भय नाही, अस समजण मात्र शहाणपणाच ठरणार नाही

इस्त्रायलच अस्तित्व आता उदारमतवादी अरब राष्ट्रानी मान्य केलं आहे. अरबाचा बळकावलेला प्रदेश इस्त्रायलने परत केला तर त्या देशाला युनोमध्ये राजनैतिक मान्यता व स्थान देण्याचीही या राष्ट्राची तयारी आहे पॅलेस्टाईनच्या लोकाना जेरुसलेमसकट त्याची भूमी परत मिळाली तर इस्त्रायलला सहकार्याचा व मैत्रीचा हात द्यायचीदेखील तयारी काही अरब राष्ट्रानी दर्शविली आहे. गडाफीचा मात्र या सर्वाला सक्त विरोध आहे इस्त्रायलचा सपूर्ण नायनाट, हे त्याच अतिम उद्दिष्ट आहे १९७२ च्या ऑलि-पिक्समध्ये म्युनिच इथ अकरा इस्त्रायली खेळाडूची निर्दय हत्या करण्यात आली राज-कारणाची क्रीडाक्षेत्राशी जबरदस्त सागड घालण्याची सुरवात झाली ती इथूनच. या हत्याकाडात भाग घेणाऱ्या पॅलेस्टाईनच्या

दहशतवाद्यांचे गडाफींनी आपल्या देशात, युद्धावरून परतणाऱ्या विजयी वीराप्रमाणे स्वागत केलं. एवढंच करून ते थांबले नाहीत, तर अशा दहशतवादी संघटनांना आपल्या देशात नैतिक व आर्थिक पाठिंबा मिळेल, असं त्यांनी जाहीर केलं. या समारंभाच्या वेळीच या हत्याकांडातील मारेकऱ्यांना आठ कोटी रुपयांच बक्षीसही त्यांनी देऊन टाकलं. त्यानंतर अनेक देशांतील दहशतवाद्यांनी लीबियामध्ये आश्रय घेऊन आपापल्या संघटना वाढविण्यास सुरवात केली म्हणूनच आज लीबिया हे 'दहशतवाद्यांचं माहेरघर' बनलं आहे, असं म्हटलं तरी ते वावगं ठरू नये.

लीबियामध्ये सध्या जवळजवळ बावीस दहशतवादी संघटना आपल्या कचेऱ्या उघडून बसल्या आहेत. त्यात जवळजवळ दहा हजार स्वयंसेवक काम करतात. इथं त्यांना दहशतवादाचं शास्त्रोक्त शिक्षण देण्यात येतं यासाठी लागणारी सारी हत्यारं रशिया व पूर्व युरोपीय देशांतून लीबियाच्या आर्थिक सहाय्याने मिळवली जातात. गडाफींचा एक विश्वासू मंत्री या सर्वांवर जातीनं देखरेख व मार्गदर्शन करतो.

## स्वकेंद्रित राजकारण

१९८० सालच्या जानेवारीत १२० दहशतवाद्यांनी अलेक्झांड्रिया इथं पोलीस चौक्या, बँका व शासकीय इमारतींवर मशिनगन्स व बॉम्बच्या सहाय्यानं हल्ला चढविला. इजिप्तच्या पोलीस दलानं तात्काळ प्रतिकार करून दृष्टा दहशतवाद्यांना ताब्यात घेतलं. सखोल चौकशीअंती ही मंडळी लीबियातून दहशतवादाचं खास शिक्षण घेऊन आली आहेत, असं आढळलं. सादातचं सरकार उलथून पाडण्याच्या मोहिमेतील, हा हल्ला म्हणजे पहिलं पाऊल होतं, हेही सादात सरकारला समजलं. त्यानंतर झालेल्या धरपकडीत शेकडो नागरिकांना अटक करण्यात आली. या साऱ्याच्या घरात लीबियातून आलेली शस्त्रं व चलन सापडलं.

साधारण याच सुमाराला ट्युनिशियाच्या सरहद्दीवरील एका गावात काही दहशतवाद्यांनी उठाव केला आणि अध्यक्ष हबीब बोर्गिबा यांचं सरकार उलथून पाडण्याच्या हेतूनं बडाळी माजविली हे बंड मोडून काढण्यात आल्यानंतर शेकडो ट्युनिशियन दहशतवाद्यांना पकडण्यात आलं. या साऱ्यांनाही लीबियातच प्रशिक्षण मिळालं होतं, हे सिद्ध झालं.

जुलुम, जबरदस्ती अन् अन्याय यांच्या जोखडाखाली सबंध युगांडाला पिळवटून काढणाऱ्या इदी अमीनची कोसळणारी राजवट सावरण्यासाठी लीबियानं रणगाडे व स्वयंचलित शस्त्रांनी सिद्ध असलेलं दोन हजार लोकांचं सैन्यदल युगांडात धाडलं. युगांडाच्या सुदैवानं म्हणा किंवा गडाफींच्या दुर्दैवानं म्हणा, इदी अमीनला अखेरीस पराभव होणं भाग पडलं.

उल्स्टर येथील आयरिश दहशतवाद्यांना लीबियातून सर्व प्रकारची मदत मिळते, हे एक उघड सत्य आहे.

फिलिपाईन्समधल्या मुस्लिम जमातीला तिथल्या प्रचलित राजवटीविरुद्ध बडाळी करण्यासाठी उद्युक्त केलं जातं, तेही लीबियाच्या रेडिओसंदेशाद्वारेच.

अमेरिकेतील निग्रो लोकांना, विशेषत इस्लाम धर्म स्वीकारलेल्यांना दहशतवादी कृत्यांसाठी लीबियातून पेट्रोडॉलर्स पुरविले जातात, हे अनेक उदाहरणांवरून सिद्ध झालं आहे.

कर्नल गडाफी हे कम्युनिस्ट मतप्रणालीचे चाहते आहेत. त्यामुळेच ते नेहमी रशियाच्या पदरात 'झुकते माप' टाकतात, असं म्हटलं जातं. ते अमेरिकेचा द्वेष करीत असल्यामुळेच रशियाच्या कह्यात गेले आहेत, असं काही तज्ज्ञांना वाटतं. वास्तविक ते डाव्या व उजव्या कोणत्याच बाजूला झुकलेले नाहीत. त्यांचं सर्व राजकारण स्वत:भोवती केंद्रित झालेलं असतं. स्वत:ची सत्ता टिकवणं, या गोष्टीला ते सर्वाधिक महत्त्व देतात. त्या खालोखाल अरब जगताचे हितसंबंध रक्षण्यासाठी त्यांची सदैव धडपड चालू असते.

अमेरिका इस्त्रायलला पाठिंबा देते म्हणून अमेरिकेला आपला कट्टर शत्रू ठरवून ते रशियाच्या गोटात सामील झाले आहेत. पण रशियाविषयी त्यांना मुळीच प्रेम नाही. फक्त 'शत्रूचा मित्र तो आपला शत्रू आणि शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' एवढीच राजनीती ते जाणतात. ते स्वत: कडवे धर्मनिष्ठ असल्यामुळे धर्म न मानणाऱ्या कम्युनिझमचा त्यांना तिटकारा वाटतो. म्हणून, भांडवलशाहीवर त्यांचं प्रेम आहे, असं एखाद्याला वाटेल, पण तसं तर मुळीच नाही. अमेरिकन भांडवलशाहीचाही ते तितकाच तिरस्कार करतात. स्त्रियांना समान हक्क देणाऱ्या, मुक्त लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या व मदिरा सेवन सहजपणे स्वीकारणाऱ्या युरोपीय व अमेरिकन समाज पद्धतीला 'सडलेली व किडलेली जीवनपद्धती' असं म्हणून गडाफी तिचा धिक्कार करतात. दारूच्या थेंबालाही स्पर्श न करणारा हा माणूस दिवसातून पाच वेळा नमाज पढतो, यावरूनच त्याच्या धर्मनिष्ठेची कल्पना यावी.

## नायक–खलनायक

इराणच्या अयातुल्ला खोमेनींप्रमाण गडाफींच्या डोक्यातलं धर्मवेड विकोपाला गेलं आहे, अशी शंका येण्याइतपत वेडाचाराची कृत्यं त्यांच्याकडून घडतात. तेहेरानमधला अमेरिकन दूतावास इराणच्या क्रांतिकारकांनी ताब्यात घेतला, हे पाहून महिन्याभरातच लीबियाच्या दंगेखोरांना धर्माच्या आरोळ्या ठोकत त्रिपोली (लीबियाची राजधानी) येथील अमेरिकन दूतावासावर गडाफींनी पाठविलं, पण अमेरिकेन वेळीच सावध होऊन योग्य ती हालचाल केल्यामुळ पुढील अनर्थ टळला. अन्यथा 'इराण ओलीस' प्रकरणाची पुनरावृत्ती इथंही घडू शकली असती. या प्रकरणाचा अमेरिकेन इतका धसका घेतला की त्यांनी लीबियातील अमेरिकन दूतावास बंद करून लीबियातील सर्वच अमेरिकन नागरिकांना परत बोलावून घेतलं. काही वर्षांपूर्वी लीबियाला लागून असलेल्या समुद्रातील अमेरिकन आरमार मागे घेतले जावे, अशी इच्छा गडाफींनी व्यक्त केली. एवढंच नव्हे तर ओमान व सोमालियातील अमेरिकन सुरक्षादल बाहेर पडले नाही, तर लीबियाला त्यांच्यावर जबरदस्ती करावी लागेल, अशी त्यांनी धमकीही दिली; पण मध्यंतरी अमेरिकेत 'काऊबॉय' फेम रेगन महाशय सत्तेवर आल्यामुळ गडाफींचा आवाज थोडासा खाली आला. अशा लोकांना समजुतीपेक्षा सामर्थ्याचीच भाषा चांगली कळू शकते, हाच त्याचा अर्थ !

गडाफींचा अमेरिकेवर एवढा राग असा-

यचं कारण म्हणजे लीबियाचं लष्करी सामर्थ्य वाढविण्यास, अण्वस्त्रे बनविण्यासाठी हातभार लावण्यास अमेरिकेन दिलेला नकार म्हणून तर त्यांनी रशियाकडून सोळा हजार कोटी रुपयाची अत्याधुनिक युद्धसामुग्री खरीदली आहे. त्याच्या वायुदलातील चारशे विमानापैकी शभरहून अधिक विमानं 'मिग –२५' जातीची आहेत. त्याच्या सेनादलात अद्यावत असे तीन हजाराहून जास्त रशियन रणगाडे आहेत. इतकी प्रचड युद्धसामग्री असूनही त्याच्या नौ, भू व वायुदलात मिळून अवघे पचावन्न हजारच जवान आहेत. शिवाय सेना दलातील अनेक सैनिक अशिक्षित असल्यामुळ अत्याधुनिक युद्धसामग्री हाताळण त्याना जमत नाही. अनेक विमान इलेक्ट्रॉनिक उपकरणावर चालणारी असल्यामुळ लीबियन वैमानिकांना धडपणे ती चालवितादेखील येत नाहीत. छाडसारख्या छोटचा राष्ट्रावर आक्रमण करून विजय मिळवण सोप वाटल, तरी इजिप्तसारख्या सामर्थ्यवान राष्ट्राशी टक्कर घेण आपल्या कुवतीबाहेरच आहे. याची गडाफीनादेखील जाणीव आहे. रशियन सुरक्षा दलाला लीबियन भूमीवर तळ देण्याचं गडाफीनी नाकारल असल तरी आपल्या सैन्याला मार्गदर्शन करण्यासाठी दोन ते चार हजार रशियन सल्लागार त्यानी लीबियात ठेवून घेतले आहेत. शिवाय दहशतवाद्याना शिक्षण देण्यासाठी असणारे रशियन, जर्मन, फ्रेंच व अमेरिकन सल्लागार वेगळेच

मुअम्मर गडाफीचा जन्म एका बदाऊनी टोळीत १९४२ मध्ये झाला उंटावरून रखरखत्या उन्हात वाळवट पालथे घालणाऱ्या गडाफीना आपली तहान शेळयामेंढयांच्या दुधावर भागवावी लागत असे. उटावर बसून शेळचा हाकण्याची बालपणीची सवय त्याच्या पुढच्या आयुष्यातही गेली नाही अस त्याच्या वागणुकीवरून दिसून येतं. लीबियाच्या वाळवटात बसून अमेरिकेच्या अध्यक्षाला सल्ला दे, इजिप्तच्या राजकारणात ढवळाढवळ कर किंवा इस्रायलच्या भूमीवर दहशतवादी पाठव, असले धदे ते या सवयीमुळच करत असावेत त्याच्या बालपणीच्या सस्कारात दोन गोष्टीचा फार मोठा वाटा आहे. एक म्हणजे त्याच्या मनावर बिबविण्यात आलेल धर्मवेड आणि दुसरी म्हणजे १९५२ मध्ये इजिप्तचा राजा फारुकला सत्ताभ्रष्ट करून इजिप्तची धुरा हाती घेणाऱ्या कर्नल नासरचा पराक्रम. म्हणूनच कर्नल नासर हे लहानपणापासून गडाफीच जणू आराध्यदैवत बनल. नासरच्या प्रत्येक कृतीच अनुकरण करण, हा गडाफीचा स्वभावच बनून गेला. लीबियाच्या रॉयल मिलिटरी ॲकॅडमीमध्ये प्रवेश करून तिथंच त्यानी सहाध्यायाची एक गुप्त सघटना बनविली. पदवी हाती येताच केवळ सत्तावीस वर्षांच्या लेफ्टनट गडाफीनी रक्तहीन क्राती घडवून आणली व सुलतान इद्रिसला बाजूला सारून सत्ता स्वत च्या हातात घेतली. सत्तेवर येताच 'कर्नल' हा नासरला असलेला हुद्दा त्यानी स्वत.लाही चिकटवून टाकला. नासरच्या पावलावर पाऊल टाकणाऱ्या गडाफीना नासरनंतर अरब जगताच नेतृत्व मात्र काही केल्या मिळू शकल नाही

स्वतःला प्रतिनासर समजणाऱ्या गडाफीनी लीबियाच सरकार बरखास्त करून लोकराज्य (?) स्थापल आहे. गडाफीच्या म्हणण्यानुसार लीबियाच राज्य तेथील जनता साभाळते. अस असल तरी प्रत्यक्षात प्रत्येक बाबतीत गडाफीचा शब्द हा तिथ अखेरचा असतो, हे कटूसत्य आहे. गडाफी स्वत ला जगातील एक सर्वश्रेष्ठ नीतीतज्ज्ञ समजतात. त्यानी लिहिलेल्या 'ग्रीन बुक' या पुस्तकात 'तिसऱ्या विश्वाची समाजरचना' हा सिद्धात माडला आहे पाश्चिमात्य लोकशाही व रशियन हुकूमशाही या हा दोन्हीपेक्षा सर्वच दृष्टीन श्रेष्ठ व आदर्श अशा समाज व राज्यपद्धतीचा त्यानी पुरस्कार केला आहे. सुदैव एवढच की, त्याच्या या नव्या सिद्धाताकड कोणीही गभीरपणे पाहात नाही वा विचार करत नाही.

अतिशय अवघड निर्णय घेण्याची वेळ आली की हा तगडा, देखणा पण विक्षिप्त राज्यकर्ता सहारा वाळवटात एका अज्ञात ठिकाणी उभ्या केलेल्या तबूच आश्रय घेतो. दोन दिवस सतत चितन केल्यानतर त्याच्या सुपीक मेंदूतून असे काही चमत्कारिक निर्णय बाहेर पडतात की त्याचे पडसाद आतरराष्ट्रीय राजकारणावर उमटत राहतात.

लीबियाचा तेलसाठा पचवीस वर्षात सपणार आहे. त्यापूर्वी लीबियाला सपूर्ण स्वावलबी राष्ट्र बनविण्याचं गडाफीच स्वप्न आहे; पण मुळातच आळशी असलेल्या लीबियन माणसाची त्याला कितपत साथ मिळू शकेल, या विषयी साऱ्यानाच शका वाटते. वीस वर्षांपूर्वी लीबियान शून्यातून समृद्धीकड वाटचाल सुरू केली; पण सध्याची राजनीती अशीच चालू ठेवली तर समृद्धीकडून शून्याकड पोहोचण्यास लीबियास वीस वर्षाहून अधिक काळ लागणार नाही.

लॅरी कॉलिन्स व डॉमिनिक लॅपिए याच्या जगभर गाजत असलेल्या 'द फिफ्थ हॉर्समन' या कादबरीच प्रमुख पात्र म्हणून कर्नल गडाफीची निवड करण्यात आली आहे मग 'हा या कादबरीचा नायक आहे का?' असा प्रश्न कुणी विचारील. तर त्याच उत्तर अस, 'हो! तो या कादबरीचा नायकही आहे व खलनायकही आहे' कारण जगाच्या राजकीय रगमचावर गाजणारा हा सुपरस्टार प्रत्यक्षात हिरो व व्हिलनच्या भूमिका सारख्याच समर्थपणे साकार करीत असतो.

## शत्रुत्वाची कारण

गेली सात वर्ष अमेरिका आणि लीबिया या दोन देशामध्ये धुमसत असलेल्या या भाडणाचा अचानक पुन्हा एकदा भडका उडण्याच कारण काय? अमेरिकन आरमाराच्या वायुदलान सिड्राच्या आखातातून लीबियन भूमीवर हल्ले चढवून तिथ प्रखर बॉम्बवर्षाव कशासाठी केला? ट्रिपोली आणि बेगाझी येथील आतरराष्ट्रीय दहशतवादाचे अड्डे नष्ट करण्यासाठी? अहं! कदाचित हे एक कारण असेल, पण या नव्या उद्रेकामाग इतरही काही कारण आहेत. त्याचा थोडासा मागोवा घेऊ

कर्नल गडाफीच्या पापाचा घडा भरत आला आहे, अस अमेरिकेला वाटण साहजिक आहे. गडाफी अनेक वर्षं अमेरिकेच्या नाकदुऱ्या काढताहेत मध्यपूर्वेतील अरबराष्ट्रावर आपल वर्चस्व प्रस्थापित करून अमेरिकेचा इधन पुरवठा बद पाडण्याचा वा तेलाची किंमत अनेक पटीनं वाढवून घेण्याचा कर्नल गडाफीचा इरादा अमेरिकेला हानीकारक ठरणार आहे. शिवाय अमेरिकेविरुद्ध अरब राष्ट्राची लष्करी साखळी करण्याच्या गडाफीच्या हेतूला रशियाचा आतून पाठिबा आहे अमेरिकेत व अमेरिकन धार्जिण्या युरोपिय देशात मारेकऱ्याची दल पाठवून

त्या त्या देशातील नेत्यांच्या हत्या घडवून आणण्याचा कटही गडाफींनी रचला होता. या सर्वांवर कळस चढविला आहे तो रशियाच्या सॅम मिसाइलस् या क्षेपणास्त्रांनी.

लीबियाच्या लष्करी तळांवर रशियानं सुमारे २३० सॅम क्षेपणास्त्रं बसवली आहेत. अत्याधुनिक अमेरिकन बॉम्बफेकी विमानांचा ती अचूक नाश करू शकतात. वेळीच ही क्षेपणास्त्रं नष्ट करून टाकली नाहीत तर मध्यपूर्वेच्या समुद्रातील अमेरिकन आरमाराचं लष्करी वर्चस्व संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झाला आहे. जॉन केनेडींच्या कारकिर्दीत क्युबन मिसाईल क्रायसिसचं भयनाटच घडलं होतं. त्याचीच ही काहीशी पुनरावृत्ती म्हणावी लागेल. म्हणून तर अमेरिकन शासनानं तातडीची पावलं टाकण्यास सुरुवात केली आहे. वेळीच एक टाका घातला नाही तर नऊ टाके घालूनसुद्धा काम भागणार नाही, हे अमेरिका चांगलं जाणून आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा बाऊ करून रेगनसाहेबांना लीबियातले क्षेपणास्त्रांचे तळ संपूर्णपणे उखडून टाकायचे आहेत आणि मध्यपूर्वेतील अमेरिकन वर्चस्वाला अबाधित राखायचं आहे. सध्या काही दिवस तात्पुर्ती शांतता निर्माण झाली असली तरी ही आग विझली आहे, असा गैरसमज कोणी करून घेऊ नये.

याखेरीज लीबियावरील हल्ल्यामागं अमेरिकेचा आणखी एक हेतू आहे, तो म्हणजे रशियाच्या लष्करी ताकदीचा व सहनशक्तीचा अंदाज घ्यायचा. अफगाणिस्तानाच्या गाळात अडकून पडलेला रशियाचा हत्ती सध्या स्वतःला दुसऱ्या कोणत्याही भानगडीत गुंतवून घेण्याच्या तयारीत नाही. त्यामुळं या घडीला तरी तिसऱ्या महायुद्धाचा धोका संभवत नाही, हे अमेरिकन शासन पुरेपूर ओळखून आहे.

### ग्लॅमर लाभलेला गडाफी

अमेरिकन वायुदलानं केलेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांचे काही अड्डे नष्ट झाले आहेत, लष्करी सामग्रीचा बराच नाश झाला आहे अन् या सर्वांहूनही महत्त्वाचं म्हणजे सॅम क्षेपणास्त्रांचे बरेच तळ नष्ट झाले आहेत. ट्रिपोलीवरील हल्ल्यात कर्नल गडाफींच्या बायकोमुलांनाही इजा पोहोचली. गडाफींनी दत्तक घेतलेली हॅना नावाची मुलगी तर या हल्ल्यात बळी गेली. 'आम्हाला फक्त लष्करी ठिकाणांवरच हल्ले करायचे होते' असं अमेरिकेनं वारंवार सांगितलं तरी त्यांचा आतला हेतू गडाफीला जीवे मारण्याचा होता, हे कुणीच नाकारू शकणार नाही. आजवर सतरा वेळा खुनी हल्ल्यातून वा आंतरिक कटकारस्थानातून बचावलेले गडाफी या खेपेलाही बलवत्तर नशिबाचे ठरले आहेत. या हल्ल्यातून ते सहीसलामत सुटले आहेत. पण त्यांची लीबियातील अबाधित सत्ता मात्र पूर्वीसारखी निरंकुश राहिली नाही. लीबियाच्या लष्करी हायकमांडनं बरीचशी सूत्रं स्वतःकडं घेतली असून गडाफींना नामधारी नेता ठेवण्याच्या दृष्टीनं पावलं टाकायला सुरुवात केली आहे. हे जर खरं असेल तर अमेरिकेचा हेतू बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला असं म्हणता येईल. गडाफींना नेस्तनाबूत करण्याची इच्छा केवळ रेगनसाहेबांचीच आहे असं नव्हे, तर जगातल्या अनेक देशांच्या नेत्यांनाही तसंच वाटतं.

ते काहीही असलं तरी जागतिक प्रसिद्धीच्या दृष्टीनं कर्नल गडाफी यांचा नंबर खूपच वरचा म्हणजे तिसरा लागतो. अमेरिकेत नुकत्याच घेण्यात आलेल्या न्यूयॉर्क टाइम्सच्या गॅलप पोलमध्ये रेगन आणि गारबोचोव्ह यांच्या खालोखाल प्रसिद्धीच्या बाबतीत गडाफींचा नंबर लागला. ही सुप्रसिद्धी म्हणावी का कुप्रसिद्धी हा विषय वादग्रस्त ठरू शकेल; पण गडाफींच्या मागं विलक्षण वलय आहे एवढं खरं. या माणसाला जगाच्या कानाकोपऱ्यातून हजारो तरुणींची प्रेमपत्रं येतात. त्यातला गंमतीचा भाग असा की या प्रेमपत्रातील जास्तीत जास्त प्रेमपत्रं अमेरिकन तरुणींची असतात. या विरोधाभासाला, 'मिस्किल नियतीचा निष्ठूर खेळ', याखेरीज दुसरं कोणतं नामाभिधान योग्य ठरू शकेल !

# शब्दांचं अंगण

आशा कर्दळे

## नवी आत्मचरित्रे

आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराला नेहमीच एक चाहता रसिकवर्ग लाभलेला आहे. कथा, कादंबरी या शुद्ध ललित साहित्य प्रकारांइतकीच, किंबहुना त्याहीपेक्षा जास्त आवडीनं आत्मचरित्रं वाचली जातात. कारण यात निव्वळ आत्मनिष्ठा आणि लालित्य यांच्या जोडीला एका व्यक्तीच्या आयुष्याचं कथन असत. त्या व्यक्तीच्या आयुष्याचं कथन असतं. त्या व्यक्तीच्या सहवासातल्या व्यक्तींसह एक छोटासा कालखंड त्यात जिवंत होत असतो. 'मी' च्या संदर्भातल्या घटनांच्या नोंदींनी घडलेला तो काळाचा, शिक्षणाचा, राजकारणाचा ( ज्या क्षेत्रातली ती व्यक्ती असेल ) इतिहास असतो.

गेल्या वर्षभरात आवर्जून दखल घेण्याजोगी बरीच आत्मचरित्रं प्रकाशित झाली. ज्या व्यक्तींची ती आत्मचरित्र आहेत, त्यातल्या बहुतेक व्यक्ती स्वतःच्या क्षेत्रात ललामभूत ठरलेल्या असल्यानं ती सर्वच निःसंशय वाचनीय आहेत.

'सर्कसबरोबर चाळीस वर्षे' हे मॅजेस्टिकनं प्रकाशित केलेलं बंडोपंत देवल यांचं आत्मचरित्र. सर्कस ही हजारो आबालवृद्धांना खिळवून ठेवणारी निर्भेळ करमणूक आहे. पण त्यामागे केवढा प्रचंड व्याप असतो ! हजारो माणसं रात्रंदिवस राबत असतात आणि सर्कसची अद्‌भुत दुनिया जगापुढे उभी करतात. काशिनाथ सखाराम ऊर्फ बंडोपंत देवल हे जगविख्यात सर्कसचे मालक. 'द बेस्ट क्लाऊन इन इंडियन सर्कस' असा

त्याचा अजूनही अभिमानान उल्लेख केला जातो. विदूषक, ॲनिमल ट्रेनर, रिंग मास्टर, जगलर अशा विविध भूमिकातून त्यानी जगभर प्रवास केला. या ४० वर्षात अनुभवाला आलेले चढउतार, जीवघेणे प्रसग चित्तथरारक घटना, त्याचप्रमाणे त्या वेळची राजकीय तसच सामाजिक परिस्थती याच रोचक चित्रण यात येतं. '

मिरजेपासून ७–८ मैलावर म्हैसाळ इथ त्याचा जन्म झाला. घरची फार गरिबी. त्याच्या काकाची सर्कस होती. प्रथम सर्कसबद्दल त्याना बालसुलभ कुतुहल होत. नतर सर्कसमध्ये जायची तीव्र इच्छा निर्माण झाली. अकराव्या वर्षी सर्कशीत प्रवेश केला. ते म्हणतात, 'सगळी कामं केली, सगळ्या भूमिका निभावून नेल्या. दोन महायुद्ध, ४८ ची जाळपोळ पाहिली. स्वातंत्र्य चळवळीचे चटके सहन केले. मदीचा फटका सहन केला आणि मराठी सर्कशीचा न्हासही पाहिला.

एवढा प्रचड परिवार पोसण अवघड होतं. पण सर्कस बद पडू नये म्हणून देवलानी जिवाच रान केल त्याच्या वेळी ४० मराठी सर्कशी होत्या. शेवटी त्यातल्या फक्त ४–५ शिल्लक उरल्या. विष्णुपत छत्र्यानी भारतातली पहिली सर्कस उभी केली. तासगाव, म्हैसाळ ही सर्कशीची बाजारपेठ होती. १५–२० मराठी सर्कशी इथंच जन्मल्या आणि फोफावल्या. या आत्मचरित्रातून सर्कसचा रजक इतिहास कळतो. पहिला सिनेमाही मराठी माणसानंच काढला. तो तगला, वाढला. पण सर्कसची काय स्थिती आहे ? मराठी माणसाचा स्वभावदोष, सरकारकडून झालेली उपेक्षा अशी कारणं देवलानी दिली आहेत.

वेगळ्या विश्वातले अनुभव सांगणारं आणखी एक आत्मचरित्र, सीताराम मेणजोगे यानी लिहिलेल–'आम्ही पोस्टातील माणस' डिंपल प्रकाशनन ते प्रसिद्ध केलं आहे. याची पहिली आवृत्ती सहा महिन्यातच खपली. आत्मचरित्राचा हेतू सागताना लेखक म्हणतो, 'पोस्टातील माणसाविषयी दृष्टी सुधारण, एका अवाढव्य व्यवसायाच खरखुर दर्शन घडवणं.' या पुस्तकाच मुखपृष्ठ फार कल्पक आणि समर्पक आहे पन्नास पैशाचं तिकीट आणि पोत्यातून बाहेर पडणारी पत्रं... पोस्टमनच्या आयुष्याच ते सुरेख प्रतीक ठरावं

मामा वरेरकरही पोस्टातच नोकरीला होते. त्या नोकरीला ते 'पौष्टिक' म्हणत. मेणजोगे म्हणतात, पोस्टातलं वातावरण उमेद वाटेल अस नसतच. भिंतीचा रंग उडालेला, घड्याळ बंद पडलेलं, जुनाट टेबलं, हात मोडलेल्या खुर्च्या ! पोस्टात एकदा नोकरी धरली की तिकीट चिकटवल्यासारखी पक्की ! माणसाचा पोस्टातला अनुभव बाहेर उपयोगी पडत नाही. या आत्मचरित्रामुळे. यात माणसाच जीवन जवळून बघायला मिळत. काही अनुभव करुणरम्य आहेत. कोणाचीही निंदानालस्ती नाही. जे अनुभवलं तेच प्रामाणिक साधेपणान मांडलेल. पोस्टाच्या पगारात भागत नाही, म्हणून बहुतेक जण जोडधदा करतात. पोस्टमनची सख्या तुटपुजी, त्यामानानं काम जास्त आयुष्यभर पोटाला चिमटा दिला तर निवृत्तीनतर स्वत च घर शक्य होतं. पोस्टमनच्या अशा काही समस्याचा सहजोल्लेखही ओघानं येऊन परिणामकारक ठरतो.

## अंगणातले आभाळ

यमुना खाडिलकर याच 'पटावरील प्यादे' हे एक वेगळे आत्मचरित्र. शुभकरोती प्रकाशनच. काकासाहेब खाडिलकर याची ही सून. वयाच्या पंधराव्या वर्षी यमुनाबाईंच लग्न झाल तेव्हापासून आजवरची कहाणी म्हणजे हालअपेष्टांच जीवन! प्याद्याच्या नशिबी एक दोन घर चालणच असत. त्याचा उपयोग करायचा आणि काम झाल की फेकून द्यायच. मेल तरी विशेष नुकसान नाही. हा खेळ त्याच्या वाट्याला आला. यमुनाबाईंच्या तीन पुतण्यानी या खेळात जागतिक कीर्ती सपादन केली त्याना प्याद म्हणून आत्मचरित्र लिहाव लागलं हे दुर्दैवच

फार थोड्याच्या वाट्याला राजा किंवा वजीर होण्याच भाग्य येत अस त्यांना वाटत स्वच्छ–पारदर्शकपणे आपली कहाणी घडली तशी त्यानी सागितली. बालपण, हुडपण करण्यात गेल वडील दुसऱ्या बाईच्या नादाला लागले त्यामुळे ते छत्र असून हरवल. लग्न झाल पण नवरा फिट्स येणारा निघाला. कष्ट आणि हाल एवढच जिणं असतं तरी विशेष नव्हतं. अतीव बद्धिमान अशा या बाईच्या आयुष्यात आवडता पुतण्या नीलकठ आला. लग्नानंतर त्याही सबधाला तडे गेले.

'नवाकाळ' या वृत्तपत्राचे ते सपादक. 'नवाकाळ'च्या जडणघडणीत यमुनाबाईंनी अपार कष्ट घेतले. पैसा ओतला. त्याची परिणती काय झाली, याचा इतिहास इथ आहे. ही दोघाची जीवन कहाणी असली तरी, यमुनाबाईंनी माडलेली बाजू इथ दिसते. पण ते आत्मसमर्थन नाही. निवेदनात इतके बारकावे आहेत की, त्याच्याबद्दल अनुकपा वाटते आत्मचरित्र वाचताना वाचकाला कळत ते त्याच जळण. पूर्णपणे उध्वस्त होत गेलेल्या स्त्रीची ही कथा आहे, केवळ छळ हेच त्याच प्राक्तन होतं भाषा मनाला चटका लावणारी. एका वृत्तपत्रसृष्टीचा इतिहास त्यातून कळतो. एका वृत्तपत्राचा संपादक वडिलाशी आणि काकूशी ईतका क्रूर वागू शकतो याच नवल वाटत. केवळ कादबरीतच शोभेल असं हे सत्य प्रत्यक्षात यमुनाबाईंनी भोगलं आहे.

'अगणातले आभाळ' हे ग्रथालीनं प्रकाशित केलेल यशवत पाठक याच आत्मचरित्र, अभिनव आत्मचरित्राचा वस्तुपाठ घालून देण्यातक ताज आणि टवटवीत आहे. इथ किर्तनाच क्षेत्र नादमय आणि शब्दबद्ध झाल आहे. एका कीर्तनकाराच्या घरात वाजणारे टाळ आणि झाजा याची एक किनार या आत्मचरित्राला आहे. घरात अठरा विश्वे दारिद्र्य, पण प्रखर तेजान न्हालेल्या प्रेमळ आणि सालस कुटुबाची ही कहाणी आहे. नाशिकसारख्या तीर्थक्षेत्री एका ब्राह्मण कुटुबाची मधल्या शतकात झालेली ससेहोलपट यात चित्रित झाली आहे.

भीषण परिस्थितीत स्वत ला आणि कुटुबाला साभाळणारी आई यशवत पाठकाना लाभली. घराण कीर्तनकाराच. तेव्हा मुलानं हाच वारसा पुढ चालवावा ही वडलाची इच्छा. पण आईला वाटत की या दारिद्र्यातून त्याची सुटका व्हावी. शिक्षण सुरू केल पण शिक्षणाचे आतोनात हाल झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या पर्वात मध्यमवर्ग चक्रात सापडून गरगर फिरत होता. परपरा, वृत्ती याची मोडतोड होत होती या स्थित्यतरातून जाणारा एक तरुण या आत्मचरित्रात आपल्याला दिसतो. या आत्म-

चरित्रात 'आम्ही' भोवती कथा गुफलेली आहे. भाऊ, भावंडे भोवतीचा समाज पुस्तकभर विखुरला आहे. शैली चित्रमय आहे. स्वच्छ झऱ्यासारखी.

कष्ट, दारिद्र्य, स्थित्यतर याच्याशी समातर धावणारे यशवत यात दिसतात. त्याच्या यशात आईवडिलाचा वाटा मोठा. या आत्मचरित्रात चांगली कथाबीजं सापडू शकतील

## काही चांगली पुस्तकं

'मी एक निमित्त मात्र' हे मा. ल. भागवत याच मॅजेस्टिकन प्रकाशित केलेल प्राजळ आणि साधसुध आत्मचरित्र कुलपरपरा, कुलपुरुषाची प्रतिष्ठा, सगेसोयरे, इष्टमित्र याच्या चरित्रप्रसगामुळे या पुस्तकाचा व्याप मोठा आहे एका उद्योजकाच हे आत्मचरित्र. अप्पासाहेब भागवत हें पहिल्यापासून सश्रद्ध ते सद्गुरू करतात. बी ए एल्. एल्. बी. नतर काय कराव हा प्रश्न पडतो. कारण नोकरीचा कटाळा. आबासाहेब करदीकर यांच्या श्रीप्रभा आणि कपनीत ते साबणाचा व्यवसाय करतात. नतर युनायटेड मेटल इडस्ट्रीज हा स्वत.चा उद्योग सुरू करतात. कारखानदारीचा अनुभव नव्हता पण औद्योगिक क्षेत्राच आकर्षण होत

त्याची पत्नी मगलाबाई. त्याचा महिला सघ आणि अखिल भारतीय महिला परिषदेशी जवळचा सबध. समाजसेवा हें त्यांच व्रत. त्याच्या ओढीन अप्पासाहेब भागवत हे देखील समाजसेवा करतात. त्यानी शाळा काढल्या, भूमीसपादनाचा लढा दिला. त्याचे तिहेरी व्यक्तीमत्व इथ दिसत एक उद्योजक दुसरा पैलू समाजसेवक आणि तिसरा साधुसमागम. गुळवणी महाराज, पाचलेगावकर महाराज याचा त्याना सहवास लाभला. जयप्रकाश नारायण, ग दि माडगूळकर, याच्याही निकटच्या आठवणी त्यानी सागितल्या आहेत त्याचा 'समृद्धी' हा बगला खऱ्या अर्थान श्रीमत. कारण थोरामोठ्याचे पाय त्या वस्तूला लागले महिला सघाच्या निमित्तान अण्णासाहेब कर्वेंचाही लोभ मिळाला. आयुष्याचे अनेक टप्पे आणि पुढे पुढे नेणाऱ्या घटना यामुळे हे आत्मचरित्र वाचनीय झाल आहे

कलावताची काही चागली आत्मचरित्र प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी 'स्वरगगेच्या तीरी' हे जी. एन्. जोशी याच मॅजेस्टिकनं प्रकाशित केलेलं. हे आत्मचरित्र नाही अस जोशी प्रस्तावनेत म्हणतात. पण ४० वर्ष सगीताच्या सागरात विहार करतानाच्या स्मृती या आत्मचरित्रासारख्याच आहेत. जी. एन्. जोशी याचे ग्रह लहानपणापासूनच सगीताला अनुकूल. त्याचं शिक्षण नागपूरच्या मॉरिस कॉलेजमध्ये झाल. उदयोन्मुख कलावत म्हणून त्याचवेळी त्याच नाव झाल होत. तेव्हाच त्यानी म्युझिक असोसिएशन काढली. बी ए झाल्यावर सगीतसाधनेसाठी ते मुबईला आले. तिथ रेडिओवर त्याना लोकप्रियता मिळाली. नतर H M V. कपनीन त्याच्या गाण्याची रेकॉर्ड काढली. दोन गाण्याचा करार करून एका बैठकीत १४ गाणी गाऊन घेतली.

रानावनात गेली बाई शीळ, डोळे हे जुल्मी गडे ही त्यानी गायिलेली गीत लोकप्रिय झाली. तो भावगीताचा जमाना होता. पुढे जेव्हा त्याना H.M.V. मध्ये नोकरी लागली. तेव्हा त्यानी इतर चागल्या आवाजामध्ये ध्वनिमुद्रिका काढल्या. त्यानी स्वत: चित्रपटासाठी गाणी म्हटली. दीर्घ कलासेवेत ना घ. देशपांडे, सुधीर फडके, बिस्मिल्ला खाँ, कुमार गधर्व, सी. रामचद्र, सैगल, विलायत खाँ इत्यादी कलावताचा स्नेह त्यानी सपादन केला आणि या पुस्तकात सगळ्याच्या आठवणी 'स्व'च्या सदर्भात सागितल्या.

१९७० नतर त्यानी या क्षेत्रातून निवृत्ती पत्करली नतर जगाचा दौरा केला. युरोप, आफ्रिका, अमेरिका या देशात अभिजात भारतीय सगीताच लोण कुठवर पोहोचल आहे त्याचा मागोवा घेतला त्याना अभिजात सगीताच भवितव्य अधारमय वाटत. कारण तपस्या नाही, मेहनत घ्यायची तयारी नाही. अनेक घराणी केवळ अवशेषरूपान उरली आहेत. श्रोत्याचे कान, त्याच्या सवयी आणि सौदर्यसमीक्षा यात बदल होत आहे. यामुळे त्याच मन साशक आहे

## कानेटकर–तोरडमल

'मी माझ्याशी' हे वसत कानेटकर याचं आत्मचरित्र. इद्रायणी साहित्य प्रकाशन. सुरुवातीला '४६१ शनवार' या जुन्या दुमजली घराच्या आठवणी सागितल्या आहेत. आता हे घर शिल्लक नाही. पण एके काळी तिथ काव्यवाचन, नाट्य रगत असे. नतर व्यवसायानिमित्त ते नाशिकला आले आणि तिथच स्थिरावले. गेली पस्तीस वर्षं नाशिकनच त्याना बाधून ठेवल आहे. त्याना नाशिक फार आवडत. गाव आणि गावकऱ्याचा सूर छान जुळला.

वि. वा. शिरवाडकर हे नाशिकच भूषण. नाट्यसृष्टीशी त्याच्यामुळे आणि वृत्तसृष्टीशी ना. भि. परुळेकर याच्यामुळे परिचय झाला. ना. सी फडके, भाऊसाहेब खाडेकर, बालगधर्व, राम गणेश गडकरी हे सगळे त्याचे आप्तस्वकीय. त्याच्या स्मरणातून सुरुवातीच्या दिवसाचा मागोवा घेतला आहे. ही व्यक्तिचित्रं अनोख्या पद्धतीनं चितारल्यामुळे हृद्य झाली आहेत. कानेटकराचे प्रायोगिक, व्यावसायिक रगभूमीविषयीचे विचार मननीय आहेत. सुरेश खरे यानी घेतलेली मुलाखत शेवटी जोडली आहे त्यातून कानेटकर हे समर्थ नाटककर, एकाकिकाकार, प्राध्यापक, कादबरीकार अशा विविध भूमिकामधून कळतात. तरीही त्याच्या बौद्धिक जडणघडणीची, साहित्य निर्मितीची, पात्रनिर्मितीची उकल व्हावी अशी वाचकाना फार उत्सुकता आहे ती विस्तारान पूर्ण होईल अस आत्मचरित्र त्यानी अवश्य लिहाव. कारण इतकी वर्षं मराठी प्रेक्षकाची नाडी अचूक ओळखून त्याच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या कानेटकरानी भला मोठा स्वत चा ग्रथ केला, तरी वाचक त्याच स्वागतच करतील.

मधुकर तोरडमल या नाट्यक्षेत्राशी सबधित जबरदस्त व्यक्तिमत्वाच आत्मचरित्र – 'तिसरी घटा' नावच इतक समर्पक की उलगडून वाचावस वाटणारच. हे मॅजेस्टिकन प्रकाशित केल आहे नटाच्या जीवनात तिसऱ्या घटेला फार महत्त्व असत. नटाच्या यशापयशाची ती घटा असते. प्रेक्षक आणि रगमच याना विभागणाऱ्या तेजोरेखेच्या आत तो अभिनयाचं शिल्प घडवत असतो. तोरडमल याच्या मते अभिनयाचा वकूब सर्वात महत्त्वाचा. नतर नाट्यसहिता आणि नतर दिग्दर्शक. या तीनही अवस्थामधून ते गेलेले त्याच कोणत रूप खरं?

नट, लेखक व दिग्दर्शकाची ही आत्मकथा आहे. ती उत्कंठावर्धक आहे. इंग्रजीचे गाढे अभ्यासक, पेशानं प्राध्यापक, कष्टाळू लेखक आणि नट कसा घडत गेला ते बारकाव्यां-सहित वाचकांसमोर येतं. भाषा सुरेख आहे. इंग्रजी, मराठी नाटकातली चपखल अवतरणं टाकली आहेत. व्यक्तिचित्रण हा त्यांचा हातखंडा. ती अस्सल वाटतात. अरुण सरनाईकचं तर फारच सरस उतरलेलं. स्मरणशक्ती दांडगी. बारा नाटकांचा हा लेखक महत्त्वाचे तेवढेच तपशील लक्षात ठेवतो. वादविवाद, रागलोभ यांचे रेखाटन या आत्मचरित्रात आहे; पण हेवादावा अगर द्वेषमत्सर मुळीच नाही. उदा. मोहन वाघ आणि चंद्रलेखा यांचे संबंध, त्या वेळच्या प्रतिक्रिया त्यांनी नोंदवल्या आहेत, पण दोघांबद्दल त्यांना प्रेमही तितकंच आहे. उद्वेग कुठंही नाही. त्यामुळे हे एका सुसंस्कृत नटाचं आत्मचरित्र वाटतं.

त्यात खानदानीपणा आहे, पण आडपडदा नाही. प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी ठरलेल्या माणसाची ही कहाणी आहे. राज्य नाट्य स्पर्धांचं वातावरण बहारदार उभं केलं आहे. नटाचं अवघं आयुष्य प्रतिबिंबित करणारं प्रतीकात्मक शीर्षक फार सूचक आहे.

### 'शांतारामा'

मौज प्रकाशननं प्रसिद्ध केलेलं डॉ. व्ही. शांताराम यांचं आत्मचरित्र 'शांतारामा' आवर्जून दखल घ्यावी असं. भरपूर पृष्ठसंख्या असलेलं हे आत्मचरित्र म्हणजे एका कलावंत महायोग्याची पटकथाच आहे! मोठ्या कालमर्यादेवर पसरलेला तो चित्रपट सृष्टीचा मनोहारी इतिहास आहे. व्ही. शांताराम हे नाव उच्चारताच शेकडो, हजारो गोष्टी मनात तरळून येतात. त्या सर्वांना स्पर्श करत करत इतक्या वर्षांचा प्रवास चित्रित करायचा तेव्हा ६०० पानं भरली नसती, तरच नवल! इतक्या चित्रपटांच्या पटकथा कुशलतेनं हाताळणाऱ्या शांतारामांनी स्वतःच्या आयुष्याची पटकथाही त्याच कुशलतेनं हाताळली आहे. चित्रपटसृष्टीचा इतिहास या माणसानं आपल्या कष्टानं घडवला! त्या चित्रपतीची ही कहाणी आहे!

वयाच्या १९ व्या वर्षापासून कलेच्या या महासागरात ते प्रवाहाविरुद्ध पोहत आले. आज त्यांचं वय ८४ वर्षांचं आहे. अजूनही रसिकांना कलानंद देण्याची त्यांची जिद्द आहे. ते म्हणतात, 'स्वतःला आत्मसंतोष व साऱ्या जगताला अद्भुत आनंदाचा साक्षात्कार होईल अशा परिपूर्ण कलाकृतीचा किनारा गाठण्यासाठी मी सारखा धडपड करतो आहे. म्हणूनच 'उत्तर महाभारत' ही महत्त्वाकांक्षी चित्रपट मालिका हा त्यांनी संकल्प सोडला आहे. प्रत्येक वर्षी दोन चित्रपट काढले तरी पूर्ण व्हायला २५ वर्षं लागतील! दीर्घायुष्याची उमेद तर त्यांना आहेच, पण हे शरीर विरलं तरी पुनर्जन्म आणि पुढच्या जन्मी पुन्हा हेच काम पुढं न्यायचं इतकी समर्पित वृत्ती!

व्ही. शांताराम यांचा जन्म कोल्हापूर इथं झाला. प्रथम ते गंधर्व नाटक कंपनीत होते. नंतर महाराष्ट्र फिल्म कंपनीत नट म्हणून प्रवेश केला. १९२९ मध्ये कोल्हापूरला प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. ती पुण्याला आली आणि एकेक रत्नमाणकं तिनं जन्माला घातली. व्ही. शांताराम आणि प्रभात कंपनीचं अतूट नातं होतं दुर्दैवाने त्यांनी प्रभात सोडली आणि राजकमल कलामंदिराची स्थापना केली. त्यांनी निर्माण केलेली चित्रपटांची नामावली इतकी सर्वज्ञात आहे की, ती देऊन जागा अडवण्यात अर्थ नाही. इथं मात्र प्रत्येक चित्रपटाची जन्मकथा आणि त्या चित्रपटांशी संबंधित इतर किस्से, शूटिंगचे वेधक प्रसंग वाचनीय ठरतात.

व्ही. शांताराम यांचं आयुष्य घटनांनी खच्चून भरलं आहे. पारितोषिकं मिळालेले अनेक चित्रपट, अनेक व्यक्तिगत पुरस्कार, अनेक कलावंतांचा मिळालेला स्नेह आणि मैत्री, राष्ट्रीय फिल्म पारितोषिक समितीचे आणि फिल्म प्रोड्युसर्स गिल्डचे अध्यक्ष आणि इतरही भूषवलेल्या मानाच्या जागा, कितीतरी विवाह आणि तेवढेच घटस्फोट! या आत्मचरित्रात प्रसंगांची रेलचेल आहे. त्यांना शारीरिक व्याधी बऱ्याच सोसाव्या लागल्या. पण हा कलासक्त माणूस त्यांना पुरून उरलाच. सामाजिकतेची जाण ठेवूनच त्यांनी कलेला कसं राबवलं, तशी त्यांच्या मनाची घडण कशी झाली, ते या आत्मचरित्रात स्पष्ट होत जातं. □

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**

डॉ. श्रीकांत मुंदरगी

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**

फिरोझ रानडे

पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

## फिनिक्स लायब्ररी

### The Splendours of Indian Dance

By Mohan Khokar
with Colour photographs by Gurmeet Thukral
Rs. 295, Himalayan Books.
New Delhi, Pages 101

भरतनाटयम. कथकली. कथक. ऑडिसी. मणिपुरी. कुचीपुडी. मोहिनी अट्टम. भरतनाटयमचा अर्पण करण्याचा Scenario. कथ्यकलीचं वेगळं विश्व. ऑडिसीच्या उत्कट भावना. कुच्चीपुडीमधल नाटय. मोहिनी अट्टमचा भुलावणारा लोभसपणा.

शिवाजी भारती. सोनल मानसिंग. डॉ पद्मा सुब्रमण्यम रसिका. यामिनी. कृष्णमूर्ती. किरण सेगल. स्वप्नसुदरी. जयलक्ष्मी ईश्वर. लीला सॅम्सन. बिरजू महाराज. कुमकुमलाल. संजुक्ता पाणीग्रही. आलोका पाणीकर. राजा–राधा रेड्डी. कनक रेले.

या जगात भारतीय नृत्यापेक्षा काही सुदर, काही अधिक तालबद्ध, लयबद्ध, अधिक ग्रेसफुल, अधिक कलरफुल, अधिक मधुर असे काही आहे का ? भारतीय नृत्याने माणसाचे Sublimation होण्याची शक्यता असते. मला तरी त्यापेक्षा अधिक सुदर काही गवसले नाही. ( पुस्तकेसुद्धा ! )

सवेदनाशील पुरुषाची कामवासना दोन ठिकाणी मरते (a) वेश्यागृहात आणि (b) स्त्री नृत्य करताना. एके ठिकाणी अनुकपेमुळे, Disgust मुळे. दुसऱ्या ठिकाणी सथ व शात सौदर्यानुभवामुळे.

असे म्हणतात की स्त्रीच्या मनात कधी गोपनीय गोष्ट टिकत नाही. Women are troublesome. They are not consistent, predicatable. 'साम्युएल बटलर एकदा म्हणाला होता. The Souls of women are so small, that some believe they have none at all.' Freud. 'What does a women want ?' या गोष्टी खऱ्या आहेत की नाही ते मला माहिती नाही. पण तिचे सर्व दोष या एका कलेमुळे आपण दुर्लक्षिले पाहिजे ! काय ही ! G. A. जेव्हा तुम्हाला 'स्त्री म्हणजे दुर्गंधरसस्थान होणे असं वाटते तेव्हा तुम्ही 'मोहिनी अट्टम' बघाल का ?

हे खरे आहे की भारतीय क्लासिकल सगीतसुद्धा तितकेच Sublime आहे. पण रग आणि शिल्पाची ( स्त्रीचे शरीर ) भर नृत्यात पडल्यामुळे ते अधिक आकर्षक झाले आहे. शिवाय शास्त्रोक्त नृत्यामुळे तुमचा आत्मा ढवळून निघत नाही. एकाच वाक्यात सांगायचं झाल तर शास्त्रोक्त नृत्यामुळे एक कमालीचा शांत सौदर्यानुभव मिळतो. प्रभाकर पार्ध्येनी शकराभरणम् या सिनेमाचा कुठे तरी उल्लेख केला होता. नृत्याच्या सदर्भात. परंतु या चित्रपटात मला नृत्याचा आणि संगीताचा भाग फारच जुजबी वाटला. मला अनेक प्रकारचे नृत्य ( या लेखात मला फक्त शास्त्रोक्त नृत्यच अभिप्रेत आहे ) पाहण्यास मिळाले ते T V. घेतल्यानतर. गेल्या वर्षी डेक्कन जिमखान्यावरील 'रविंद्र'नी मला एक छानसा कलर T.V. हप्त्यावर दिला आणि मी दर सोमवारी रात्रीची १०.४५ होण्याची वाट पाहयला लागलो या कलेमध्ये भारतात एवढ्या स्त्रियानी तपश्चर्या केली असेल ते T.V. घेण्याआधी मला माहीत नव्हते. खर म्हणजे इतकी वर्षे T.V. घेण्याचं मी टाळलच होत. निव्वळ नृत्यासाठी नव्हे परंतु वाद्य सगीतासाठीसुद्धा T V रेडियोपेक्षा किती तरी उपयुक्त आहे त्याचीसुद्धा मला कल्पना नव्हती कारण सुदर सरोद, सीतार, विचित्रवीणा, रुद्रवीणा अशी विविध प्रकारची वाद्ये कशी असतात ते T.V. आल्यानंतर जास्त डिटेलमध्ये कळायला लागले

भारतीय नृत्याने Swan शरमिंदा होईल. मोराला Jealousy निर्माण होईल दोन पायावर पाला खाण्यासाठी गळा आणि खाद्याचे स्नायू ताणलेला gerenuk क्षणभर स्तभित होईल. आपल्या शेपटीवर उभा राहिलेला फणा काढलेला नाग हिप्नोटाइज होईल.

मी काही वेळा मिरवीत असे की माझ्याजवळ T.V. नाही. कलर T.V वाले मिरवतात न तस ! परतु हे मिरवीत असताना The loss was mine हे माझ्या लक्षात आले नाही ! अनेक प्रकारचे भारत दर्शन, अस्मिता वाढावी असे इंडियाचे दर्शन मला फक्त दूरदर्शननीच दाखवलं.

काचेच्या पेल्यात liquid असतं. दैनदिन रहाटगाडग्यात त्या पेल्यातील dregs खाली तळावर स्थिरावतात. एकाएकी अपेक्षा नसताना, हिराबाईची ठुमरी कानावर आदळते. पेल्यातील गाळ वर यायला लागतो. पाणी गढूळ होत. एक अनामिक हुरहुर लागते. शरीरातील आणि मनातील अणूरेणू उच्छाद माडतात नेमक काय हव आहे ते कळत नाही. विशेषत: द्रुत लयीमध्ये हे असे फार होते.

शास्त्रीय सगीताची आवड निर्माण झाली ती अशीच. एक–दोन चिजा अचानक कानावर पडल्यामुळे. परंतु काही दिवसानी शास्त्रीय संगीताचे दोन विभाग करून टाकले. एक जीव ढवळून टाकणारा प्रकार व एक विलक्षण शाती देण्याचा प्रकार. शेवटी शेवटी मी हा शेवटचाच प्रकार जास्त ऐकायला लागलो. नृत्य हे मवचितच अस ढवळून टाकणारं असत. 'All thoughts corrupt' असे कृष्णमूर्ती एकदा म्हणाले होते. कधी कधी मला असा विचार येतो की मृत्यूच्या घटकेला अस छानसं, कलरफुल ( पेल्यातील dregs खाली बसतील अस ) नृत्य बघावं. म्हणजे एक thougetless state निर्माण होईल. काही एक मनात इच्छा, आकाक्षा, guilt fear राहणार नाही पेसिमीस्ट शॉपेनहॉवरची will less state !

माझी ही नृत्याबद्दलची इच्छा पुरी करण्यासाठी V. C R. घेण्याखेरीज पर्याय नाही हे मला कळून चुकले आहे. पण VCR घेतला तर हे IT वाले मला अकाली मारून टाकतील ! IT चा disincentive हा असा असतो बघा.

पूर्वी मला कथक आणि कथकली एकच आहे असे वाटत असे. परंतु या पुस्तकात त्यातला फरक कळला या पुस्तकाचे लेखक श्री. मोहन खोकर म्हणजे भारतीय नृत्य या क्षेत्रात authority समजले जातात. या पुस्तकात नृत्य करणाऱ्याची जी यादी आहे त्या व्यतिरिक्त अनेक नृत्य–चागले नृत्य–करणारे आहेत. त्याचा या पुस्तकात उल्लेखही नाही. परंतु खोकरनी म्हटलेच आहे की, 'This is no reflection on their talent.'

भारतीय शास्त्रोक्त सगीतात संथ, शात

करणार संगीत व घुसमटून टाकणारे आक्रमक द्रुत असे दोन प्रकार आहेत असे मी म्हटले. परंतु या शिवाय आणखी एक प्रकार आहे. कॉमिक. हातवारे, हावभाव, तोंड वेंगाडणे वगैरे. काही दिवसापूर्वी षण्मुखानंद हॉलमधला कार्यक्रम T. V. वर दाखवला होता A-1 होता. दोघाची जुगलबंदी होती. ते दोघ संगीतात वाटाघाटी व arguments करीत आहेत की काय असे वाटले. ती एक वाटाघाटीची, pleasant वादावादीची जुगलबंदी होती. T. V. नी अनेक वेळा replay करावी अशी. पखवाज व घटम वाजवणाऱ्याचे लांबच लाब केस नृत्य करायला लागले ! अमजद अली खा सरोदवर सवाद करायला लागले. इथ Comicality ( म्हणजेच Scenario ची ) इतकी Sincere होती की त्या Sincerity ने Comicality ला transcend केल !

नृत्यामधले असे comic प्रकार मला तरी आढळले नाहीत. नृत्य एक तर तुम्हाला आवडत किंवा आवडत नाही. Polarised affair असती. नृत्य क्वचितच कॉमिक असत

या T.V. वाल्यावर माझा फार रोष आहे. त्याना National Programme of Dance आणि Music हे उपरे वाटतात ! प्रोग्रॅम्सची गर्दी झाली की त्याची कुऱ्हाड नेमकी याच्यावरच कोसळते. सोमवार व गुरुवार आले की मला त्याना अशी तार करावीशी वाटते : ' For heaven's sake do not axe today's national programme of dance. ' (or music) खरं म्हणजे दूरदर्शनला privatisation ची गरज आहे.

कधी कधी तर हे T V वाले कहरच करतात. काही सेकदच ता...थय, ता...थय दाखवतील आणि सौंदर्यानुभवाची orgasm येण्याआधीच कट करून टाकतील. शिक येऊ येऊ करत न येणे.. आणि orgasm येऊ येऊ करत न येणे...अर्थात सौंदर्यानुभवाची...उत्कट प्रेमाची आणि मोहक नृत्य एकदम कट करणे, हे सर्व सारखेच !

कदाचित माणूस हसायला–बोलायला–गायला शिकला त्या आधी नाचायला शिकला–नव्हे लागला असेल ! अग्निशोध; हत्यार वापरणे याच्यामुळे जशी एक क्रांती सुरू झाली तसच संस्कृतीची क्रांती नाचण्याने सुरू झाली असावी.

–जे. एन्. पोंडा

## कामगार आणि त्यांच्यासाठी झटणारी

# कामगार कल्याण केंद्रं

अजूनही 'कामगार' असण ही काही फारशी प्रतिष्ठेची बाब मानली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रतिष्ठेची मानली जात नाही म्हणजेच अप्रतिष्ठित मानली जाते अस मात्र नव्हे. पण जर उद्या एखाद्या छोटयान डॉक्टर, इंजिनिअरच्याऐवजी 'कामगार' व्हायच ठरवल तर आपल्याला ते तितकस नाही पटत. अस वाटतं की काही नाही तर शेवटी ते आहेच, पण निदान इच्छा तरी चांगली धरावी.

इथच आपल चुकत. काही नाही म्हणून कामगार होण ही कल्पनाच चुकीची आहे. एक तर सगळेच जण डॉक्टर आणि इंजिनियर व्हायला लागले तर कामगार कोण होणार हा जसा अतिशयोक्तीचा प्रश्न आहे, तसाच काहीच नाही म्हणून कामगार व्हावं हा एक अतिशयोक्तीचा आणि चुकीचा सल्ला आहे. एवढेच नव्हे तर एकूणातच 'कामगार' या प्रकाराकडे आपण फारस कौतुकानं पाहात नाही. हे आपल्या वागण्यातून नेहमी दिसून येत असतं. अपवाद फक्त दुबई-मस्कती जाणाऱ्याचा आणि श्रीमंत कपन्यात काम करणाऱ्याचा. यामागच कारणही तितकच उघड आहे. मुबलक पैसा आणि त्यातून येणाऱ्या सुखसोईंची हाव. बस्स, अन्यथा बाकी सगळे कामगार आपण इथून तिथून सारखेच मोजतो. बर या श्रीमंत कामगाराकडून ज्यांना काही मिळत नसत ते देखील शेवटी कामगारच म्हणून सोडून देत असतात. थोडक्यात दगडापेक्षा वीट मऊ एवढाच फरक होतो.

बाकी सगळ सारखच. निळ्या डांगऱ्या, नाही तर ॲप्रन, जेवायचे डबे, भोंगे आणि वेळा याच गणित साधत गुरुवारपर्यंत मोठमोठ्या यंत्राशी झटणारी ही छोटी यंत्र. एवढच त्याच्याबद्दल खरं तर आपल्याला वाटत असत. त्यांचे संप, टाळेबंदी, मेळावे, जाहीरसभा, मिरवणुका, मालकांशी लढे, सगळीकडून त्याच होणार शोषण याबद्दल खर तर आपण ते तितकस सिरीयसली कधी घेतलेलच नसत आणि त्यामुळे आपलं त्याबाबत काही मतही नसतं.

थोड्या फार फरकाने इतक्या जनरलपणे आपण कामगार या प्रकाराकडे पाहात असतो. सगळ्या मानवी समाजाच्या आर्थिक उलाढालीपैकी फार मोठा भाग ज्याच्यावर, ज्याच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे त्या कामगाराकडे आपण नुसतें त्रयस्थपणे पाहातच नाही तर त्याच्याबद्दल काही ठाम गैरसमजुतीही आपण करून घेतलेल्या असतात.


एक तर सर्व कामगार हे दुसरं काहीच नाही म्हणून 'कामगार' झालेले असतात. बहुतेक सर्व कामगार हे अर्धशिक्षित व अशिक्षित असतात. त्याच ते करीत असलेल काम सोडल तर त्याना इतर काहीही येत नसत. मुख्यत: ढोर-मेहनतीसारखी अगमेहनतीची किंवा शारीरिक कष्टाची कामं कामगार करीत असतात. बहुतेक सर्व कामगार व्यसनी असतातच. कामगाराना डोक नसत. त्यामुळे कुणीही बारीक चिथावणी वगैरे दिली की ते लगेच पिसाटतात. एकदा कामगार भडकले की ते हिंस्त्र बनतात व ते लवकर भडकतात. कामगाराचा हा 'विकपॉईंट' नेते मंडळीनी हेरलेला असतो व त्याच्याच भाडवलावर ते मालक व कामगार यांच्यावर नियंत्रण ठेवत असतात. कामगाराना सौंदर्यदृष्टी, कला, कल्चर वगैरे प्रकार एकदम गूढ असतात. सतत यंत्राबरोबर राहून व अतिश्रमाने ते रुक्ष व बथ्थड झालेले असतात. नेते मंडळीत सुद्धा ज्याच कुठेच काही जमत नाही ते कामगार नेते होतात. कुणालाही स्वेच्छेने कामगार व्हायच नसतं. जर कुणी स्वेच्छेने कामगार होईल तर कामगाराचीच मुल. कामगाराच्या मुलानी व्हावं कामगार, असाच आपला सूर

असतो. एकूण कामगार हा प्रकार आपण दुय्यमच धरतो. आणि असं आपण उगाचच धरतो. कारण असं आपण का धरून चालतो हे आपल्याला कधीही सांगता येत नाही. किंबहुना आपण तसा विचारच कधी केलेला नसतो. हे सगळं आपण गृहित धरलेलं असतं आणि कुणी कधी जर पटवायचा प्रयत्न केलाच तर आपण हो ला हो करून सुटू पाहतो, नाही तर तुला काय एवढा आज कामगारांचा पुळका आलाय असं म्हणत पटवणाऱ्यालाच चिथवतो. पण कोणत्याही परिस्थितीत आपलं मत बदलत नाही. आपल्या अंगाला चिकटूच देत नाही.

कामगारांबद्दल आपला हा त्रयस्थ दृष्टिकोण बनण्यास फक्त आपणच जबाबदार असतो असं मात्र नाही. आपले चित्रपट, साहित्य, नाटकं, वृत्तपत्रं, रेडियो, टी. व्ही. हे सगळेजण कामगारांबद्दलचे आपले मत बनविण्यात आपल्याला हातभार लावीत असतात. अर्थात आपल्या चष्म्यातूनच आपण त्याकडे पाहात असतो.

अर्थात हे सगळं जरी थोड्याफार फरकानं असंच असलं, तरी ते तसं असू नये असं आपल्यालाही कुठे तरी वाटत असणार. याच हेतूने आज समाजात काही संस्था काम करताहेत. समाज आणि कामगार यांच्यामधील ही दरी नष्ट व्हावी व कामगार या शब्दाला, कामगार या पेशाला व कामगार या व्यक्तीला कामगार असण्याचा रास्त अभिमान प्राप्त व्हावा म्हणून या संस्था झटत आहेत. याबरोबरच कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांच्या सर्वांगीण विकासाकरितासुद्धा काही संस्था अविरत प्रयत्न करीत आहे. या व अशा तऱ्हेचे काम करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ही संस्था अग्रेसर आहे. तसं पाह्यला गेलं तर नावाप्रमाणेच ही संस्था शासकीय आहे आणि तांत्रिकदृष्ट्या अर्धशासकीय. कारण महाराष्ट्र शासनाने हे मंडळ ठराविक काळासाठी नियुक्त करण्याची पद्धत आहे. असं असलं तरी ही संस्था 'टिपिकल' सरकारी मात्र नाही. यामागचं महत्त्वाचं कारण म्हणजे या संस्थेचा उद्देश व संस्थेचा कर्मचारीवर्ग. एक तर कामगारांचा सर्वांगीण विकास हे या संस्थेचे ध्येय असल्याने अक्षरशः हजारो उपक्रम आयोजित केले जातात व प्रत्येक उपक्रम खरोखरी यशस्वी करून दाखवायचाच हे आव्हान. म्हणून प्रत्येक वेळी कर्मचारी ते स्वीकारतात व यशस्वी करून दाखवितात. (ते मगाचं हजारो जरा जास्तच वाटतंय का अंमळ? बरं मग शेकडो करा शेकडो.) बस्स? नाही, ही थोडी गंमत केली. कारण हजारो म्हणण्यामागचा हेतू असा की विविध ठिकाणी होणारे मंडळाचे कार्यक्रम व शेकडो अशासाठी की शेकडो प्रकारचे कार्यक्रम आणि यात खरोखरीच अतिशयोक्ती कुठेही नाही.

–तर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रम आयोजित करीत असते.




कामगारांसाठी अक्षरशः हजारो उपक्रम !

□

महाराष्ट्रामध्ये कामगार कल्याणाची सुरुवात महाराष्ट्राच्याही पूर्वी म्हणजे १९३९ साली करण्यात आली. त्यावेळच्या मुंबई राज्य शासनाने पहिले कामगार कल्याण केंद्र मुंबईतील डिलाईल रोड (पूर्वीचा) व (सध्याचा) ना. म. जोशी मार्ग येथे सुरू केले व भारतातील पहिले वहिले कामगार कल्याण केंद्र मुंबईत झाले. अर्थात मुंबईमध्ये उद्योग-धंदे मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे व बंदर असल्यामुळे इथे कामगार जास्त होते. त्यामुळेच हे केंद्र देशात सर्वप्रथम मुंबईत सुरू झाले व कामगार कल्याण कार्य सुरू करणारे देशातील पहिले राज्य हा मान महाराष्ट्राने मिळविला. अर्थात त्यावेळी महाराष्ट्र हे नाव नव्हतं पण तरीही.

तक्ता

| उपक्रमाचे नाव | सुरू झाल्याचे साल | पूर्वीची संख्या | सध्याची सख्या | सध्याची उपस्थिती | त्यावेळची उपस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| पाळणागृहे | १९६० | २ | ५० | २५० | १३ |
| शिशुमदिरे | १९६० | १७ | ७०० | १०,००० हून अधिक | २६० |
| शिष्यवृत्या व पुस्तकपेढी | १९६० | ९ | २०० | १२०० | ४९ |
| ग्रथालये व ज्ञानसवर्धन केंद्रे | १९६० | १० | १,७०० | ६,००० | ४९ |
| मंडळाचे शिवणवर्ग | १९६० | ३९ | २,००० | ७,००० | २०८ |
| सुसज्ज व्यायाम शाळा | १९६० | ४ | ३,००० | ८,००० | २० |
| आखाडे कुस्तीचे | १९६० | ५ | २,००० | ७,००० | १४ |
| दुरदर्शन सच व रेडिओ | १९६० | २० | ३,००० | १२,००० | ६० |
| गुणवत कामगार कल्याण | १९७९ | १०० | ५०,०० समारंभास | ७,००० समारंभास | १२० |
| राज्य नाटच स्पर्धा | १९५३ | २० सघ | ८,००० प्रेक्षक | ३०,००० प्रेक्षक | १२० सघ |
| राज्य क्रीडा स्पर्धा | १९६० | ५०० खेळाडू | ३,००० प्रेक्षक | १०,००० प्रेक्षक | ३,००० खेळाडू |
| अपगासाठी पूरक उद्योग प्रशिक्षण | १९८१ | २० ठिकाणी | २० अपंग विद्यार्थी | २०० अपग विद्यार्थी | २० |
| शासनमान्य शिवणवर्ग | १९६० | — | — | ९०० | ३६ |

इथे एक गमत सागण्यासारखी आहे डिलाईल रोडप्रमाणेच इतरही कामगार वस्त्यामध्ये कामगार कल्याण केंद्राची मागणी वाढू लागली. गोष्ट नक्कीच आशादायी होती पण जागेचा प्रश्न होता. (पाहिलत ना, बॅट दॅट टाईम ऑल्सो) मग अशी एक कल्पना पुढे आली की बहुतेक कामगार वस्त्यामध्ये दारू किंवा जुगाराचे बेकायदेशीर अड्डे आहेत ते स्थानिक लोकाच्या सहकार्याने शक्यतो सामोपचाराने व नपेक्षा कायद्याने ताब्यात घ्यायचे व त्या ठिकाणी कामगार कल्याण केंद्र सुरू करायच. या कल्पनेला त्याकाळी चागलाच प्रतिसाद मिळाला.

त्यानंतर मुबई कामगार कल्याण निधी अधिनियम (१९५३) हा कामगार कल्याण विषयक कायदा १९५३ मध्ये मजूर करण्यात आला. यानतर १ जुलै १९५३ पासून उपनिर्दिष्ट अधिनियमाखाली नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या मंडळाकडे कामगार कल्याणाची जबाबदारी सोपविण्यात आली. याबरोबरच राज्यातील ११ औद्योगिक शहरांमधील त्यावेळची सगळीच्या सगळी म्हणजे ३९ कामगार कल्याण केंद्रे मडळाच्या ताब्यात देण्यात आली. कामगार कल्याणाच्या या कार्यासाठी लागणारा निधी मडळाने कसा उभारावा याबाबतही मुबई कामगार कल्याण निधी अधिनियमात स्पष्ट तरतूद करण्यात आली. त्यान्वये मडळ पुढील ४ मार्गांनी निधी उभारू शकते. (१) कामगाराकडून वसूल केलेल्या सर्व दडाच्या रकमा, (२) अवितरित सचयन, (३) कोणतीही उत्स्फूर्त देणगी व (४) त्रिपक्षीय वर्गणी. यामध्ये कामगाराकडून प्रति सहा महिन्यासाठी ७५ पैसे, त्या कामगाराच्या मालकाकडून २ रुपये २५ पैसे व शासनाकडून १ रुपया ५० पैसे म्हणजे एका कामगारामागे मडळाला प्रति सहा महिन्यासाठी ४ रुपये ५० पैसे म्हणजेच एका वर्षाचे ९ रुपये (नऊ) मिळतात. ही त्रिपक्षीय वर्गणी म्हणजेच मडळाचे उत्पन्नाचे खरे साधन होय. ज्या कामगाराकडून मडळ ही वर्गणी गोळा करू शकते त्यामध्ये सर्व गिरण्या, उद्योगधदे यामध्ये काम करणाऱ्या कामगाराबरोबरच सर्व राष्ट्रीकृत बँका व विमा मडळाचे चतुर्थश्रेणी कर्मचारी याचाही समावेश आहे इतकेच नव्हे तर दुकाने, उपहारगृहे यासारखी पाचहून अधिक कामगार असणारी सर्व आस्थापने याचाही नुकत्याच झालेल्या कायद्यातील तरतुदीनुसार त्यात समावेश करण्यात आला आहे इथे एक गोष्ट स्पष्ट करायला हवी की एवढ्या सगळ्या आस्थापनाकडून निधी गोळा करण्यासाठी मडळाजवळ पुरेशी यत्रणा नाही आणि पुरेशा यत्रणेसाठी अजून कर्मचारी वाढवण मडळाला काही तात्रिक अडचणीमुळे सध्या तरी शक्य नाही. असे हे त्रागड आहे. त्यामुळे शक्य असलेल्यापैकी देखील ⅓ पेक्षा कमीच निधी मडळ उभारू शकते ही परिस्थिती आहे.

अस असल तरी मडळाच्या कार्यात मात्र मडळ यशस्वीच होत आहे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानतर मडळाला सध्याचे महाराष्ट्र कामगार कल्याण मडळ हे नाव मिळाले. सुरुवातीला ३९ असणारी कामगार कल्याण केंद्राची सख्या आज २१० इतकी वाढलीय. महाराष्ट्रातील ९० औद्योगिक शहरातून ही केन्द्रे आहेत. तसेच ३२ केन्द्रे ही प्रत्यक्ष झोपडपट्टीत काम करीत आहेत व १० कामगार कल्याण केन्द्रे सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात सबधित साखर कारखान्याच्या सहकार्याने समिती पद्धतीवर सुरू आहेत. एवढच नव्हे तर राज्याच्या या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील विविध महसुली विभागातील किमान एका खेडेगावात असघटित अशा ग्रामीण कामगार व त्याच्या

कुटुंबियासाठी कामगार कल्याण केन्द्रे सुरू करण्याचा संकल्प मंडळाने सोडला आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे कामगार व त्याच्या कुटुंबियाच्या सर्वांगीण विकासासाठी जे उपक्रम आयोजित केले जातात त्यामध्ये पाळणागृहे, शिशुमंदिरे, शिष्यवृत्त्या व पुस्तकपेढ्या, ग्रथालये व ज्ञानसंवर्धन केंद्रे, स्त्रियासाठी हस्तव्यवसाय व शिवणवर्ग, आतंगृह व मैदानी खेळाची प्रशिक्षण शिबिरे व स्पर्धा, व्यायामशाळा, पोहण्याचे तलाव, खुली व बंदिस्त नाट्यगृहे, दूरदर्शन संच व रेडिओची उपलब्धता, अपंग व्यक्तीसाठी पूरक उद्योग व व्यवसाय प्रशिक्षण प्रकल्प, कुटुंब कल्याण प्रशिक्षण प्रकल्प, विविध क्रीडा व नाट्यस्पर्धा आणि राष्ट्रीय दिनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन याचा समावेश असतो. याबरोबरच आदर्श गृहिणी उपक्रम व व्यसनविरोधी कार्यशाळेसारखे नैमित्तिक कार्यक्रमही मंडळ आयोजित करीत असतेच. व्यवसाय मार्गदर्शन शिबिरे, शालांत परीक्षा व्याख्यानमाला, तरुण–तरुणींचे एकत्र व स्वतंत्र मेळावे, कविसंमेलने याचेही वेळोवेळी आयोजन करण्यात येत असते.

या उपक्रमाना मिळणारा प्रतिसाद बाजूच्या पानावरील तक्त्यात दाखविला आहे.

याशिवाय कामगारामध्ये कुटुंब नियोजनाची जाणीव वाढीस लागावी म्हणून आतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सहकार्याने मंडळाने कुटुंब कल्याण प्रशिक्षण प्रकल्प हाती घेतला आहे. राज्यातील एकूण ९६ कामगार कल्याण केंद्रामधून हा प्रकल्प चालविण्यात येत असून जननक्षम जोडप्याना कुटुंब नियोजनासाठी प्रवृत्त करणे, कुटुंब नियोजनाच्या विविध साधनाची व शस्त्रक्रियाची माहिती देणे, जवळच्या कुटुंब कल्याण केंद्रात, त्याना पाठविणे असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे

तसेच हे सर्व उपक्रम सुरळीतपणे चालविण्यासाठी लागणाऱ्या इमारती, १९६० साली मंडळाच्या मालकीच्या अशा फक्त ४ होत्या आज ती सख्या २० आहे तसेच मंडळाने जलतरण तलाव, खुले नाट्यगृह आणि स्टेडियम याबरोबरच अतर्गृह व मैदानी खेळाच्या सोई एकाच जागी उपलब्ध करून देणारे मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन व पिंपरी–पुणे येथील कामगार कल्याण नगरी हे दोन विविधलक्षी प्रकल्प उभारले आहेत.

गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार ही योजना मंडळाच्या वतीने १९७९ साली सुरू करण्यात आली. अशा तऱ्हेची संपूर्ण देशातील ही सर्वप्रथम योजना आहे. सुरुवातीला या योजनेद्वारे दरवर्षी १०० गुणवंत कामगार निवडले जात व त्याना पुरस्कृत केले जाई. पुढे १९८४ सालापासून ही सख्या ११० वर नेण्यात आली व महिला कामगारासाठी १० जागा राखून ठेवण्यात आल्या. यदा १९८६ साली १२० कामगारांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. या पुरस्कारासाठी कामगाराची निवड करताना त्याचे काम, उपस्थिती, कामाच्या ठिकाणचे वागणे–बोलणे, कामातील विशेष उल्लेखनीय यश, कामगार संघटनाशी त्याचे सबध व स्वरुप, जिथे राहतो तिथे केलेले समाजकार्य, व्यसनी नाही ना, कुटुंब मर्यादित आहे ना,–शस्त्रक्रिया केली आहे का, आर्थिक स्थिती व शिक्षण यासारख्या सर्व गोष्टीचा सागोपाग विचार केला जातो दरवर्षी १ मेला राज्यपाल वा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ही पारितोषिके दिली जातात या पारितोषिकामध्ये मानचिन्ह, प्रशस्ती पत्रक व रोख ५०० रुपये याचा समावेश असतो. साधारण फेब्रुवारीच्या सुरुवातीस किंवा अखेरपर्यंत या पुरस्काराचे छापील फॉर्म कामगाराना उपलब्ध करून दिले जातात. या फॉर्मवरील माहितीच्या आधारेच कामगाराची निवड केली जाते. कामगारामध्ये या पुरस्कारासाठी निकोप स्पर्धा असून या योजनेला वाढता प्रतिसाद मिळत आहे. यदा ५०० हून अधिक छापील फॉर्म्स कामगारानी नेले व त्यातील २००० हून अधिक योग्य तऱ्हेने भरलेले परत मिळाले.

याशिवाय मंडळाच्या नाट्य व क्रीडा स्पर्धा हा एक महत्त्वाचा भाग आहे. विशेषत: मराठी नाटकवाले ' कामगार कल्याणच्या ' राज्यस्तरीय नाट्यस्पर्धांना विशेष महत्व देताना दिसून येतात याचे एक कारण– मंडळाची ही राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा शासनाच्या स्पर्धेपेक्षा ७ वर्षे जुनी आहे १९५३ साली प्रथम ही स्पर्धा आयोजित करण्यात आली व त्यानंतर ती विनाखंड आजपर्यंत चालू आहे. त्यामुळे तिला एक भारदस्त परंपरा आहे. तसेच मराठी रंगभूमीच्या उतरत्या काळात देखील ही स्पर्धा मंडळाने नेटाने चालविली याबद्दल अनेक नाट्यप्रेमी मंडळाचे ऋण मानतात. कामगार कल्याण मंडळाच्या या नाट्यस्पर्धेत निरनिराळ्या प्रकारची सर्वप्रथम नाटके सादर करण्यात आली आणि त्यानंतर ती व्यावसायिक रंगभूमीवर आली. यामध्ये तेंडुलकराचे श्रीमंत किंवा मच्छिंद्र कांबळीचे वस्त्रहरण विशेष उल्लेखनीय. मंडळाच्या या नाट्यस्पर्धेतून मराठी रंगभूमीला अनेक प्रथितयश कलाकार, लेखक व तंत्रज्ञ मिळालेले आहेत. ज्यामध्ये यशवंत दत्त, रोहिणी हट्टंगडी, गणेश सोळंकी, नितीन मंत्री, श्रीराम गोजमगुंडे, दिनानाथ लाड, सिताराम खैरे हे कलाकार व वसंत जाधव, कै. ला. कृ. आपटे, मुरारी शिवलकर, आत्माराम सावंत या नाट्यलेखकाची नावे प्रामुख्याने सांगता येतील. याशिवाय मंडळ वेळोवेळी नाट्यप्रशिक्षण शिबीरे, नाट्यविषयक व्याख्याने, एकपात्री अभिनय स्पर्धा, बालनाट्य महोत्सव, महिला नाट्यमहोत्सव आयोजित करीत असते. कामगाराचे जीवन त्याच्या समस्या समाजापुढे याव्यात या हेतूने मंडळाने यंदा कामगार जीवनावर नाटक लिहिण्याची ' कल्पना आमची रचना तुमची ' या नावाची नाट्यलेखन स्पर्धाही आयोजित केली होती. तसेच लोककलाना उत्तेजन मिळावे व त्या समृद्ध व्हाव्यात म्हणून मंडळ दरवर्षी कोकणात ' दशावतारी नाट्यमहोत्सव ' आयोजित करते व त्याला नेहमीच उत्तम प्रतिसाद मिळतो.

मंडळाचे क्रीडा विषयक उपक्रमही फार लोकप्रिय आहेत. आतर्गृह व मैदानी खेळाची प्रशिक्षण शिबीरे, विविध स्तरीय स्पर्धा यातून अनेक यशस्वी खेळाडू पुढे आले आहेत. ज्यामध्ये कबड्डीचे सदानंद शेटये, कॅरमचे अरूण केदार क्रिकेटचे रामनाथ पारकर, बुद्धिबळाच्या खाडिलकर भगिनी याचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

जागेची मर्यादा लक्षात घेता हे खर तर इथेच थांबवायला हवं, पण आपल्याकडून 'कामगार' या शब्दाला रास्त सन्मान मिळेपर्यंत हे चालूच ठेवायला हवं !

— प्रतिनिधी

# माणिक वर्मांचा सत्कार

## तीन रात्री बहरलेला स्वरांचा पारिजात...

अरविंद गजेंद्रगडकर

माणिकताई साठ वर्षांच्या झाल्या? छे खरच वाटेना. काही काही गोष्टी अशा असतात की त्याना कालस्पर्श होईल आणि त्याचा ताजेपणा, त्याचा टवटवीतपणा कमी होईल हे मानायला मन तयारच होत नाही संगीत कळायला लागल, किंबहुना संगीताची आवड निर्माण झाली तेव्हापासून आमची सोबत करणारा हा निर्मळ, प्रसन्न आणि भावपूर्ण आवाज आता 'साठी' पूर्ण करतो आहे हे खरच वाटेना. परवा दूरदर्शनवर 'प्रतिभा आणि प्रतिमा' या कार्यक्रमात माणिकताईंचे केलेले हाल पाहिले आणि माणिकताई साठ वर्षांच्या झाल्या या कटु सत्याच हलाहल. निमूटपणे गिळून टाकलं. 'तुमच्या माणिकताई फक्त भावगीत आणि भक्तिगीतच गातात वाटत?' प्रतिभा आणि प्रतिमा पाहून नव्या पिढीतल्या एका तरुणानं छद्मीपणान विचारल. काय सांगणार? दूरदर्शनच्या अदूरदर्शी कॅमेऱ्याला त्याचा केवळ एवढाच पैलू दिसला हे केवढं दुर्दैव!

नकळत मन तीस वर्षापूर्वीच्या मैफलीत रमलं. कलकत्ता! तिथलं रॉक्सी थिएटर! अखिल भारतीय संगीत संमेलन! नजाकत अली, सलामत अली या पाकिस्तानी बंधूंनी 'मालकंस' राग अशा ताकदीन उभा केला होता की दोन तास भान हरपून सारे ऐकत होते. त्याचा आवाज, त्या आवाजाचा आवाका, त्याच्या त्या वजनदार ताना आणि ठुमरीचा नखरा यानी सारा श्रोतृवर्ग दिपून गेला होता अवाक् झाला होता.

दुसऱ्याच दिवशी सकाळी त्याकाळचे संगीत सम्राट, संगीत मार्तंड प. ओंकारनाथ ठाकूर 'देवगिरी बिलावल' अशा ताकदीने आणि जिद्दीने गायले होते की आदल्या रात्रीच गाण लोक साफ विसरून गेले होते. त्यानंतरच्या भजनान तर पंडितजींनी श्रोत्याना भक्तिरसाच्या महासागराच दर्शन घडवल होत. अशा दिग्गजांच्या गर्दीत पुण्याच्या 'माणिक वर्मा' नावाच्या एका साध्यासुध्या तरुणीन तंबोरा हातात घेऊन रंगमचावर प्रवेश केला. प्रसन्न चेहरा, साधी वेषभूषा आणि नजरेत आत्मविश्वास! तंबोरा स्वरात लावून तिनं स्वर लावला आणि श्रोते एकदम शांत झाले. या 'पख-रवनी' पोरीच गाण काय ऐकायच असा विचार करून चहापानासाठी बाहेर गेलेले बगाली बाबूमोशाय लगबगीने तोंडात पान कोंबीत आपापल्या जागेवर आले आणि पान चघळायचच विसरले. अमृताच्या चंद्रातून अमृतस्वर पाझरावे तसे शांत स्वर स्रवत होते. त्या स्वरातून साकारत होती तोडी रागिणी. शांत, करुण आणि घरदाज. या गाण्यात तयारीचं आकाडतांडव नव्हत, संगीतापेक्षा गायक श्रेष्ठ आहे हे पटविण्याचा अहंकारी अभिनिवेश नव्हता, चमत्कृतीनं दिपविण्याचा पोरकट खटाटोप तर नव्हताच नव्हता. फक्त होती लीनता, तल्लीनता आणि शालीनता!

त्या संगीत संमेलनातली ती तोडी, त्यानंतरची ठुमरी आणि त्यानंतर बेभान झालेल्या श्रोत्यांनी अविरत केलेला टाळ्यांचा गजर! तीस वर्षांनंतरही अजून कानात घुमतो आहे.

भावगीत, सिनेसंगीत, नाट्यगीत या प्रकारच्या ललित् संगीतामुळे माणिकताईंचं संगीत सामान्यापर्यंत पोचलं हे तर खरच; पण अभिजात संगीतातही त्यांनी जी कामगिरी केली आहे तिचं विस्मरण संगीत प्रेमिकाना होणं शक्यच नाही. अनेक गुरूकडून घराण्याची गायकी त्यांनी मिळवली. अनेक सुंदर सुंदर, गोजिऱ्या बंदिशी त्यांनी मधुमक्षिकेच्या वृत्तीन गोळा केल्या. त्या बंदिशी त्यांनी मैफिलीत पेश केल्या तेव्हा त्याना 'माणिक प्रभेची' खास झळाळी लाभली. आग्रा घराण्याचा आक्रमक सिंहस्वरसुद्धा माणिकताईंच्या गोड गळ्याच्या रिंगणात लडिवाळपणेच वावरू लागला. माणिकताईंच्या जीवनात ललित संगीताचा पारिजात बहरला; पण त्या बहरलेल्या पारिजाताला अभिजात संगीताच्या सुवर्ण कळसाचा लखलखणारा आधार आहे हे कधीच विसरता येणार नाही.

माणिकताईंच्या षष्ठ्यब्दिपूर्तीचा समारंभ तीन रात्री चालणार आणि त्या कार्यक्रमात तीन पिढ्यांचे कलावंत हजेरी लावणार हे कळल्यानंतर सर्व काम बाजूला ठेवून या अपूर्व सोहळ्यासाठी मुंबईला जायचा निश्चय केला. अपार आनंद देणाऱ्या या समारंभाला हजर रहाता आल हे माझं परम भाग्य.

### सुगम संगीताने सुरुवात

एक मे! समारंभाची पहिली रात्र! दादरच्या किंग जॉर्ज प्रशालेच मैदान माणसानी फुलून गेल होत. पहिली रात्र सुगम संगीताने सजणार होती वासंती मुझुमदार निवेदन करणार होत्या बरोबर साडेसातला कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. त्यानंतर एक अतिशय गोड गायन झाल. ते म्हणजे माणिकताईंच्या सर्व नातवंडानी मिळून सादर केलेल माणिक आजीच गौरवगीत. या अभिनव गीताला प्रचंड टाळ्या देऊन श्रोत्यानी त्याच भरपूर कौतुक केलं.

सुगम संगीताने सुरू होणाऱ्या या सोहळ्याचा शुभारंभ गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर यांच्या हस्ते झाला दीप प्रज्वलन करून त्यानी या सोहळ्याची सुरुवात केली. सुगम संगीताच्या त्या रात्रीच्या कार्यक्रमात सुरुवातीला श्रीकांत पारगावकर यानी दोन गीत सादर केली. त्यानंतर शोभा जोशी, रवींद्र साठे, शैला दातार, श्रीधर फडके, उत्तरा केळकर, गजानन वाटवे या नव्या जुन्या कलाकारानी गीते सादर केली. रवींद्र साठे याचा आवाज छान लागला होता शैला दातार स्वतःला माणिकशिष्या म्हणवतात. पण त्याच्या गाण्यात माणिकताईंच्या स्वरांचा लडिवाळपणा आणि गोडवा कुठेच दिसून आला नाही. गुरू मोठा असून भागत नाही तर मोठ्या गुरूचं गाणं पेलायल

शिष्यही तितक्याच ताकदीचा लागतो हे पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवले. बाकी सगळे ठाकठीक गायले. पण विशेष उल्लेख करायला हवा तो गजानन वाटवे यांचा. अत्यंत साधेपणाने पण अत्यंत भावपूर्णतेने त्यांनी सादर केलेली दोन्ही गीते खरीखुरी भावगीते होती. इतरानी भरपूर वाद्यवृंद घेतला होता. पण वाटव्यांनी केवळ तबला आणि पेटी एवढ्यावरच ती गीतं इतक्या सहजतेनं आणि उत्कटतेनं सादर केली की ती ऐकून श्रोते भारावून गेले. सत्तरीजवळ आलेल्या वाटव्यांच्या आवाजानं मात्र अजून चाळिशीपण ओलांडलेली नाही असंच वाटलं.

मध्यंतरानंतर राणी वर्मा, सुरेश वाडकर, शोभा गुर्टू, अरुण दाते, स्वतः माणिक वर्मा आणि सुधीर फडके यांनी गीतं सादर केली. सुरेश वाडकरांचं 'दयाघना का तुटले चिमणे घरटे' हे पूर्वी रागावर आधारलेलं गीत परिणामकारक होते. शोभा गुर्टू यांनी मिश्र पिलूचा दादरा आणि कजरी सादर केली. त्यांनी आपला रंग जमवला. माणिकताईंनी 'अमृताहुनी गोड' हा अभंग सादर केला. सुधीर फडके यांचा आवाज ठीक नव्हता. तरीसुद्धा त्यांनी वेगळ्या ढंगात सादर केलेलं 'धननीळा लडिवाळा झुलवू नको हिंदोळा' हे गीत अतिशय लडिवाळ आणि प्रभावी झालं. एकंदरीत या सुगम संगीताच्या मैफलीत नव्यांपेक्षा जुन्यांचाच प्रभाव जास्ती पडला.

## स्वरांचा शीतल शिडकावा

दुसऱ्या मध्यंतरानंतर सौ.किशोरी अमोणकर रंगमंचावर आल्या. तबल्याला बालकृष्ण अय्यर आणि पेटीला सीमा मेस्त्री ही युवती होती. मध्यरात्र उलटली होती. त्या समयाला उचित असा राग त्या आळवतील अशी अपेक्षा होती. किशोरीताईंनी यमन रागाचे स्वर घेतले तेव्हा श्रोत्यांना किंचितसे आश्चर्य वाटले खरे; पण एकामागून एक येणाऱ्या त्या मंदमधुर स्वरांच्या शीतल शिडकाव्यात हे आश्चर्य कुठच्या कुठे विरघळून गेले. किशोरीताई त्या रात्री उत्तुंग गायल्या. परंपरा आणि नवीनता, बुद्धिमत्ता आणि भावपूर्णता, शास्त्र आणि माधुर्य यांचा सुरेल आणि सुरेख संगम त्यांच्या त्या गाण्यात अनुभवायला मिळाला. त्यानंतर त्यांनी एक मधुर भजन सादर केले आणि ते मधुर स्वर घेऊनच श्रोते पहाटे घरी परतले.

दुसऱ्या रात्री नाट्यसंगीत सादर करण्यात आले. मानापमान या नाटकाला यंदा पंचाहत्तर वर्षे पूर्ण होताहेत हे लक्षात घेऊन या मैफलीची सुरुवात 'नमन नटवरा विस्मयकारा' या मानापमानाच्या नांदीनेच करण्यात आली. यात औचित्य होते यात शंका नाही. या रात्रीच्या मैफलीचे निवेदन करुणा देव यांनी केलं. मध्यंतरापर्यंत मंगला गौतम, शिवानंद पाटील, मोहिनी निमकर, राजा काळे आणि अर्चना कान्हेरे यांनी दोन दोन नाट्यगीते सादर केली. मंगला गौतम या माणिकताईंच्या शिष्या आहेत म्हणे. पण त्यांच्या गाण्यात सूर आणि भाव यांचा अभावच होता. त्यांचे गाणे हा एक कष्टदायक अनुभव होता. मोहिनी निमकर छान गायल्या.

मध्यंतरानंतर प्रकाश घांग्रेकर, शरद जांभेकर, जयमाला शिलेदार आणि लालजी देसाई यांनी नाट्यगीते सादर केली. शरद जांभेकर यांचे 'पावना वामना' हे सौभद्रातलं पद अप्रतिम झालं. जयमालाबाईपण त्यांच्या शैलीत छान गायल्या. त्याच रात्री पोलीस आयुक्त श्री. सोमण यांचा सत्कार करण्यात आला.



तृप्तो...

तिसरी आणि शेवटची रात्र ही अभिजात संगीताची होती. पहाटेपर्यंत जागायचं अशी खूणगाठ बांधूनच सर्व आले होते. या रात्रीचे निवेदक होते प्रभुराम जोशी.

मैफलीची सुरुवात भारती आचरेकर यांनी पूरिया कल्याणच्या ख्यालाने केली. त्यानंतर आलेल्या आशा खाडिलकर यांनी शंकराचा ख्याल सुरेख आळवला. सुरेलपणा, घराण्याची शिस्त आणि तडफदारपणा यांचे मनोहर दर्शन त्यांच्या गाण्यात झाले. स्वतः माणिक वर्मा यांनी भूप रागातला ख्याल सादर केला.

## उगवती पिढी

यानंतर जो सत्कार समारंभ झाला त्याला जे हजर होते ते खरोखर धन्य! इतका आटोपशीर आणि भावपूर्ण सोहळा क्वचितच पहायला मिळतो. या समारंभासाठी खास लिहिलेले पद्माकर कांबळी यांचे गीत, अर्चना कान्हेरे आणि मंगला गौतम यांनी गायले त्यानंतर सत्कार समितीचे उपाध्यक्ष श्री. रामकृष्ण बाक्रे यांचे भाषण झाले. पंतप्रधान राजीव गांधी आणि इतरांचे आलेले संदेश यांचे वाचन त्यांनी केले. सुमन फडके आणि योगिनी जोगळेकर यांनी गौरवगीते वाचून दाखविली. सर्व शिष्यांच्या वतीने

आशा खाडिलकर बोलल्या. गुरू आणि व्यक्ती म्हणून माणिकताई किती मोठ्या आहेत हे त्यानी थोड्या शब्दात अत्यत भावपूर्णतेने सागितले मोहिनी निमकरपण छान बोलल्या. भीमसेन जोशी याच्या औचित्यपूर्ण भाषणानतर सत्कार समारभाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यानी अत्यत 'मार्मिक' शब्दात माणिकताईंचा गौरव केला. महाराष्ट्र शासनाने इतक्या मोठ्या समारभाची दखलही घेऊ नये याची त्यानी खत व्यक्त केली. शिवसेनेतर्फे त्यांनी एकसष्ट हजार रुपयाची थैली माणिकताईच्या स्वाधीन केली, तेव्हा प्रचड टाळ्या वाजल्या. त्यानतर गगूबाई हनगल याच्या हस्ते शाल, श्रीफल आणि सौभाग्य लेणे देऊन माणिकताईंचा सत्कार करण्यात आला. प्रत्येक वक्त्याने श्री. अमर वर्मा याचा अत्यत गौरवपूर्ण उल्लेख केला. गगूबाई हगल यानी सुद्धा आपल्या कानडी ढगाच्या मराठीत माणिकताईच्या गाण्याचा आणि त्याच्या गोड स्वभावाचा आवर्जून उल्लेख केला. त्या भाषणातला आपलेपणा, भाषेचे अडसर ओलाडून श्रोत्याच्या हृदयाला भिडला. सत्कार समितीचे अध्यक्ष प. वसतराव कुलकर्णी यानी भाषण करून समितीतर्फे पचाहत्तर हजार रुपयाची थैली माणिकताईंना अर्पण केली.

यानंतर माणिकताईंनी त्यांच्या आप्तेष्टाचा तर सत्कार केलाच पण त्याच्या जीवघेण्या आजारात ज्यांनी ज्यानी त्याना मदत केली त्या सर्वांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करून त्यांना भेटवस्तू दिल्या. सत्काराला उत्तर देताना अनेक वेळा त्याचा गळा भरून येत होता. त्यानी शेवटी साऱ्या जनता जनार्दनाला कृतज्ञतेने अभिवादन करून त्याला फूल अर्पण केले तेव्हा साऱ्याचेच अत करण हेलावले

या अत्यत हृद्य अशा सत्कार समारभानतर पुन्हा मैफल सुरू झाली उगवत्या पिढीतली अत्यत लोकप्रिय गायिका सौ. आरती टिकेकर ( अंकलीकर ) ही रगमचावर आली. तिने आळवलेला बागेश्री सर्वच दृष्टीने सरस होती. वजनदार स्वर, रागाची समजूत, लयीवर पकड, बोल, तानाचे प्रकार. हे सारे तिच्याकडे आहे. त्यामुळे तिची बागेश्री श्रवणीय आणि अविस्मरणीय झाली. 'ना डारो रग' ही जलद एक तालातली चीज तर अतिशय रगली. ओंकार गुलवाडी आणि गोविंदराव पटवर्धन यानी तबला पेटीची साथ उत्तम केली.

आरतीचा रग इतका जमला होता की त्यानंतर कुणाचाही रग जमणे जरा कठीणच होत. पण पुण्याच्या सौ. वीणा सहस्त्रबुद्धे यानी हे कठीण काम सहजपणे केले. अर्थात सुरुवातीला त्याचा 'मधुकस' म्हणावा तसा जमला नाही. पण पधरा वीस मिनिटानतर मात्र त्यानी गाणे जमवले. त्यानी 'मधुकस' नतर सादर केलेला बसत हा जास्ती आकर्षक होता. त्याच्याबरोबर तबल्याला सुभाष कामत आणि पेटीला प्रमोद मराठे होते

रात्री दोन वाजताच भीमसेन जोशी रंगमंचावर आले. त्यानी सुमारे पाऊणतास मालकस आळवला आणि त्यानतर भैरवीतली 'बाजूबद खुलखुल जा' ही चीज गाऊन या भव्य समारभाची सागता केली. तुलसीदास बोरकर यानी पेटीची साथ केली. ओकार गुळवडी यानी तबल्याची साथ केली.

एवढ्या मोठ्या समारंभाचे नियोजन अत्यत शिस्तबद्ध होते. ध्वनिक्षेपणाची व्यवस्था चोख होती. डोळे आणि कान याच पारणं फेडणारा असा हा समारभ होता.

¤

## नाट्यदर्पण रजनी एक तप

नाट्यदर्पण नावाचे नाट्यविषयाला वाहिलेले मासिक आहे हे किती लोकांना ठाऊक आहे हे सागता येत नाही. पण 'नाट्यदर्पण रजनी' नावाचा सोहळा दरवर्षी मुबईला होतो. त्या सोहळ्याला मात्र लोकाची गर्दी असते. या रजनीची लोकं अगदी आतुरतेने वाट पहात असतात सगीतप्रेमी ज्या प्रमाणे सवाईगधर्व सगीत महोत्सवाची वाट पहात असतात. त्याच आतुरतेने नाट्यप्रेमी रसिक या नाट्यदर्पण रजनीची वाट पहात. असतात ही रजनी आता मुबई पुण्याच्या सास्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य घटकच बनून गेली आहे गेली दहा वर्षे ही रजनी दहा जुलैला व्हायची. पाऊस असो नसो ही रजनी ओव्हरफुल्ल व्हायची. रवींद्र नाट्य मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून रसिक नाट्यप्रेमी नाना नाटके करायचे. अजूनही करतात. सुमारे हजारेभर लोकाना सामावून घेण्याची क्षमता असणाऱ्या त्या नाट्यगृहात दोन हजार लोक वाटेल तसे बसलेले, उभे असलेले दिसतात. रात्रभर उभे राहून देखील कार्यक्रम बघण्याची लोकाची तयारी असते आपल्याला केवळ रंगमच आणि रुपेरी पडद्यावरच दिसणारे कलावत मेकअपशिवाय अगदी जवळून बघता यावेत म्हणून कित्येक लोक प्रवेशद्वाराजवळ सध्याकाळपासूनच गर्दी करून उभे असतात. रवींद्र नाट्य मदिरात फार गर्दी होते म्हणून हा कार्यक्रम षण्मुखानद हॉलमध्ये एक दोनदा करून पाहिला पण तिथे मराठी रग काही जमेना मग रवींद्रनाट्य मदिराच्या आवारात क्लोज सर्किट टी. व्ही. ठेवण्याचा प्रयोग करण्यात आला. त्यात पण रग भरेना. मग 'जैसे थे' याच प्रकारे कार्यक्रम सादर केला गेला.

गेल्या वर्षीपासून ही रजनी तीस एप्रिलला करण्यात येते. यदा या रजनीचे बारावे वर्ष होते. प्रमुख पाहुणे होते पु. ल देशपांडे. या मैफिल सम्राटाची उपस्थिती आणि भाषण हे या रजनीच प्रमुख आकर्षण होत. अध्यक्ष होते प्रभाकर पणशीकर.

सध्याकाळच्या सहापासूनच रवींद्र नाट्य मदिराच आवार लोकानी भरू लागलं होत. प्रचड उकाडा होता. पण नाट्यगृहाच्या प्रवेशद्वारापाशीच एक प्रचड सुगधी फवारा रसिकाच्यावर सुखद शीतल शिडकावा करीत होता. त्या शिडकाव्याने सुखावलेले रसिक मग सुशीतल प्रेक्षागृहात आरामात बसून कार्यक्रमाची वाट पहात आजूबाजूचे चेहेरे न्याहाळीत होते. 'अरे, ती बघ टी. व्ही. ची सुहासिनी', 'ते भालचद्र पेंढारकर. त्याच्या शेजारी मालती पेंढारकर. त्या सुधा करमरकर, तो बघ यशवत दत्त.' असे उद्गार कानावर पडत होते.

साडेसातला तिसरी घटी झाली आणि पडदा उघडला. सूत्रधार आणि नटीच्या वेषातल्या चार बालकलाकारानी मानापमानाच्या नादीचे स्वर आळवायला सुरुवात केली. 'नमन नटवरा विस्मयकारा' केदार दाडेकर, सदीप टिळक, जान्हवी राणे आणि प्राची खाडेकर यांच्या या नांदीनतर नाट्य दर्पण प्रतिष्ठानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम दारव्हेकर यानी सर्वांच स्वागत करून कार्यक्रमाची कल्पना

दिली. त्यानंतर नाट्य दर्पण वर्षारंभ अकाचं प्रकाशन झाल. त्यानतर दाजी भाटवडेकर, गगाराम गव्हाणकर आणि प्रभाकर किजवडेकर याचा पु. लं. च्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यानतर विशेष कर्तृत्व दाखविलेल्या कलाकारांचा सत्कार करण्यात आला जब्बार पटेल, प्रकाश घाग्रेकर, कुमार केदार, दाडेकर, विजय पाटकर, जयत सावरकर, गोविंद पटवर्धन, गणेश भट या कलावताचा सत्कार झाल्यानतर नाट्य दर्पण मानचिन्हाचे वितरण झाले. हे मानचिन्ह मिळविणे हा आपल्या आयुष्यातला बहुमान आहे अस प्रत्येक कलाकाराला वाटतं. यानंतर प्रमुख पाहुणे पु. ल. देशपाडे याच भाषण झालं 'मैफिलसम्राट' या उपाधीला शोभणारं असच त्याच भाषण झाल. नर्म विनोद, कोपरखळ्या, नाट्यक्षेत्रातले अनुभव आणि रगमचावरच्या विचारवंताचे विचार अशी सुरेख गुफण करीत त्यानी तासभर लोकाना झुलत ठेवले. समीक्षकावर मात्र ते जरा चिडूनच बोलले. पण हे मात्र मानायलाच हव की भाईंचं हे भाषण हे त्याच्या उत्तम भाषणापैकी एक होतं. या भाषणातच सर्व काही 'वसूल' झालं असं प्रेक्षकाना वाटल.

पहिल्या मध्यतरानतर 'नटवर नटवरी' हा कथ्थक नृत्याचा कार्यक्रम 'अरुण चादीवाले' यानी सादर केला. या नृत्यात कलेपेक्षा कारागिरीचाच भाग जास्त होता. तबला वादकाने तर तबला सुरात लावून घेण्याचे पण कष्ट घेतले नव्हते. बेसूर तबला वाजवत (की बडवत) होता. पासष्ट चकरा मारण्याचा प्रकार जरा आचरटच वाटला.

'रजनी नाथ हा' हे प्रहसन मात्र छान रगले सुधीर कवडी या तरुण लेखकाने लिहिलेले हे प्रहसन खुसखुशीत आणि खूप गमतीदार होते. टी व्ही वर गाजणाऱ्या तडफदार रजनीच्या नाथावर कोणते प्रसग येऊ शकतील याची ही मालिका लोकाना खूप आवडली. लोकप्रिय नाट्यगीतांचा मार्मिक उपयोग करून भरपूर विनोद निर्माण केला गेला.

विद्याधर गोखले आणि भाऊसाहेब पाटणकर याच्या शायरीची जुगलबदी अपेक्षाभग करणारी ठरली रामदास फुटाणे यानी काही चिल्लर विनोद केले. बहुसख्य मडळी चहापानाला निघून गेली.

यानतर कार्यक्रम पत्रिकेत श्रीकला हट्टगडी आणि मल्लेश याचा वाघ्यामुरळी हा कार्यक्रम होता. पण तो झालाच नाही. त्या ऐवजी यशवत दत्त यानी 'डाव्या डोळ्याची' कथा पुन्हा एकदा सांगितली. गेली दोनतीन वर्षे तीच कथा त्याच जोमाने ते सांगताहेत. लोकही त्याना त्याच कथेचा आग्रह करतात. त्याना काहीतरी नवीन सागू द्यावे हा विचार आता रसिकानी करायला हवा.

प्रसिद्ध तालवाद्य विशारद अण्णा जोशी याच्या तालवाद्याबरोबर गद्य स्वगते हा प्रकार अभिनव आणि या क्षेत्रातला नवा प्रयोग होता. यशवंत दत्त यानी काही प्रसिद्ध स्वगते अत्यंत ताकदीने पेश करून श्रोत्याच्या टाळ्या मिळविल्या.

'अशतः रामायण' झकास रंगले. मच्छिंद्र कांबळी यांचे सवादफेकीचे आणि अभिनयाचे कौशल्य यावेळी प्रकर्षाने जाणवले.

गोविंद पटवर्धन आणि चंद्रचूड वासुदेव याची हार्मोनियम जुगलबदी सुरुवातीला बरी वाटली. पण नंतर मात्र लोक कटाळले. यात कलाकारांचा दोष नाही, दोष आहे वाद्याचा. हार्मोनियमच्या एकसुरी आवाजाला लोक फार काळ सहन करू शकत नाहीत. प्रकाश घाग्रेकराच्या भैरवीने या सुरेख सोहळ्याची सागता झाली.

हा एवढा मोठा सोहळा इतक्या शिस्तीत पार पाडल्याबद्दल नाटचदर्पणचे सुधीर दामले आणि सौ. जयश्री दामले याचे अभिनदन ! □

---

रंगभूमी

# 'मुंबई–मुंबई'

---

## प्रिय पुरुषोत्तम बेर्डे

खर तर तू तुझ्या 'मुबई–मुबई' नाटकाची ज्या पद्धतीन करतोस त्या पद्धतीनं लिहायचं तर बेर्डे–बेर्डे असं लिहाव लागेल. तुझं नाटक पाहिलं आणि नेहमीच्या पद्धतीनं नाटकाच समीक्षण न लिहिता तुझ्या जाहिरात पद्धतीन तुला कळवाव अस ठरवल. कारण तू ही नेहमीपेक्षा वेगळी वाट स्वीकारली आहेस.

तुझी ही वेगळी वाट याच नाटकान सुरू झालीय असं नव्हे तर मी तुझी रंगमचीय कारकीर्द पाहतोय तेव्हापासूनची आहे तू केलेल्या सर्वच एकाकिका मी पाहिल्या आहेत असं नव्हे; पण तुझ्या नावे जी महत्त्वाची प्रयोगनिर्मिती आहे त्यातलं बरचस पाहिलय. उदाहरणार्थ 'अल्वारा डाकू', 'चूहे', 'प्रियसखी', 'देवस्की' आणि 'टूरटूर' इत्यादी आणखी काही. तू 'या मडळी सादर करू या' या पद्धतीनं हौशी–प्रायोगिक स्तरावर काहीबाही करीत होतास तेव्हा अर्थातच रगभूमीचं वर्तुळ खूपच सीमित होतं; पण अर्थपूर्ण होत. तू ज्या जिद्दीनं, ताकदीनं 'अल्वारा डाकू' पेश केलंस ते अनेक अर्थानं रंगभूमीची जाण (प्रयोगकर्ते आणि प्रेक्षक) उभयपक्षी वाढवणार होत. 'प्रियसखी' सारखा प्रयोग फार मोठ्या प्रमाणात पोहोचला नाही तरी त्या मागचा कलाविचार आणि अथक परिश्रम लक्षणीय होते.

पण जेव्हा तू 'टूरटूर' घेऊन आपल्या सर्व कलाकार सवगड्यासह व्यावसायिक रगभूमीच्या रिंगणात उतरलास तेव्हा अपूर्वाईचं वातावरण निर्माण झाल होत. त्यामध्ये दोन पक्ष होते. एक या नाट्यप्रकाराकडे तुच्छतेन, नगण्यपणान पाहणारा प्रेक्षकवर्ग होता. तर दुसरा हा वेगळा नाट्यप्रकार काय आणि कसा आहे हे उत्सुकतेनं जाणून घेणारा होता कोणत्याही वेगळ्या प्रयोगनिर्मितीच्या वेळी असच घडत असत. त्यात नवीन काही नाही. कारण ज्याना रूढ चाकोरीतल किंवा परपरेशी घट्ट नात सागणार नाटक हव असत, त्याना चाकोरी–चौकटी मोडणारं दुसरं काहीही अस्वस्थ करणार असतं ! जे समोर दिसतंय ते जाणून घेण्यासाठी वेगळ्या परिश्रमाची गरज असते ती तयारी सदैव असतेच अस नाही. मला ठामपणान वाटत की, 'टूरटूर' मधील उणीवासह ती नाट्यनिर्मिती ही एक वेगळी नाट्यशैली म्हणून तू प्रस्थापित केलीस.

त्याच नाट्यशैलीचं विस्तारस्प म्हणजे 'मुबई–मुबई' ही निर्मिती आहे. नावावरूनच कल्पना येते की यामध्ये सार काही मुबईसबधात असणार. ते तस आहेही.

त्याचबरोबर ही नाट्यनिर्मिती तुझी असल्यान पारंपारिक चौकटीतली नसणार हेही गृहीत होत. तो अंदाजही खरा ठरला. कोईमतूरसारख्या गावातील (दक्षिण भारतातील) एक माणूस मुंबईत येतो आणि त्याला अकरा लाखाच लॉटरीच तिकीट लागत हे मुख्य घटना सूत्र. या सूत्राच्या निमित्तान मराठी आणि अ-मराठी माणसांच्या स्वभावाचे किंवा जीवनवृत्तीचे बहुविध विशेष तू यामध्ये व्यक्त केलेस. त्यातून एक नाट्यानुभव आकाराला आला. तो व्यक्त होत असताना मराठी माणसाबद्दल भाबड प्रेम व्यक्त केल नाहीस तसच अमराठी माणसाबद्दल अकारण तुच्छता, मत्सर, द्वेष याचे फुत्कार टाकले नाहीस. आजमितीला जे साक्षात घडतं आहे त्याच वास्तव चित्रण केलस. ते करताना उपहास–उपरोध याचा वापर चपखलपणानं केलास. अशा शैलीत हसता हसता अंतर्मुख करण्याची जी ताकद असते त्याचा प्रत्यय प्रयोग पाहताना येत होता. सर्वात ध्यानात राहणारी गोष्ट म्हणजे या नाटकाचा शेवट. अशा प्रकारच्या स्वैर–मुक्त कथावस्तूच्या नाटकाचा शेवट अनेकदा सैरभैर किंवा टवाळीचा सूर व्यक्त करून होण्याचा धोका असतो. तसा तो येथे झाला नाही. कारण तू ज्या पद्धतीन अखेरच्या बिंदूवर थांबलास ते महत्त्वाच आहे. मुंबईसारख्या अफाट शहरात देशातील कोणत्या माणसान याव, राहावं यावर निर्बंध ठेवण अवघडच असतं नेहमी अस होत की, बाहेरचा माणूस प्रथम पोटासाठी आणि नंतर भरपूर पैशासाठी मुंबईत आला की, तिथलाच होऊन जातो. तुझ्या नाटकात तू कोईमतूरवाल्याला परत आपल्या गावी पाठवला आहेस. त्याचा परत जाण्याचा निर्णय ऐकून मराठी माणसाला होणाऱ्या आनंदाच्या प्रतिक्रियाही नाट्यपूर्णरीतीनं व्यक्त केल्या आहेस. याचा अर्थ मी असा लावतो की, तुझ्या नाट्यलेखनाला, प्रयोगनिर्मितीला नेमकी दिशा आहे, बिंदू आहे. त्याचबरोबर मुंबईतल्या असंख्य मराठी माणसाना तिथल्या काही प्रश्नाबद्दल वाटतय ते तू नाट्याच्या माध्यमातून नेमकं मांडलं आहेस.

तुझी ही नाट्यनिर्मिती निर्दोष आहे अस तूही म्हणणार नाहीस. तशी कोणतीच कलानिर्मिती निर्दोष नसते. तुझ्या या निर्मितीत काही गोष्टी खटकल्या त्या म्हणजे पहिल्या आणि दुसऱ्या भागातील होणारा नाट्य परिणाम समतोल राहिला नाही. दुसऱ्या भागातील काही गोष्टींची पुनरावृत्ती (विशेषत: हौसिंग सोसायटीतील चित्रणाचा भाग) टाळण, कमी करणं आवश्यक आहे. तसच लक्ष्मीकांत बेर्डेच्या स्लाइडचा वापर (कदाचित लक्ष्याला सध्या तुझ्या नाटकात यायला वेळ नसल्यान स्लाइड आल्या असतील. अर्थात तशा दर्शनानंही सुखावणारा प्रेक्षक आहे. हे त्याच्या लोकप्रियतेच एक गमक आहे) जरा जादा झाला आहे. होत काय की, ती स्लाइड रंगमंचाच्या मध्यभागी ठसठशीतपणानं दिसत असल्यान त्हीची (ही पुन्हा बेर्डे, त्यात ती सौ. लक्ष्मीकांत याही अर्थान पाहिल जातच.) वाक्य आमच्यापर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचत नाहीत. साहजिकच तेवढा भाग पुरेसं समाधान देत नाही. अशा काही किरकोळ दुरुस्त्या एव्हाना तुझ्या ध्यानात आल्या असतीलही. पण मी हे लिहिल याच कारण प्रयोग आणखी उत्तम व्हावा, परिपूर्णतेच्या दिशेन जावा!

या प्रयोगनिर्मिच बहुतांश श्रेय तुलाच आहे. कारण याचा लेखक, दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाशयोजक, संगीतकार आणि जाहिरातकार सारे काही तूच आहेस. फक्त तुझे नाट्य निर्माते वेगळे आहेत पूरू नाट्यनिर्मितीतल्या एवढ्या गोष्टीमध्ये गती असणं ही निदान मराठी रंगभूमीवर दुर्मिळ गोष्ट आहे कारण याच्या जोडीला तुला अभिनयाचही अंग आहे. एका अर्थान तू तुझा प्रयोग म्हणजे 'टोटल थिएटर' पेश करीत असतोस, कारण तू स्वत च 'टोटल थिएटर' आहेस. याचा योग्य तो अर्थ तुझ्या (आणि वाचक–प्रेक्षकांच्या) ध्यानी यावा!

पण असं असल तरी तू प्रयोगासाठी निवडलेल्या कलाकाराच महत्त्व कोणत्याही अर्थान कमी नाही. शिर्के, वाडकर, रूही इत्यादी परिचित मंडळी तर यामध्ये महत्त्वाची कामगिरी करीत आहेतच; पण विजय पाटकरची केलेली निवड (तो 'रबरस्टार' असूनही) किती अर्थपूर्ण आहे यासाठी प्रयोगच पाहायला हवा. पाटकर आपल्या संपूर्ण शरीराचा वापर ज्या लवचिकपणान, ज्या गतीन करतो ती गोष्ट स्तिमित करणारी आहे. त्याला पाहताना दादु इंदुरीकर, दादा कोंडके यांच्या एकेकाळच्या लक्षणीय अभिनयाची दाद येत होती; पण पाटकर त्यांच्या नकलेत गुतलेला नाही त्याच्या लवचिक शरीर हालचालीचा आणि मुद्राभिनयाचा वापर रंगभूमीन मोठ्या प्रमाणात करून घ्यायला हवा. बरेच दिवसानी ताजेपणान वेगळा अभिनय करणारा कलाकार पाहायला मिळाला याचा आनंद वाटला. या आधी त्याला दोन नाटकातून पहिला होता; पण तुझ्या या नाटकात तो स्मरणीय ठरला. या कलाकाराबरोबरच तू नाटकाची करीत असलेली जाहिरात हा तितकाच लक्ष वेधणारा, चर्चेचा विषय झालेला आहे. एक मत असं आहे की, जाहिरातीमुळ तुझ्या दोन नाटकांकड लक्ष केल आणि यश मिळाल. मला वाटत, तेवढच नाही कारण मोठी, निराळी जाहिरात करणारे निर्माते थोडेफार आहेतच निव्वळ जाहिरातीवर नाटक चालत असती तर काय? पण तू सिद्ध केलस की, प्रयोगनिर्मितीत जाहिरात ही तितकीच महत्त्वाची, अर्थपूर्ण असते!

म्हणूनच मी (पुण्याचा असूनही) 'मुंबई-मुंबई' पहा अस अनेकाना तोंडी सांगत असतो, आता या पत्राच्या निमित्तान लेखी सांगतो आहे.

तर कळावे.

मला जे तुला कळवायच होतं ते सांगून झालंय. तुला त्यातून किती आणि काय कळाल ते पुढच्या प्रयोगात कळेलच. पण हे कळवण 'कळकळीच' आहे एवढं मात्र ध्यानी असाव.

(समीक्षक असूनही) तुझा—

—वि. भा. देशपांडे

□

ता. क. वास्तविक पत्राच्या आरंभी 'सप्रेम नमस्कार' लिहाव अस ठरवल होत, पण मुद्दामच टाळल कारण 'प्रिय' म्हटल्यावर पुन्हा प्रेम व्यक्त काय करायचं? तरी पण 'रीत' चुकू नये आणि आधीच नाट्यसमीक्षकाबद्दल असलेल्या (गैर) समजात भर पडू नये म्हणून शेवटी का होईना सप्रेम नमस्कार लिहीत आहे तेवढ समजून घ्याव...काय? □

चित्रपट

# बडे सेट्स–पोकळ कथा

# सल्तनत

'सल्तनत' हा अलिकडच्या काळातला आणखी एक कॉस्च्यूम ड्रामा. मधल्या काळात 'पाताल भैरवी' लागून गेला अगदी परवा परवाच 'सिंहासन' येऊन गेला आणि आता 'सल्तनत'. इतर कोणत्याही अशा प्रकारच्या चित्रपटाप्रमाणे 'सल्तनत' मध्येही वेगळ्या प्रकारचे पोशाख, प्रचंड सेट्स ही वैशिष्ट्य आहेतच. पण हा चित्रपट येण्याआधीच गाजला तो त्यातल्या इतर काही कारणामुळे एकतर 'सल्तनत' हा अलिकडच्या काळातला सगळ्यात खर्चिक चित्रपट असावा. चित्रपटनिर्मितीतला अवाढव्य खर्च पाहून मनमोहन देसाई, प्रकाश मेहरासारखे दिग्दर्शकही आता 'लो बजेट चित्रां'च्या गोष्टी बोलायला लागलेत अशा वेळेस भरपूर खर्चाची मागणी करणाऱ्या कथेवर, टॉप स्टार्सचा भरणा करून चित्रपट काढणं म्हणजे धाडसाचंच काम. पुन्हा हा चित्रपट सेटवर गेला तेव्हा व्हिडिओची भीती फिल्म इंडस्ट्रीला नव्यानंच भेडसावायला लागली होती तरीही काही कोटींची गुंतवणूक या चित्रपटात करण्यात निर्माते अर्जुन हिंगोरानींनी साहसच दाखवलंय. अर्थात याची जाणीव झाल्यामुळंच असेल. 'सल्तनत' मध्ये फकिराची भूमिका केलेल्या हिंगोरानींनी चित्रपटभर सतत देवाची आळवणी सुरू ठेवलीय.

'सल्तनत' नं धर्मेन्द्र आणि सनी या पिता–पुत्रांना प्रथमच महत्त्वाच्या भूमिकांत एकमेकासमोर आणलंय. तसा 'सनी' आणि 'सवेरेवाली गाडी' या चित्रपटातही धर्मेंद्र होता. पण पाहुणा कलाकार म्हणून. इथं मात्र दोघांनाही तोडीसतोड भूमिका आहेत. अर्थात त्यांच्यात सामना वगैरे नाही. कारण धर्मेंद्र व्यक्तिमत्त्व, अभिनय सगळ्याच बाबतीत सनीपेक्षा निःसंशय उजवा आहे. 'सल्तनत' चं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे करणकपूरचं रूपेरी पडद्यावर पदार्पण 'बॉम्बे डाइंग' च्या जाहिरातींद्वारे लोकप्रिय झालेल्या या शशीकपूरपुत्राला हॉलिवूडची स्वप्नं पडत होती त्याला हिंदी चित्रपटसृष्टीकडं वळवलं 'सल्तनत' च्या दिग्दर्शकानं, मुकुल आनंदनं. त्यानंतर करणनं आणखी काही हिंदी चित्रपट साईन केले आहेत.

'सल्तनत' ची कथा घडते कुठल्यातरी अरबी प्रदेशात. चित्रपटाच्या सुरुवातीलाच 'ही पूर्णपणे काल्पनिक कथा आहे. चित्रपटात जो प्रदेश दाखवला आहे तिथल्या लोकांचे वेगळे असे कायदे–कानून आहेत.' अशी ओळ दाखवून टाकल्याने यातल्या पात्रांना हवे ते करू द्यायला दिग्दर्शक मोकळा झालाय यात पुन्हा कथा–पटकथा–दिग्दर्शन सगळंच मुकुल आनंदचं असल्यानं आणखीच सोय.

तर कथा जिथे घडते त्या प्रदेशाच्या राज्यावर रसूली (अमरीश पुरी) हा बंडखोर सतत हल्ले करत असतो. त्याच्या अशाच एका हल्ल्याला तोंड देताना तिथला राजा (टॉम आल्टर) हताश झालेला असतो. पण त्याचा जनरल खलिद (धर्मेन्द्र) राज्य रसूलीच्या हातात जाण्यापासून वाचवतो. त्यासाठी त्यानं शोधून काढलेली युक्तीही भन्नाटच हे सगळे वीर कुठल्यातरी आखाती प्रदेशात रहात असल्यानं तिथं पेट्रोलचा सुकाळ. म्हणून हे खालिद महाशय पाण्याच्या टाकीत पेट्रोल भरून त्याला आग लावून देतात! रसूली पळून जातो पण खालिद आणि त्याची गरोदर बायको त्याच्या तावडीत सापडतात. खालिदची बायको पुढं मरण पावते तिला झालेला मुलगा रसूली आपला म्हणून ठेवून घेतो याची खालिदला कल्पना नसते.

पुढं खालिद एका युरोपियन स्त्रीशी दुसरं लग्न करतो. पण रसूलीला मारल्याशिवाय आपल्या मुलीचं तोंड पहायचं नाही अशी प्रतिज्ञा करून तो त्या दोघांना परदेशात पाठवून देतो.

वर्षे उलटतात. रसूलीनं वाढवलेला खालिदचा मुलगा सुल्तान (सनी) मोठा होतो. परंपरागत वैर त्याच्यापर्यंतही पोचलेलं असतं. दरम्यान त्याची शाहजादी यास्मिनशी (श्रीदेवी) ओळख होते तिचा अपमान तिनं दिलेली शिक्षा, तिला पळवून नेणं वगैरे प्रकार यथासांग होऊन दोघं प्रेमात पडतात. या वेळापर्यंत मध्यंतर उलटून गेलेलं आहे आणि अजूनही खालिदच्या दुसऱ्या मुलाचं दर्शन त्याच्यासह प्रेक्षकांनाही झालेलं नाही हे लक्षात येताच मुकुल आनंद खालिदच्या हातून रसूलीची हत्या करवतो आणि त्याच्या दुसऱ्या मुलाला समीरला (करण कपूर) आमंत्रण धाडतो.

तिकडे समीर झरीना (जुही चावला) या मैत्रिणीबरोबर गाणी वगैरे म्हणून टाईमपास करत असतानाच त्याला परतायचं आमंत्रण येतं. तो यायला निघतो. दरम्यान रसूलीच्या मृत्यूमुळं चित्रपटाला खलनायकच राहिलेला नाही हा साक्षात्कार झाल्यानं कथाकाराच्या पोतडीतून दुसरा खलनायक अचानक उपटतो, शाकीर (शक्तीकपूर) बिचारा समीर इतक्या वर्षांनी वडिलांना भेटायला निघालेला तर त्याच्यावर संकटं येऊन कोसळायला लागतात. त्याच्या हेलिकॉप्टरमध्ये बाँब ठेवलेला. त्यातून वाचतो तर शाकीरच्या कैदेत पडतो तिकडे हा आपला मुलगा आहे याची कल्पना नसलेला खालिद सुल्तानशी युद्ध करत असतो. बऱ्याच गोंधळानंतर शेवटी सगळ्यांची एकदाची भेट होते.

सतरा रिळांच्या या चित्रपटात सनी–श्रीदेवीचा वादविवाद, अपमान भांडण, शिक्षा या सगळ्यात प्रचंड वेळ घालवला आहे. सुरुवातीचा काही भाग सोडला तर हे प्रकरण जे सुरू होतं ते मध्यंतरानंतरही काही वेळ चालूच रहातं या सगळ्यात खालिद, रसूलीसह सगळी पात्रं एकदम बाजूला पडतात. चित्रपटाचा जवळजवळ ⅓ भाग या सगळ्यानं खाल्ला आहे शिवाय त्या भागात २–३ अनावश्यक गाणी आहेतच. नेमकं काय करावं याचं भान दिग्दर्शकाला असंच राहिलेलं नाही ते काळाच्या संदर्भात. ही पूर्णपणे काल्पनिक कथा असली तरी ती कुठल्या काळातही असावी याचा काही संदर्भ लागत नाही कारण इथं राजा आहे, एकूण पात्रांचे पोषाख, राजवाडे पाहून हा जुन्या काळातला प्रकार म्हणावा तर इथं जीपगाड्या सर्रास वावरताना दिसतात शिवाय इथली पात्रं कमलाही भेदभाव न करता तलवार, बंदुका, पिस्तुल सगळ्यांचाच सढळ हातानं वापर करतात.

दिग्दर्शक मुकुल आनंदचा हा दुसराच चित्रपट. 'ऐतबार' ह्या लक्षणीय पदार्पणानंतर त्याला एकदम दुसऱ्या टोकाच्या चित्रपटाला तोंड द्यावं लागलं आहे. बरीच पात्रं, त्यांच्यातले प्रसंग, युद्ध, गाणी या सगळ्यांची सांगड घालता घालता त्याला पुरेवाट झाली आहे त्याची चमक दिसते ती युद्धासारख्या प्रसंगात. हे सगळे प्रसंग छान घेतले आहेत. शेवटचा खालिद–सुल्तानचा झुंजीचा प्रसंग तर खूपच थरारक उतरला आहे.

चित्रपटात उल्लेखनीय आहेत ते सेट्स आणि प्रवीण भट्टचं छायाचित्रण.ा. खाडा वाळवंट, रसूलीची वस्ती हे सगळं उभं

करण्यात प्रचंड खर्च केला असावा हे सहज लक्षात येत. पण हे सेट्स खरच प्रेक्षणीय झाले आहेत आणि त्यात कॅमेऱ्याचा मोठा वाटा आहे सेट्सची भव्यता त्याच्यामुळं नजरेत भरते. खालिदच्या लग्नाच्या वेळी सुरुवातीला त्यान लावलेला अँगल अफलातूनच आहे. 'सल्तनत'चा सगळ्यात प्रेक्षणीय भाग सेट्स आणि छायाचित्रण हाच ठरावा.

कलाकारात धर्मेंद्र सगळ्यात भाव खाऊन जातो. खालिदची भूमिका त्यान सफाईनं केली आहे या वयातही तो चागला दिसतो, अॅक्शनच्या प्रसगात चागला शोभतो. सुल्तान आपलाच मुलगा आहे हे कळत या प्रसगात त्यान छानच अभिनय दाखवलाय. सनीही सुलतान म्हणून शोभतो. अॅक्शन हवी आहे तिथं तो फॉर्मात आहे, संवाद बोलताना मात्र मार खातो. करणकपूर आणि जुही चावलाचीही तीच गत आहे. या तिघानीही अतिशय वाईट रीतीन सवाद म्हटले आहेत. श्रीदेवी दिसते चांगली, तिला कामही तेवढच आहे. इतर भूमिकात लक्षात रहातो तो अमरीश पुरी.

कल्याणजी-आनदजीच्या संगीतात फारस उल्लेखनीय काही नाही. एकूण 'सल्तनत'च वर्णन एका वाक्यात करायचं तर 'बडे सेट्स-चांगल छायाचित्रण पण पोकळ कथा' अस कराव लागेल.

—सीमा कुलकर्णी

## मुंबापुरी

पृष्ठ ४ वरून

करता राखून ठेवले. इमारतीचे उद्घाटन दादा करणार होते आणि शकररावांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलविण्यात आले होते. परतु उद्घाटन दोन दिवसावर आल्यावर ह्या इमारतीच्या मालकी हक्काबद्दल उलटसुलट बातम्या वृत्तपत्रातून यायला सुरवात झाली.

वृत्तपत्रातील 'खोडसाळ' बातम्यामुळेच संघाने उद्घाटन लांबणीवर टाकायचे ठरविले असे सघाचे उपाध्यक्ष शिवाजीराव पाटील पत्रकाराना म्हणाले. हे शिवाजीराव म्हणजे स्मिता पाटीलचे वडील; चंद्रकलेचे नव्हे. ह्या दोघा मुलीनी त्यांच्या शिवाजीरावाचे प्राण कठाशी आणले आहेत. असो. शिवाजीरावाना आम्ही त्यांनी वृत्तपत्राबावत इतके हळवे होण्याचे कारण काय, असे विचारले तर ते म्हणाले की, अशा ढगाळ वातावरणात आमची बाजू लोकांपुढे मांडल्याखेरीज दादा आणि शकरराव ह्यांना एकाच व्यासपीठावर आणणे योग्य नाही, असे आम्हाला वाटते.

शिवाजीराव काहीही म्हणोत, साखर भवनातला गोडवा आता सपल्यातच जमा आहे शकररावानीच ठाम नकार दिल्याने त्याना उद्घाटनाच्या दिवशीचा समारंभ लांबणीवर टाकणे भाग पडले, ह्यात शकाच नाही. आता हे दोन नेते आपापसातले मतभेद विसरून एकाच व्यासपीठावर एकत्र येत नाहीत तोवर महाराष्ट्रातील दुष्काळाचे काय होणार ह्याचीच आम्हाला चिंता लागली आहे.

### ☐ नसलेली चित्रे

महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवानिमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे राज्याच्या प्रगतीचा आलेख दाखवणारं प्रदर्शन नेहरू सेंटरमध्ये साप्रत दाखवलं जातय. काही ऐतिहासिक महत्त्वाच्या प्रसगाची छायाचित्रे ह्यात आम्हाला आढळली नाहीत. उदाहरणार्थ

— वसतराव नाईक, रजनी पटेल प्रभृती नेते बॅकबे रेक्लमेशनचा आराखडा तयार करताहेत.

— अंतुले साखर कारखानदाराकडून इंदिरा गाधी प्रतिभा प्रतिष्ठानसाठी चेक गोळा करताहेत. शेजारी गवई, वसंत देशमुख उभे आहेत.

— बाबासाहेब भोसले पोलीस—बडाच्या भीतीने विक्रांत बोटीवरन हेलिकॉप्टरमध्ये बसून 'वर्षा'कडे पळताहेत.

— रामराव आदिक विमानात बसून प्राशनसुख घेताहेत.

— शालिनीताई पजाबी ड्रेसमध्ये बगळूरच्या हॉटेलात.}

— वसतदादा सागली भूखडाचा नकाशा नीट न्याहाळून पाहताहेत.

— शिवाजीराव निलंगेकर आपल्या सुकन्येस शिकवताहेत.

— शकरराव चव्हाण सत्य साईबाबांच्या पायाशी बसून दुष्काळ निवारणाच्या कार्यक्रमाचा दृष्टान्त घेताहेत

ही छायाचित्रे पाहायला मिळाली असती तर प्रत्येक मऱ्हाटी माणसाची शान की काय म्हणतात ती नीट शुद्धीवर आली असती.

### ☐ पंडित कमलापती त्रिपाठीजींना अनावृत पत्र

श्रद्धेय पंडितजी :

सियावर रामचंद्र की जय ॥

पवनपुत हनुमान की जय ॥

आधीच खुलासा करतो. हा रामचद्र म्हणजे जगजीवनराम किंवा सीताराम केसरी नव्हे. हा सियावर रामचद्र म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्रीराम.

उत्तर प्रदेश राजकारणाच्या आखाड्यात एकसेक अमर्याद पुरुषोत्तम मौजूद आहेत. त्यात आपण एक. आपल्या अगाध लीला म्या पामराने काय अन् कशा वर्णाव्यात ?

खर तर आपण प्रभू रामचंद्राऐवजी श्रीकृष्णालाच भजायला हव. त्याच्या लीला अगाध. आपणही यू पी.चे राजकारणी घुरघर, एकेक लीला पुरुषोत्तमच.

परवा आपण राजीव गाधींच्या खिलाफ बडाची पिपाणी वाजवलीत. आम्हाला वाटलं की कुरुक्षेत्र आता गजबजणार पण कसच काय अन् कसच काय. आपण अगदी रणछोडदास निघालात. हरकत नाही. हा तुमचा 'टॅक्टिकल रिट्रीट' आहे अस आम्ही मानतो. आपण पुन्हा रणशिंगे फुकाल या विश्वासाने आम्ही स्वत ला साप्रत सावरून घेतलय.

खरं तर आपल्याला बडाचा चागलाच अनुभव असायला हवा. आपण उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होतात तेव्हा आपल्या शासनाविरुद्ध तिथल्या पोलिसानी बड केलं होतं. आपल्याला तातडीने दिल्लीश्वराकडे धाव घ्यावी लागली होती तेव्हा. आठवतं ?

लोकपती आणि मायापती म्हणजे आपल्याला लागलेली शुक्लकाष्टेच. त्याच बरं व्हावं या उदात्त हेतूने आपण बडाचा देखावा उभा केलात. पण तेच भुसभुशीत निघाले. त्याला आपण काय करणार ? बडाची आरोळी ठोकणं सोप असत पण निभावून नेण महाकठीण असतं हे या निमित्ताने आपल्याला कळल असेलच. असो.

इथे महाराष्ट्रात आपल्या बडाच खूप हसू झाल. त्या गोविंद तळवलकरानी आपल्या बडाला 'तोतयाचे बड' म्हणून हिणवल. हिणवू देत. या तळवलकराचं काही आपण जीवाला लावून घेऊ नका. पी एल देशपाड्याचा सग. चावटपणा दोघाच्या अगदी हाडीमाशी मुरलाय. तोतयाचे बड करायलाही केवढा स्टॅमिना लागतो ते तळवलकराना कस कळणार ? ते ठरले वाचस्पती.

आपण, वससदादा, जगजीवनराम प्रभृतीना तर आता म्युझियममध्ये ठेवायला हव. कणाहीन, कळाहीन, मृतप्राय कॉंग्रेस-बुजुर्गांची आपली शेवटची पिढी. पुराणवस्तू-सग्रहालय हीच आता आपली जागा.

पडितजी, येत्या काही दिवसात ते बड एकदाचं उरकून टाका. म्हणजे म्युझियमसाठी आणखी एक जुनीपुराणी वस्तू सापडेल. जगातले सगळे इतिहासवेत्ते रावणाच्या लकेचा शोध घेतायेत.

— आम्ही आपल्या बडाचा शोध घेत राहू. रामराम. बहुजीना पायलागी.

—विष्णु जयदेव

## मुस्लिम महिला विधेयक

# टाटा संस्थेतील शास्त्रज्ञ काय म्हणतात?

मुंबई : दि. ९ : मुंबईच्या टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेच्या सुमारे ३२० शास्त्रज्ञांनी राष्ट्रपती झैलसिंग यांना निवेदन पाठवून कळवले आहे की, त्यांनी संसदेने संमत केलेल्या मुस्लिम महिला विधेयकावर सही करू नये व पुनर्विचारासाठी ते संसदेकडे परत पाठवून द्यावे.

'राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणे चालावे लागते ही जरी घटनात्मक वस्तुस्थिती असली तरी त्यांनी या सामाजिक आणि नैतिकदृष्टया प्रतिगामी असलेल्या विधेयकाचें कायद्यात रूपांतर होऊ देण्याऐवजी आपल्या पदाचा राजिनामा द्यावा', असेही या निवेदनात म्हटलेले आहे.

—टाइम्स ऑफ इंडिया
शनिवार दि. १० मे ८६
पृष्ठ १६